# पहिला शिक्का

आपल्या माना आपण प्रार्थनेसाठी झुकवूया. हे स्वर्गिय पित्या, आज रात्री आम्ही तुझे आभार मानतो यासाठी की, तू आम्हाला परत संधी दिली की, आम्ही येऊन तुझी उपासना करावी. आम्ही तुझे आभारी आहोत की, तू आम्हाला जिवंत राखले आणि सार्वकालिक जीवन जे आमच्या आत वस्ती करते; त्याचे महान प्रकटीकरण दिल्याबद्दल. आणि हे पित्या, आज रात्री, आम्ही एकत्र आलो आहोत. तुझ्या वचनांचा अभ्यास करण्यासाठी, जे जगाच्या प्रारंभापासून ही महान रहस्ये जी लपलेली आहेत. आणि तो कोकराच आहे तोच फक्त आम्हाला हे प्रगट करु शकतो. आज रात्री, मी प्रार्थना करतो की, त्याने आम्हामध्ये यावे आणि त्याचे वचन घेऊन आम्हाला प्रगट करावे यासाठी की, आम्ही कसे त्याचे अधिक उत्तम असे सेवक या अंत समयात असावे. हे देवा, जसे आम्ही आज पाहतो की, आम्ही अंत समयात आलो आहोत, आमची जागा ओळखावी अशी समज तू दे, प्रभू, आणि आमची नाजूक अवस्था, आणि तुझ्या लवकर येण्याची निश्चितता हे प्रभू आमचे सहाय्य कर. हे आम्ही येशूच्या नावात मागतो. आमेन.

2 मला वाटते तो दाविद होता, जो म्हणाला, “आपण परमेश्वराच्या घराकडे जाऊ असे ते मला म्हणाले, तेव्हा मला आनंद झाला.” ही नेहमीच एक संधी आहे की यावे. आणि—आणि देवाच्या वचनांचा, एकत्रितपणे, अभ्यास करावा, जी आम्हाला महान आशा देते.

3 आता येथे पुष्कळ उभे आहेत आणि मी थोडी घाई करणार आहे. शक्य तितक्या लवकर व्हावे म्हणून. परंतु मला भरवसा वाटतो की, तुम्ही पवित्र आत्म्याच्या उपस्थितीचा आनंद अनुभवला आहे. जसा मी अनुभवला आहे, काही मागील काळात. [मंडळी “आमेन.” म्हणते—संपा.]

4 आणि, आज, असे काही घडले आहे, जे या मागील बऱ्याच काळात घडले नव्हते. मी यावर अभ्यास करीत होतो, या प्रकटीकरणावर, शिक्का फोडण्यासंबंधी.

5 काही वर्षांपूर्वी मी त्यांतून गेलो, मला वाटते याला वीस वर्षे झाली असावी, किंवा तसेच काही. परंतु कसेही का असेना मी कधीच त्याबद्दल पूर्णतः समाधानी नव्हतो. असे वाटत होते की, तेथे काहीतरी आहे, मुख्यतः करुन ह्या शिक्क्यांमध्ये, कारण हे शिक्के हे पूर्ण पुस्तक आहे. पाहा? ते पुस्तक आहे. हे पूर्ण पुस्तक एक पुस्तक आहे, शिक्के मारलेले…

6 उदाहरणासाठी, जर माझ्याकडे येथे काही आहे, माझे म्हणणे काय ते मी दाखवू इच्छितो. [ब्रदर ब्रॅन्हम एका कागदाचा तुकडा घेऊन हे सचित्र त्याला गुंडाळून आणि गुंडाळीला शिक्काबंद करुन दाखवतात.—संपा.] *येथे* एक शिक्का आहे. तो *अशाप्रकारे* गुंडाळण्यात यावा, जसा हा गुंडाळला आहे. आणि तुम्ही अशाप्रकारे त्याला गुंडाळा. आणि शेवटी त्याचा *असा* तुकडा दिसून येतो. हा पहिला शिक्का आहे. मग, हे ठिक आहे, हा पुस्तकाचा पहिला भाग आहे. मग, नंतरचा शिक्का हा *अशाप्रकारे* त्याला गुंडाळलेला आहे, त्याच्या बाजूलाच. आणि त्याला ह्या *अशाप्रकारे*, गुंडाळलेले आहे. आणि नंतर. शेवटी, *येथेच*, दुसरा एक शिक्का दिसून येतो, म्हणजे, दोन शिक्के.

7 आणि अशाप्रकारे संपूर्ण बायबल हे लिहीले गेले, गुंडाळ्यांमध्ये. [भाऊ ब्रॅन्हम हे कागदाचे पान जे गुंडाळले होते, ते पुन्हा उघडतो जो त्यांनी स्पष्ट करण्यासाठी वापरला

होता—सम्पा.] आणि, असे, त्या शिक्क्याचे फोडणे म्हणजे त्या पुस्तकांतील रहस्ये उघड करणे होय.

8 तुम्ही यिर्मयाच्या पुस्तकातून काही शिकलात काय, त्याने कसे लिहीले, तुमच्यांतील पुष्कळजण हे टिप्पणी करीत होते? कसे ते शिक्के लिहिले गेले व राखण्यासाठी ते कसे दुर ठेवले होते, सत्तर वर्षांच्या बंदिवासांतून तो परत येईपर्यंत. तो परत आला आणि त्याने त्याच्या वतनावर दावा केला.

9 मला निश्चितच त्याचा अभ्यास करायला आवडेल. तुम्ही नाही...ते सर्व व्यक्त करण्याचा काही मार्ग नाहीये. कारण ते सार्वकालिक वचन आहे. आणि ते सार्वकालिक पुस्तक आहे, म्हणून आम्हाला काही उंच ठिकाणी त्याला हाणायचे आहे. आणि आज, अभ्यास करताना, मी पुष्कळ शास्त्रवचने लिहीली आहेत, यासाठी की तुम्ही त्याचा अभ्यास करावा आणि...आणि टेप्स् त्याबद्दल पुष्कळ काही उघड करील, जसा तुम्ही अभ्यास कराल आणि तेथे पुष्कळ गोष्टी आहेत!

10 जर का मी येथे मंचावर उभा राहिलो आणि तुम्हाला प्रगट केले, जसे मला त्या खोलीमध्ये प्रगट करण्यात आले, बापरे, तर ते आश्चर्यकारक ठरेल! परंतु जेव्हा तुम्ही येथे येता, तेव्हा तुम्ही दबावाखाली असता, आणि तुम्ही पुष्कळ गोष्टींना सोडून देता, आणि हा प्रयत्न करता की, लोकांपर्यंत महत्त्वाच्या गोष्टी आणाव्या, यासाठी की त्यांनी त्या पाहाव्या.

11 मी नक्कीच भाऊ अनग्रिन यांच्या नुकताच गाईलेल्या गीताचे कौतुक करितो; *आपल्या गौरवातून खाली*. जर तो आपल्या गौरवातून खाली आला नसता; तर आम्ही सर्व आज रात्री कुठे असतो? म्हणून आम्ही आभारी आहोत की, तो आमच्यासाठी खाली आला.

12 आता, अनेक लोक उभे असताना, आम्ही लवकरच त्याचा अभ्यास करण्यास सुरुवात करु, जेवढे-जेवढे उत्कृष्ट आम्हाला करता येईल. मी असे म्हणत नाही की, घाईघाईत त्याचा अभ्यास करुया, परंतु माझे म्हणणे असे की, लवकरात लवकर याला सुरुवात करुया आणि आता आपण वळूया, आता, ह्यानंतर...

13 आम्ही पहिला अध्याय, दुसरा, तिसरा व चौथा यांचा अभ्यास केला आहे. आणि पाचवा, काल रात्री. आणि आज रात्री आम्ही प्रकटीकरणाच्या 6व्या अध्यायाचा अभ्यास सुरु करीत आहोत.

14 आता, या अध्यायाचा अभ्यास करत असताना, आम्ही काही वेगवेगळ्या ठिकाणांचे संदर्भ देणार आहोत, अगदी जुना व नविन करार, सारखेच, कारण संपूर्ण पुस्तक हे येशू ख्रिस्ताचे प्रकटीकरण आहे. पाहा? हे सर्व मिळून प्रभू येशूचे-चे प्रकटीकरण आहे, प्रभू येशूचे प्रकटीकरण. तो देव आहे, त्याने स्वतःला या पुस्तकात प्रगट केले आहे; स्वतःला प्रकट केले आहे, ख्रिस्ताद्वारे, या पुस्तकामध्ये. आणि ख्रिस्त हा देवाचे प्रकटीकरण आहे. तो देवाला प्रगट करण्यासाठी आला, कारण तो व देव एकच आहे. "देव ख्रिस्तामध्ये, जगाशी समेट करित होता." दुसऱ्या शब्दांत, देव काय होता हे तुम्हाला कधीच कळू शकत नाही. जीतपर्यंत ख्रिस्ताद्वारे तो स्वतःला प्रगट करीत नाही; मग तुम्ही समजू शकता.

15 मी, काही वर्षांपूर्वी, असा विचार करीत होतो की, कदाचित देव माझ्यावर रागावला असेल, परंतु ख्रिस्ताने माझ्यावर प्रेम केले. हे शोधण्यास या, तो तोच व्यक्ति आहे, पाहा. आणि ख्रिस्त हा देवाचे प्रत्यक्ष हृदय आहे.

16 आणि आता आपण याचा अभ्यास करीत असता. आम्ही त्याची तुलना करु. बायबलची पहिली तीन पुस्तके, प्रकटीकरणाची, ज्यांचा आपण सविस्तरपणे अभ्यास

केला, जी आपण मंडळीची युगे, सात मंडळ्यांची युगे. आता तेथे सात मंडळीची युगे आहेत, सात शिक्के, सात तुतारी, आणि सात पीडा, आणि–आणि बेडकाचे तीन अशुध्द आत्मे, आणि हे सगळे एकत्रित जाते.

17 बापरे, मला हे किती आवडेल, जर माझ्याकडे एक मोठा नकाशा असता, जसा मी पाहीला आहे, तो मला विस्तारितपणे काढता आला असता, तुम्ही जाणता, प्रत्येक जण आपले स्थान कसे घेतात. मी तो एका लहान कागदाच्या पानावर तो नकाशा काढला आहे. परंतु...तुम्ही जाणता. आतापर्यंत सगळं काही, आजपर्यंत बरोबर तसेच घडले आहे ह्या चित्राप्रमाणे, आणि काळ व वेळ याबद्दल तर ते आले आणि निघुनही गेले, आणि सर्व काही एका मिश्रणाच्याप्रमाणे तंतोतंत जुळले गेले. म्हणून, ते सर्व पूर्णपणे बरोबर असेल असं नाही, परंतु कसेही करुन जसे मला ते उत्तम मांडता आले तसे बनविले आहे. आणि मी जाणतो, जर–जर मी उत्तम ते केले, आणि मी उत्तम करण्याचा प्रयत्न करताना जर काही चुका करतो, तर देव खात्रीपुर्वक मला क्षमा करील यासाठी...अशा त्रुटीबद्दल जर मी चुका केल्या आहेत.

18 परंतु, आता, ती पहिली तीन पुस्तके हे पहिले, सात मंडळ्यांची युगे. आणि मग आम्हाला सापडले की, प्रकटीकरणाच्या 4थ्या अध्यायात, योहानाला वर उचलण्यात आले. पाहा? आम्ही मंडळया पाहतो. मंडळयाच्या युगांबद्दल फार काही म्हटले गेलेले नाही. येथेच मला असे वाटते की, लोक यांमुळे आश्चर्यचकित होतील. ते–ते मंडळीचा मार्ग हा महासंकटाचा असा लागू करतात त्या गोष्टींसाठी ज्यापुढे उद्भवणार आहेत. आणि जसे मी म्हणालो, काल, रविवारी, पहिली गोष्ट तुम्ही जाणता, तो महासंकटाचा काळ सुरु होईल, आणि तुम्ही आश्चर्य कराल की, का ते नाही...पहिले येणे हे रुपांतरात उचलले जाणे होय. आणि ते असे होईल: जसे अगोदर झाले आहे ते घडून जाईल व तुम्हाला ते कळणार ही नाही. समजले?

19 आता, वधुसाठी, जी परराष्ट्रीयांतील मंडळी, तीच्यासाठी फार काही आश्वासन नाहीत. आता, तुम्ही हे ध्यानात घ्यावे असे मला वाटते, तेथे चर्च व वधु आहे. समजले?

20 तुम्हाला सदैव हे तिन्हीही ध्यानात ठेवणे आहे; चौथे हे चुकीचे आहे. तिन्हीही! तीन, सात, दहा, बारा, आणि चोवीस, आणि चाळीस, पन्नास, ती अविभाजीत संख्या. बायबल हे...आणि देव आपले संदेश...हे बायबलच्या अंकामध्ये ठेवतो, त्या अंकामध्ये. आणि तुम्ही या गोष्टी पारखायला हव्या. जर तुम्ही अशा काही गोष्टी पकडता जी या अंकांना सोडून जातात, तर पढे होऊन त्या जुळत नाहीत. म्हणून त्यांना तेथे परत घेऊन प्रारंभी पाहिले तसे पाहावे.

21 भाऊ वायली, भाऊ ली वाईली. मला वाटते तो––तो...येथे आहे. कधी कोणत्या दिवशी मी त्या लोकांबद्दल बोलत होतो, जे आपला मार्ग सोडून विचलीत होतात. हे निशाणावर गोळी मारण्यासारखे आहे. जर का बंदूकही पूर्णतः समतोलपणात ठेवली आणि नजर व प्रशिक्षण असेल, तर ते निशाणाला बरोबर हाणील. जर बंदुकीची नळी हालली नाही किंवा पिळली गेली नाही किंवा कंप पावून जर सुटली नाही किंवा कोठेही वाऱ्याचा झुळुक नाहीये तर. जेथे कोठे त्याची सुरुवात झाली होते, तेथे फक्त एकच मार्ग उरतो करण्याचा, तो म्हणजे जेथे आम्ही मार्ग सोडून गेलो, तेथे परत येऊन पुन्हा सुरुवात करावी, जर त्या निशाणाला भिडायचे असेल तर. जर तसे नाही केले, तर त्याच कारणामुळे ते निशाणाला हाणता येणार नाही.

22 मला वाटते, शास्त्रलेखाचा अभ्यास करण्याचा मार्गही तसाच आहे. जर का आम्हाला असे आढळले आम्ही येथे सुरुवात केली, परंतु चांगले निष्पन्न झाले नाही, तुम्ही पाहा

तसे नाही होत. होय, कुठेतरी आम्ही चुक केली आहे, तुम्हाला परत यायचे आहे. तुम्ही कधीही तुमच्या मनाने त्याची कल्पनाही करु शकत नाहीत. नाही करु शकत...

23 आम्हाला असे आढळले, शास्त्रभागाप्रमाणे की, स्वर्गात कोणीही मनुष्य किंवा पृथ्वीवरही किंवा पृथ्वीखाली किंवा कुठेही किंवा कधीही ते करु शकणार नाही. फक्त कोकराच ते करु शकतो. म्हणून सेमनरीचे उद्गार किंवा काहीही असो ते काहीच नाही. समजले? त्या प्रगट करण्यासाठी कोकऱ्याची गरज आहे, हेच सर्व काही, म्हणून आम्ही भरवसा करतो की तो आम्हास साहाय्य करील.

24 योहान, उचलला गेला, 4थ्या अध्यायात, ह्या गोष्टी पाहण्यासाठी की, "जे होते, जे आहे आणि जे येणार." परंतु मंडळीची समाप्ती 4थ्या अध्यायात होते. आणि ख्रिस्त मंडळीला घेऊन जातो, अंतराळात उचलतो, त्याला भेटण्यासाठी, आणि 19वा अध्याय येत नाही, तितपर्यंत तो दिसत नाही. जेव्हा तो राजांचा राजा आणि प्रभूंचा प्रभू असा आपल्या मंडळीला घेऊन परत येतो. आणि आता, ओह, मला आशा आहे, जरी आम्ही याचा अभ्यास करु शकलो नाही, तरी कसेही करुन, आम्ही त्याला अवश्य पाहणारच, त्यामुळे काहीही फरक पडत नाही.

25 आता, पाचव्या अध्यायात शिक्के फोडले जातात, आणि आता हे सात शिक्क्यांचे पुस्तक आहे. प्रथम, आपण पहिला शिक्का वाचू इच्छितो.

26 येथे थोडीशी पार्श्वभूमी सांगतो, काल संध्याकाळी आपण पाहीले की, जेव्हा योहानाने पाहीले आणि त्याला दिसले की पुस्तक अजुनही मुळ मालक, परमेश्वराच्या हातात आहे. तुम्हाला लक्षात आहे की, ते कसे गमावले होते? आदामाने ते गमावले होते. त्याने सैतानाच्या ज्ञानासाठी जीवनाचे पुस्तक गमावले आणि त्याचे वारसाहक्क, सर्वकाही गमावले; आणि मुक्तिसाठी कोणताही मार्ग नव्हता. तेव्हा, परमेश्वर, मनुष्याचे रुप धारण करुन, खाली आला आणि आपणासाठी सोडवणूक करणारा झाला, ह्यासाठी आपल्याला सोडवावे.

27 आणि मागील दिवसात आता आपल्याला समजले की, ह्या गोष्टी ज्या गुप्त होत्या, त्या आपल्यासाठी अंतिम दिवसात प्रगट होणार आहे.

28 आता आपल्याला येथे हेही समजले की, जेव्हा योहानाने सोडविणाऱ्या जवळच्या आप्ताच्या येण्याची घोषणा ऐकली की, तो येऊन त्याचा दावा करील, तेथे कोणीही मनुष्य नव्हता, तो ते करु शकत होता; स्वर्गात, पृथ्वीवर, पृथ्वीखाली कोणीही मनुष्य नाही. कोणीही त्या पुस्तकात पाहावयास समर्थ नव्हता. केवळ ह्यावर विचार करा. कोणीही मनुष्य, त्याकडे पाहण्यास देखील समर्थ नव्हता.

29 आणि योहान रडू लागला. त्याला समजले की, तेथे आता मुक्तिची कोणतीच शक्यता नाही. सर्वकाही असफल झाले होते.

30 आणि लगेचच आपण पाहतो की, त्याचे रडणे थांबते, लगेचच, कारण चार प्राण्यांपैकी किंवा वडीलमंडळापैकी एक जणाने घोषणा केली. वडीलमंडळापैकी एक जण म्हणाला, "रडू नको, योहाना, पाहा, यहुदा वंशाचा सिंह ह्याने जय मिळविला." दुसऱ्या शब्दांत "मात केली आणि जय मिळविला आहे."

31 योहान वळला. त्याने एका कोकऱ्यास बाहेर येताना पाहीले. तो रक्तबंबाळ व कापलेला व जख्मी होता. त्याचा वध करण्यात आला होता...म्हणाला की, "एक कोकरा ज्याचा वध करण्यात आला होता." आणि अर्थात तो अजूनही रक्तबंबाळ होता. जर तुम्ही कोकऱ्यास कापले आणि मारले, जसे त्या कोकऱ्यास वधले होते. त्याचे वधस्तंभावर

तुकडे करुन त्याची हत्या केली होती, भाल्याने त्याला कुशीत भोसकले होते आणि खिळे त्याच्या हातात व पायात ठोकले होते, आणि त्याच्या कपाळावर काटे ठेवण्यात आले होते. तो एका भयानक स्थितीत होता आणि असा हा कोकरा पुढे येतो, आणि जो राजासनावर बसलेला होता त्याच्याकडे गेला, ज्याने मुक्तिच्या हक्काचे संपूर्ण दस्ताऐवज घेतले होते आणि कोकरा जातो आणि जो राजासनावर बसलेला आहे, त्याच्या हातातून ते पुस्तक घेतो आणि घेतल्यावर आणि शिक्के उघडतो आणि ते पुस्तक उघडतो.

32 आणि मग जेव्हा ते घडले, आपल्याला कळते की, स्वर्गात तेथे काहीतरी एक–एक मोठी गोष्ट घडली असली पाहीजे. कारण सर्व वडिल आणि चोवीस वडिल आणि चार प्राणी आणि स्वर्गातील सर्व जण बोलू लागले, “तू योग्य आहेस!” आणि तेथे स्वर्गदूत येतात, आणि पवित्र जनांच्या प्रार्थनेच्या वाट्या ओततात. वेदीखालील संत मोठ्याने ओरडू लागले. “तूच योग्य आहेस. ओह कोकऱ्या, तू आम्हास सोडविले आहेस, आणि आता तू आम्हास राजे व याजक असे केले आहे, आणि आम्ही पृथ्वीवर राज्य करु.” ओह, माझ्या प्रभू! आणि जेव्हा त्याने पुस्तक उघडले, असे घडले.

33 तुम्ही पाहा, की वास्तवात ते पुस्तक जगाच्या स्थापने अगोदर रचले आणि लिहीले गेले होते. ते पुस्तक, बायबल, खरोखरच जगाच्या स्थापने अगोदर लिहीले गेले होते आणि ख्रिस्त जो कोकरा जगाच्या स्थापने अगोदर वधला गेला होता आणि त्याच्या वधूचे सदस्य, त्यांची नावे कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात जगाच्या स्थापनेआधी लिहीली होती. परंतु, ती सीलबंद केली होती, आणि आता ती प्रगट केली जात आहे की; तेथे कोणाची नावे होती, त्याविषयी सर्व, आणि ही किती महान गोष्ट आहे.

34 आणि योहान, जेव्हा त्याने ते पाहिले, तो—तो म्हणाला, “स्वर्गात, पृथ्वीवर, पृथ्वीच्या खाली...” सर्व वस्तूजात ह्यास बोलताना मी ऐकले, “धन्यवाद, सन्मान व गौरव!” तो खरोखरच एका महान समयाचा अनुभव घेत होता आणि, कारण, “कोकराच योग्य होता.”

35 आणि आता तो कोकरा उभा आहे. आता, ह्या रात्री, ह्या 6व्या अध्यायात आपण जात असताना, त्याच्या हातात ते पुस्तक आहे, आणि ते तो प्रगट करण्यास सुरुवात करीत आहे.

36 आणि ओह, आज मी पूर्णपणे चूक केली असती...आणि माझी आशा आहे की, येथील लोक आत्मिक आहेत. आज मी त्यावर भयंकर चूक केली असती, जर आज सुमारे बारा वाजता पवित्र आत्मा खोलीत आला नसता, आणि मला काही गोष्टीत सुधारणा केली नसती; ज्या मी सांगण्यासाठी लिहून ठेवीत होतो.

37 मी ते एका जुन्या संदर्भातून घेत होतो. माझ्याजवळ त्याविषयी काही नव्हते. मला माहीत नव्हते की, दुसरा शिक्का काय आहे, अधिक काहीच जाणत नव्हतो. परंतु माझ्याकडे काही जुने संदर्भ होते. ज्याविषयी मी खुप वर्षांअगोदर बोललो होतो आणि त्याची टिप्पणी केली होती, आणि मी ते संदर्भ एकत्र केले होते. ते संदर्भ डॉ. स्मिथ ह्यांच्याकडून, अनेक महान, प्रसिध्द शिक्षकांचे संदर्भ, जे मी–मी एकत्र केले होते. आणि ते सर्व ह्याचा विश्वास करीत होते, म्हणून मी ते लिहून घेतले आणि मी असे बोलणारच होतो की, “ठीक आहे, आता मी त्या दृष्टीकोनातून ह्याचा अभ्यास करीन.”

38 आणि तेथे दिवसाच्या सुमारे बारा वाजता पवित्र आत्मा खोलीत आला आणि सर्व गोष्टी माझ्यावर प्रगट केल्या, आणि तेथे पवित्र आत्मा होता आणि तो पहिला शिक्का उघडत होता. मी जसा येथे आज रात्री होकारात्मक रितीने उभा आहे. मी सुनिश्चित आहे की, हे

शुभवर्तमानाचे सत्य आहे, जे मी आज प्रचार करणार आहे. मी–मी केवळ इतकेच जाणतो की, ते असेच आहे.

39 कारण, जर हे प्रकटीकरण वचनाच्या विरुध्द आहे, तर ते प्रकटीकरण नाही. आणि, तुम्हाला माहीत आहे. तेथे अशा काही व्यर्थ गोष्टी असतात, ज्या दिसण्यास पूर्णपणे सत्य वाटतात, आणि तरीही त्या सत्य नसतात. पाहिले? त्या तशा दिसतात, परंतु त्या तशा नसतात.

40 आता, आपण पाहतो, त्या कोकऱ्याकडे ते पुस्तक आहे. आणि आता आपण 6व्या अध्यायात वाचतो.

> *मग कोकऱ्याने त्या सात शिक्क्यांपैकी एक शिक्का फोडला, ते मी पांहीले, तेव्हा चार प्राण्यांपैकी* एक *मेघगर्जनेसारख्या ध्वनीने ये असे म्हणाला, ते मी ऐकले.*
>
> मग *मी पाहीले, तो एक पांढरा घोडा: आणि त्याच्यावर बसलेला स्वार माझ्या दृष्टीस पडला, त्याच्याजवळ धनुष्य होते. मग त्याला मुकूट देण्यात आला: तो विजय मिळवीत मिळवीत आणखी विजयावर विजय मिळविण्यास निघून गेला.*

41 आता हा पहिला शिक्का आहे, जो आज रात्री, आपण देवाच्या कृपेने समजण्याचा प्रयत्न करणार आहोत...आणि मला लक्षात आले की, जो मनुष्य आपल्या प्रयत्नांनी हे सांगण्याचा प्रयत्न करतो, आणि जर तो काय करीत आहे, हे त्याला माहीत नाही; तर तो धोकादायक मार्गावर चालत आहे. समजले? म्हणून जर ते माझ्याकडे प्रकटीकरणाद्वारे आले; तर तसे मी तुम्हाला सांगेन. जर मी ते माझ्या स्वतःच्या बुध्दीने घेत आहे, तर ते मी–मी तुम्हाला त्याविषयी बोलण्याअगोदर सांगेन. परंतु मी ह्याविषयी सकारात्मक आहे, जसा मी ह्या रात्री येथे उभा आहे. आज, ते माझ्याकडे, सर्वशक्तिमान परमेश्वराकडून नव्याने आले आहे. जेव्हा तेथे शास्त्रलेखाच्या मी–मी...भागाची गोष्ट येते, तेव्हा ह्या गोष्टी अशाच सांगण्याची माझी प्रवृत्ती नाही.

42 तुम्ही पाहा, माझी आशा आहे की, तुम्हाला ठाऊक आहे की, मी कशाविषयी बोलत आहे. आता तुम्हाला माहीत आहे आणि तुम्ही असे सांगू शकत नाही...जर *येथे* असे काही आहे, जे घडण्याअगोदर पडलेले आहे. तर जोपर्यंत ते तेथे आहे, तुम्ही त्याविषयी काही सांगू शकत नाही. समजले? तुम्ही–तुम्ही त्याविषयी वाचत आहात काय? तुम्ही काहीतरी ऐकत आहा? समजले?

43 आता, सात शिक्क्यांचे, गुंडाळलेले पुस्तक हे आता कोकऱ्याद्वारे उघडले जात आहे. आपण ह्या रात्री त्याकडेच जात आहोत. परमेश्वरा, आमचे साहाय्य कर. जसे ते शिक्के फोडले आणि उघडले जातील, तसे ह्या पुस्तकातील गूजे प्रगट केली जातील.

44 आता, तुम्ही पाहा की, हे एक सीलबंद पुस्तक आहे. आता, आपण तसा विश्वास करतो. आपण करतो की नाही? [मंडळी म्हणते, "आमेन"—संपा] आपण विश्वास करतो की, ते सीलबंद पुस्तक आहे. आता, आपल्याला हे अगोदर कधीच ठाऊक नव्हते. परंतु ते आहे. ते सात शिक्क्यांद्वारे सीलबंद केलेले आहे. ते शिक्के, त्या पुस्तकाच्या मागे आहेत, हे पुस्तक सात शिक्क्यांनी सीलबंद केलेले आहे.

45 जर आपण *अशाप्रकारच्या* पुस्तकाविषयी बोलत असतो, तर ते जणू काही त्या पुस्तकावर एक पट्टी, सात पट्ट्या लावण्यासारखे आहे. [भाऊ ब्रॅन्हम उद्हरणादाखल एक पुस्तक दाखवतात—सम्पा.] परंतु हे *तशाप्रकारचे* पुस्तक नाही.

46 ती एक गुंडाळी आहे. आणि जेव्हा ती गुंडाळी बंद आहे, ती एकच आहे. त्यानंतर त्या गुंडाळीत दुसरे दस्ताऐवज आहे. आणि अगदी *तसेच* ह्या पुस्तकाविषयी आहे, परंतु ते एक रहस्य आहे. परंतु, तरीही, आपण त्याचा कसून शोध केला आहे. परंतु लक्षात ठेवा, हे पुस्तक सीलबंद आहे. आणि हे पुस्तक रहस्याचे प्रकटीकरणाचे पुस्तक आहे. हे पुस्तक येशू ख्रिस्ताचे प्रकटीकरण आहे, पाहा, प्रकटीकरणाचे पुस्तक आहे. आणि आता तुम्हाला माहीत आहे की, ह्या सर्व मागील काळात, मनुष्याने ह्या पुस्तकाविषयी शोध केला आणि त्यांविषयी जाणण्याचा प्रयत्न केला आहे. आपणा सर्वांनी केला आहे.

47 आणि अजूनही एक समय मला आठवतो...जर येथे श्रीमान बोहानॉन, किंवा–किंवा त्याचे काही लोक उपस्थित असतीत. मी–मी कुठल्याही प्रकारे येथे कोणाचा अपमान करु इच्छित नाही. श्रीमान बोहनॉन हे माझे घनिष्ट मित्र आहेत, आणि जेव्हा मी तेथे काम करीत होतो. ते सार्वजनिक सेवेचे अधीक्षक होते. जेव्हा माझे प्रथम तारण झाले, मी त्याला प्रकटीकरणाचे पुस्तक वाचण्याविषयी सांगत होतो. ते म्हणाले, "मी ते वाचण्याचा प्रयत्न केला." ते म्हणाले, आणि श्रीमान बोहनॉन एक चांगले व्यक्ती आहे ते आणि ते–ते एका मंडळीचे सदस्य होते. आणि–आणि मला हे सर्व माहीत नाही की, ते कुठल्या मंडळीचे आहेत, परंतु ते म्हणाले, "मला वाटते की, योहानाने त्या रात्री लाल मिरची पावडरचे जेवण खाल्ले होते, आणि तो भरपेट बिछान्यावर गेला असेल."

48 मी त्यांना म्हणालो, जरी त्यामुळे माझी नोकरी जाऊ शकत होती, मी म्हणालो, "तुम्हाला हे बोलताना लाज वाटत नाही का?" आणि मी तेव्हा एक मुलगा होतो. परंतु मी म्हणालो, "देवाच्या वचनाविषयी असे बोलण्यास तुम्हाला लाज वाटत नाही का?" पाहीले? तरीही, आणि मी अगदी लहान होतो, त्यापेक्षा जास्त नाही...कदाचित तेव्हा मी 21, 22 वर्षांचा असेन; आणि कामाची मंदी होती आणि मी तणावग्रस्त होतो. परंतु, तरीही, माझ्यात परमेश्वराचे भय होते, जेव्हा मी...परमेश्वराच्या वचनाविषयी काही अपशब्द ऐकत असे, मला आघात पोहचत असे. परमेश्वराचे वचन सत्य आहे; पूर्णतः सत्य आहे. म्हणून, ते काही स्वप्न किंवा भयंकर स्वप्न नव्हते, जे योहानाने पाहिले होते आणि योहनाने तसे भोजन खाल्ले नव्हते.

49 तो पात्म बेटावर ह्यासाठी होता की, त्याने देवाचे वचन पुस्तकाच्या रुपात द्यावे. आणि रोमी सरकारने त्याला देशातून काढून त्याला बेटावर टाकले होते. आणि प्रभूच्या दिवशी, तो त्या बेटावर होता आणि त्याने त्याच्या मागे पुष्कळ जलांसारखी वाणी ऐकली, आणि ती पाहण्यासाठी तो वळला, आणि त्याने तेथे सोन्याच्या सात समया पाहील्या. आणि तेथे त्यांच्यामध्ये, देवाचा पुत्र उभा असलेला पाहिला, आता

50 आणि, आता, हे पुस्तक प्रकटीकरण आहे. म्हणून, प्रकटीकरण म्हणजे काही गोष्टी प्रगट करणे, काही गोष्टी प्रगट केल्या जातात. आणि आता लक्ष द्या, म्हणून तुम्ही हे विसरु नका, हे "अंतिम समयापर्यंत बंद आहे." समजले? त्याचे संपूर्ण रहस्य "अंतिम समय येईपर्यंत बंद आहे." येथे शास्त्रलेखात आपण असे पाहतो.

51 आता, जेव्हा शिक्के फोडले गेले. तेव्हा ह्या पुस्तकातील रहस्ये प्रगट केली गेली. आणि जेव्हा शिक्के पूर्णपणे फोडले गेले, मुक्तिचा समय समाप्त झाला; कारण कोकऱ्याने मध्यस्थीचे कार्य बंद करुन, त्याचा दावा करण्यासाठी पुढे जातो. तो आमच्यामध्ये, मध्यस्थ होता. परंतु जेव्हा शिक्क्यांचे खरे प्रकटीकरण मिळते, जेव्हा ते फोडले जातात, कोकरा पवित्र स्थानातून बाहेर येतो. हे वचनाप्रमाणे आहे. आपण ते काल रात्री वाचले. तो त्यांच्यामधून बाहेर येतो...आणि ते पुस्तक घेतो, म्हणून ह्यापुढे तो मध्यस्थ नाही,

कारण आता ते त्याला सिंह म्हणतात, म्हणजे–म्हणजे महाराजा आहे, आणि तेव्हा तो मध्यस्थ नाही.

52 वास्तवात, ह्या शिक्क्यांच्या अभिनेत्याची सुरुवात पहिल्या मंडळीच्या युगात झाली, आता लक्षात ठेवा, ह्यासाठी तुम्हाला–तुम्हाला त्याची पार्श्वभूमी सविस्तरपणे कळेल, जर शक्य असेल. आपण सविस्तरपणे हे वाचू. “अभिनेता,” हा शब्द मी वापरतो; कारण अभिनेता हा एक असा मनुष्य असतो. जो आपला मुखवटा बदलतो. समजले?

53 आणि ह्या नाटकात, आज रात्री, आपण पाहणार आहोत की, तो सैतान आहे, जो त्याचा मुखवटा बदलत असतो. आणि, सर्वच, अभिनेते.

54 ख्रिस्ताने, त्याच्या अभिनयाचा भाग केला, जेव्हा तो आत्म्यापासून एक मनुष्य झाला. त्याने फक्त एका अभिनेत्याचे वस्त्र घातले, मनुष्य देह धारण केला, आणि मनुष्याचा रुप घेऊन तो खाली आला, ह्यासाठी की, त्याने सोडविण्याजोगा निकटचा आप्तजन व्हावे.

55 आता–आता, तुम्ही पाहा, हे फक्त त्या अभिनेत्याचे रुप आहे. हेच कारण आहे की, हे सर्व दाखल्याच्या रुपात आहे आणि...आणि जसे ते येथे आहेत, प्राण्यासारखे, आणि पशू, इत्यादी. ते एक प्रकारे अभिनय आहे. आणि ह्या अभिनेत्यांची सुरुवात पहिल्या मंडळीच्या युगात झाली, कारण तो ख्रिस्त होता. जो स्वतःला सात मंडळीच्या युगांत प्रगट करीत होता. आता तुम्हाला हे समजले? [मंडळी म्हणते, “आमेन.”—सम्पा.] ठीक आहे. पाहिले? ख्रिस्त स्वतःस सात मंडळीच्या युगांना प्रगट करीत आहे.

56 मग, ह्या मंडळीच्या युगांत, खुप गोंधळ निर्माण झाला होता. नंतर, मंडळीच्या युगाच्या शेवटी, सातव्या दूताचा संदेश ही हरवलेली रहस्ये घेऊन मंडळीला देण्यासाठी आहे. समजले? आता आपण त्याकडे लक्ष देऊया.

57 परंतु तेव्हा त्या वास्तविक रीतीने प्रगट झाल्या नव्हत्या. आता, बायबलच्या वेळेस, ही रहस्ये तेथे होती, आणि त्यांनीही ह्या गोष्टी घडताना पाहिल्या, जशा योहानाने येथे पाहील्या. आता तो म्हणाला, “तेथे पांढरा घोडेस्वार आहे.” परंतु त्याचे रहस्य काय आहे. तेथे एक रहस्य आहे, जे त्या स्वाराबरोबर पुढे जाते. आता, ते काय होते, त्यांना माहीत नव्हते. परंतु ते प्रगट होणार होते, जेव्हा कोकरा पित्याचे सिंहासन, त्याची सोडविणाऱ्या आप्ताची मध्यस्थी सोडतो.

58 मी येथे एक लहानशी गोष्ट सांगणार आहे. आता, जर कोणाला ह्या टेप मिळाल्या... तर कोणीही व्यक्ति त्याला पाहीजे, ते बोलू शकतो. त्याला कुठल्याही विश्वासात मानण्याचा अधिकार आहे. परंतु जर...तुम्हाला माहीत आहे. जर कोणी सेवक ह्या टेप आपल्या लोकांच्यामध्ये देऊ इच्छित नाही. तर त्यांना सांगा की, त्या घेऊ नका. परंतु मी...हे ते आहे. ज्या लोकांमध्ये मला बोलण्यासाठी पाठविण्यात आले आहे. मग मला तेच प्रगट केले पाहीजे, जे सत्य आहे. समजले?

59 आता, जेव्हा कोकरा *तेथे* मध्यस्थीचे कार्य करीत होता. तो जाणत होता की, तेथे म्हणजे त्या पुस्तकात काही नावे आहेत, जी जगाच्या स्थापनेपासून त्यात लिहीली आहेत. आणि जोपर्यंत ती नावे पृथ्वीवर राहणार्यांना प्रगट केली जात नाही, तोपर्यंत त्याला तेथे मध्यस्थ म्हणून राहणे क्रमप्राप्त आहे. तुम्हाला हे समजते का? [मंडळी म्हणते, “आमेन.”—सम्पा.] पूर्णतः, पूर्वनियुक्ती! पाहीले? अगदी बरोबर. त्याला तेथे राहावे लागेल, कारण तो त्यांच्यासाठी मरण्यास आला ज्यांना देवाने सार्वकालिक जीवनासाठी नियुक्त केले होते. पाहिले? समजले? त्याच्या पूर्वज्ञानाद्वारे, त्यांना त्याने पाहिले. त्यांच्या स्वतःच्या इच्छेने नव्हे; त्याची इच्छा होती की कोणाचाही नाश होऊ नये. परंतु त्याच्या

पूर्वज्ञानामुळे त्याला माहीत होते की, कोणाचा नाश होईल आणि कोणाचा होणार नाही. म्हणून, जोपर्यंत तेथे एक नाव आहे, ज्याची पृथ्वीवर घोषणा केली जात नाही, तोपर्यंत ख्रिस्ताला त्या नावाची काळजी घेण्यासाठी, तेथे मध्यस्थ म्हणून राहणे क्रमप्राप्त आहे.

60 परंतु जसे ते शेवटचे नाव त्या क्लोरोक्स किंवा ब्लीचमध्ये पडले जाईल, मग त्याचे मध्यस्थीचे दिवस समाप्त होतील. “मलिनतेने वागणारा माणूस स्वतःला मलिन करीत राहो. पवित्राचरणी माणूस, स्वतःला पवित्र करीत राहो.” पाहा? आणि तो पवित्र स्थान सोडतो आणि मग ती जागा एक न्यायासन बनते. ख्रिस्ताबाहेर असणार्यांचा तेव्हा धिक्कार असो!

61 आता लक्ष द्या, परंतु ते तेव्हा प्रगट केले जाईल, जेव्हा कोकरा पित्याकडील मध्यस्थीचे कार्य सोडील. आता, तेच प्रकटीकरण 5 आहे. आता तो शिक्क्यांचे पुस्तक घेतो, शिक्क्यांचे पुस्तक किंवा शिक्क्यांनी सीलबंद केलेले पुस्तक. शिक्के फोडतो आणि त्यांना दाखवतो. पाहा. आता युगाच्या शेवटी, मध्यस्थीचे कार्य संपल्यावर, मंडळीची युगे समाप्त होतात.

62 तो पहिल्या युगात, इफिस मंडळीच्या युगात येतो; आणि एक संदेश वाहकास पाठवतो, स्वतःस प्रगट करतो.

63 जस जसे आपण पुढे जातो; लक्ष द्या की काय घडते. येथे त्याची योजना आहे. पहिली गोष्ट जी स्वर्गात घडते ती ही की, तेथे एक–एक स्वर्गात प्रथम त्याची घोषणा होते, काय घडते? एक शिक्का उघडला जातो. तो काय आहे? एक रहस्य उघडले जाते. पाहीले? आणि जेव्हा रहस्य उघडले, तेव्हा एक तुतारीचा नाद होतो. ती एका युध्दाची घोषणा करते. एक पीडा येते, आणि एका मंडळीच्या युगाचा प्रारंभ होतो. पाहा?

64 हे “युध्द” काय आहे? मंडळी युगाचा दूत परमेश्वराचे गूज घेतो, तरीही ते गूज पूर्णपणे प्रगट झाले नाही. परंतु जेव्हा तो देवाचे गूज घेतो, आणि जेव्हा त्याला ते गूज देण्यात येते, तेव्हा तो लोकांपुढे जातो. लोकांपुढे जातो! तो तेथे बाहेर काय करतो? तो त्या संदेशाची घोषणा करण्यास प्रारंभ करतो. आणि मग कशाची सुरुवात होते? एका युध्दाची, अर्थात एक आत्मिक युध्द.

65 आणि मग देव त्याच्या दूताला ह्या युगाच्या निवडलेल्या लोकांबरोबर आपल्याकडे बोलावतो, आणि झोपवतो; आणि मग तो त्यांच्यावर पीडा आणतो जे त्या युगाच्या संदेशाला नाकारतात; एक तात्पुरता न्याय.

66 आणि जेव्हा ते समाप्त होते; नंतर त्याचा संदेश पुढे जात राहतो, आणि लोक त्याचा संप्रदाय करतात, आणि त्यांत संप्रदाय आणतात, आणि त्याद्वारे मनुष्याचे कार्य चालू होते, ज्याप्रमाणे वेस्ली आणि त्यांच्यातले सर्व. आणि मग त्याची स्थिती पुन्हा बिघडते.

67 आणि मग दुसरे गूज पुढे येते. तेव्हा काय घडते? मग त्या मंडळीच्या युगासाठी दुसरा संदेशवाहक, ह्या पृथ्वीवर येतो. समजले? जेव्हा तो येतो, एक तुतारीचा नाद होतो. तो युध्दाची घोषणा करतो. समजले? आणि मग काय घडते? शेवटी, त्याला उचलले जाते. आणि जेव्हा तो निघून जातो, पृथ्वीवर पीडा येते. त्यांचा नाश करते. आत्मिक मृत्यु मंडळीवर आघात करते, आणि तिचा नाश होतो. त्या समुहाचा नाश होतो.

मग तो दुसऱ्या युगाकडे जातो. ओह, ही परमेश्वराची महान योजना आहे!

68 हा क्रम चालत राहतो, जोपर्यंत शेवटचा दूत येत नाही. आता त्याच्याकडे निश्चित गूज नाही. परंतु तो त्या सर्व गोष्टी एकत्रित करतो, ज्या दुसऱ्या युगात हरवलेल्या होत्या, ते सर्व सत्य जे अजूनपर्यंत खऱ्या रितीने प्रगट केले नव्हते, आणि पाहा जसे प्रकटीकरण

येते. तेव्हा तो त्याच्या दिवसात ह्या गोष्टी प्रगट करतो. जर तुम्हाला हे वाचायचे असेल. ते प्रकटीकरण 10: 1 ते...1 ते 4 मध्ये तुम्हाला ते मिळेल. ठीक आहे. समजले? “ते पुस्तक घेतो, आणि शिक्के फोडतो” आणि सातव्या दूतास दाखवितो. कारण हाच एक सातवा दूत आहे, ज्याची सेवकाई परमेश्वराची गूजे प्रगट करण्याची आहे. आता, आपण हे सर्व मंडळीच्या युगात पाहिले, इतिहासातही पाहीले, आणि सिध्द झाले. पाहा? हा सातव्या मंडळीसाठी दूताचा संदेश आहे. ठीक आहे, जो भूतकाळातील सर्व रहस्ये, सर्व गोष्टी प्रगट करतो. प्रकटीकरण 10:1–7, ह्याविषयी सांगते. आता, लक्षात घ्या, “सातव्या देवदूताच्या दिवसात, म्हणजे तो देवदूत कर्णा वाजविण्याच्या बेतात असेल, तेव्हा देवाने आपले दास संदेष्टे ह्यास सुवार्ता सांगितली, तद्नुसार त्याचे गूज पूर्ण होईल.”

69 ह्याप्रकारे, आरंभीच्या मंडळीच्या युगात, गोष्ट आली. काही वेळानंतर, आपण हे पाहूया एक सिध्दांत आणि, प्रथम, ते एक प्रसिध्द सुवचन होते; नंतर एक सिध्दांत; आणि मग ते नियम बनतात; मग एक मंडळी, आणि हेच अंधाराच्या युगात झाले होते.

70 नंतर ह्या अंधाराच्या युगातून पहिली सुधारणा आली, ती लूथरद्वारे आणि त्याने, त्याच्या बरोबर, सर्व प्रकारच्या रहस्यमय गोष्टी आणल्या ज्या त्या मंडळीच्या युगात घडल्या होत्या. परंतु त्याने त्यात पूर्ण रीतीने सुधार केला नव्हता.

71 त्यानंतर वेस्ली, पवित्रीकरणाचा संदेश घेऊन आला आणि त्याने त्यात थोडी अधिक सुधारणा केली. तरीही, पूर्णपणे केली नाही; प्रत्येक ठिकाणी काहीतरी कमतरता ठेवली, जसे पाण्याच्या बाप्तिस्माऐवजी शिंपडणे. आणि लुथरने “प्रभू येशू ख्रिस्ताच्या” ऐवजी “पिता, पुत्र, पवित्र आत्म्याचा” बाप्तिस्म्यासाठी उपयोग केला. अशा प्रकारच्या वेगळया गोष्टी!

72 त्यानंतर पेंटेकॉस्टल युग, पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्यासह आले, आणि ते त्यावरच संकुचित होऊन राहीले. आता, त्यानंतर तेथे आणखी युगे असू शकत नाही. हेच सर्वकाही आहे. ते फिलदेल्फिया...किंवा आता लावदिकिया युग. परंतु तेव्हा...

73 आपण शास्त्रलेखाच्या अभ्यासात पाहतो की, प्रत्येकवेळी, युगाचा संदेशवाहक त्या युगाच्या शेवटी येतो. पौल त्याच्या युगाच्या शेवटी आला. आयरेनियस त्याच्या युगाच्या शेवटी आला. मार्टिन, युगाच्या शेवटी आला. लुथर कॅथलिक युगाच्या शेवटी आला. आणि (काय?—) वेस्ली लुथरन युगाच्या शेवटी आला. आणि पवित्रीकरणाच्या युगाच्या शेवटी पेंटेकॉस्ट किंवा पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा आला.

74 आणि पेंटेकॉस्ट युगाच्या शेवटी, वचनानुसार, आपल्याकडे एक दूत आला पाहिजे, परमेश्वर ते आज रात्री, तुम्हास दाखविण्यासाठी माझे साहाय्य करो. आपल्याला एक संदेशवाहक मिळेल, जो आतापर्यंत असलेल्या सर्व चुकीच्या गोष्टींची सुधारणा करील आणि देवाची संपूर्ण गूजे, त्याच्या रुपांतर होणाऱ्या मंडळीस प्रगट करील.

75 आणि नंतर तेथे सात रहस्यमय गर्जना होतात. ज्याविषयी काहीच लिहून ठेवलेले नाही. ते बरोबर आहे. आणि माझा विश्वास आहे की, त्या सात गर्जनेद्वारे शेवटच्या दिवसात वधूला प्रगट केले जाईल. ह्यासाठी की, वधू रुपांतराच्या विश्वासासाठी एकत्रित केली जाईल. कारण, आता जे आपल्याकडे आहे, ते आपण करण्यास समर्थ नसणार. तेथे काहीतरी आहे. आपल्याला अजून पुढे जायचे आहे. आपल्याकडे दैवी आरोग्य मिळू शकेल इतका पुरेसा विश्वास नाही. जवळ–जवळ नाहीच. आपल्याकडे रुपांतरासाठी पुरेसा विश्वास असला पाहिजे की, क्षणात आपण बदलले जाऊ, आणि ह्या पृथ्वीवरुन उडून वर जाऊ. आणि जर प्रभूची इच्छा असेल, थोड्या वेळानंतर, आपण पाहू की ते, कुठे लिहीलेले आहे.

76 ह्यानंतर, कुकर्म करणाऱ्या सर्वांचा न्याय होईल! आता पाहा की, ह्या शिक्क्यांच्या मागील काळात हे शिक्के फोडले जात आहेत, आता तो शेवटचा शिक्का फोडला गेला. आणि आता ते लोक ह्या शिक्क्यांना पाहात होते. आणि फक्त अनुमान लावीत होते, ते काय करीत होते, ह्यावर अनुमान करीत होते. आता, मंडळीच्या युगाच्या शेवटी, हे सर्व वाईट करणारे येतील आणि महासंकटात टाकले जातील; ह्या सात शिक्क्यांना बिघडविणारे, सर्व जे मंडळीत गुप्तरित्या कार्य करीत होते, ते ही महासंकटात टाकले जातील.

77 आणि एका मिनिटात, आपण पाहू की, त्यांनी मंडळीच्या नावाने काम केले. त्यांनी स्वतःस “देवाची मंडळी” म्हटले. आणि तुम्ही पाहता की, जर ते बरोबर नाही. ह्यात काही आश्चर्य नाही की, मी इतका ह्या संप्रदायाच्या विरुध्द आहे. मला ठाऊक नाही का. पाहीले? समजले?

78 हे संप्रदाय समाप्त होणार आहेत. आता ह्यांची सुरुवात हळूवारपणे झाली, आणि त्यांची हालत दिवसेंदिवस वाईट आणि वाईट होत आहे. जोपर्यंत...आणि लोक त्यात जात आहेत, म्हणत आहेत. “ओह, होय हे अगदी चांगले आहे.” परंतु अंतिम दिवसात, ह्या गोष्टी उघडकीस येतील. आणि शेवटी त्यांची दशा इतकी वाईट होईल की, ते महासंकटाच्या काळात पूर्णपणे टाकले जातील.

79 आणि कोणी व्यक्ती असे कसे सांगू शकेल की, ख्रिस्ताची वधू महासंकटात जाईल? ते समजू शकत नाही. पाहा? तीला तर महासंकटापासून वर उचलले जाईल. जर-जर मंडळीचा न्याय होऊन चुकलेला आहे, आणि त्यांनी त्यांचा न्याय केलेला आहे, आणि येशूचे रक्त स्विकारलेले आहे, परमेश्वर त्या व्यक्तिचा न्याय कसा करील, जो पूर्णपणे पापरहीत आहे.

तुम्ही म्हणता, “असा कोणीही व्यक्ती नाही.”

80 प्रत्येक नविन जन्म पावलेला विश्वासी, खरा विश्वासी, देवासमोर पूर्णपणे, संपूर्णतः पापरहीत आहे. तो त्यांच्या कर्मावर विश्वास ठेवीत नाही, परंतू येशूच्या रक्तावर करतो. ज्यामध्ये त्याची पापकबुली पडलेली आहे. बायबल असे सांगते, पाहिले? “जो देवापासून जन्मलेला आहे, तो पाप करीत नाही. कारण त्याच्याने पाप करवत नाही.” तुम्ही एका व्यक्तिला पापी कसे बनवू शकता. जेव्हा येशू ख्रिस्ताचे रक्त विरंजक त्याच्यामध्ये आणि देवामध्ये आहे? येशू ख्रिस्ताचे रक्त पापास छिन्न विछिन्न करुन टाकते, जोपर्यंत ते पूर्णपणे नष्ट होत नाही. पाहीले? ख्रिस्ताचे पवित्र रक्त पापास कसे तेथे आत जाऊ देईल? तो असे करु शकत नाही.

81 येशूने म्हटले, “तुम्ही परिपूर्ण असा, जसा तुमचा स्वर्गिय पिता परिपूर्ण आहे.” आणि आपण परिपूर्ण होण्याचा केवळ विचारही कसा करु शकतो? परंतु येशू ह्याची मागणी करतो आणि जर येशू ह्याची मागणी करतो. तर त्याच्याकडे ते बनविण्याचा मार्ग आहे. आणि त्याच्याकडे; त्याचे स्वतःचे रक्त आहे!

82 आता, सर्व- ती सर्व गूजे प्रगट झाली आहेत. जी मागील काळात गुप्त होती. आता, विचार की, जी गूजे मागील काळात गुप्त होती आणि मंडळीच्या युगात झाली, अंतिम समयात जेव्हा शिक्के फोडले जातील, मध्यस्थीचे कार्य समाप्त होईल, तेव्हा प्रगट केली जातील.

83 तेव्हा, न्याय त्या लोकांची प्रतिक्षा करील. जे वाचतील त्यांना न्यायातून जावे लागेल. असे तेव्हा होईल, जेव्हा वधू दृश्यातून वर घेतली जाईल.

84 ओह, आपण शास्त्रलेख वाचूया. तुम्हा सर्वांना काही शास्त्रलेख लिहून घ्यायला आवडेल का? आपण थेस्सलनीकाकरांचे दुसरे पत्र, काही क्षणात पाहूया आणि येथे थोड्या वेळेसाठी अभ्यास करुया. येथे-येथे किती सुंदर चित्रण केले आहे! मला ते आवडते आणि आपण पाहूया. होय, थेस्सलनीकाकरांस पत्र आणि मी थेस्सलनीकरांस दुसरे पत्र, दुसरा अध्याय घेऊ इच्छितो, आणि 7वे वचन. आपण दूसरे थेस्सलनीकाकरांस पत्र 2:7 पाहूया! मला वाटते बरोबर आहे, आता. मी ते थरथरत आणि कापत, लिहीले आहे होते.

*...कारण अनीतीचे रहस्य आताच आपले कार्य चालवीत आहे: परंतु जो... आता प्रतिबंध करीत आहे, तो मधून काढला जाईपर्यंत प्रतिबंध करीत राहील.*

85 कोण? "तो जो प्रतिबंध." पाहिले. पाहा, एक रहस्य. "अनीतीचे रहस्य," जे मागील काळात पहिल्या मंडळीच्या युगापासून येथे होते. येथे पौल लिहून, हे सांगत आहे. "अनीतीचे रहस्य." अनीती काय आहे? अनीती म्हणजे असे काही जे तुम्हाला माहीत आहे की, तुम्ही ते करावयास नको होते, आणि तरीही तुम्ही कसेही करुन ते करता. आणि पौल म्हणतो की, आज पृथ्वीवर अनीती करणारे आहेत. ओह, जर तुम्ही...आपण त्यातील पुढची वचने वाचणार आहोत...आपण काही मिनिटात तो भाग वाचूया. तिसऱ्या वचनापासून, थोडे पुढे सुरुवात करुया.

*कोणत्याही प्रकारे कोणाकडून फसू नका: कारण त्या दिवसाच्या अगोदर विश्वासाचा त्याग होऊन तो* (एम-ए-एन) *अनीतीमान पुरुष प्रगट होईल. तो नाशाचा पुत्र;* (खरे आहे)

विरोधी *व ज्याला देव किंवा भजनीय म्हणून म्हणतात, त्या सर्वांपेक्षा स्वतःला* उंच *करणार. म्हणजे मी देव आहे,* पापक्षालन करणारा, *असे स्वतःचे* प्रदर्शन *करीत देवाच्या मंदिरात बसणारा असा आहे.*

*मी तुमच्याबरोबर असताना हे तुम्हास सांगत असे, ह्याची तुम्हास आठवण नाही काय?*

86 मला वाटते की मी पौलाच्या काही शिकवणी बसून ऐकू. तुम्हालाही असे वाटत नाही का?

*त्याने नेमलेल्या समयीच प्रगट व्हावे, अन्य वेळी होऊ नये; म्हणून जे आता प्रतिबंध करीत आहे, ते* तुम्हास *ठाऊक आहे.*

87 तेव्हा नाही, पाहा, तेव्हा नाही; परंतु "नेमलेल्या समयीच." पाहा, तो शिक्का फोडला जाईल तेव्हा. आपल्याला ठाऊक आहे की, ते काय आहे. तो अनीतीमान पुरुष कोण आहे? तो पापी मनुष्य कोण आहे, हा पुरुष अनीतीचे कार्य चालवीत आहे? "परंतु तो नेमलेल्या समयीच प्रगट होईल."

*अनीतीचे रहस्य आताच* कार्य *करीत आहे.* (फसविणारे, तुम्हाला माहीत आहे. लोकांना काहीतरी गोष्टीत फसवितात. पाहा.) *फक्त तो* (परमेश्वर) जो *आता प्रतिबंध करीत आहे. तो,* (मंडळी, ख्रिस्त वधू) *मधून काढला जाईपर्यंत.*

*आणि मग* तो *अनीतीमान पुरुष प्रगट होईल...*

88 शिक्का फोडण्याच्यावेळी "नेमलेल्या वेळी." पौल म्हणाला, "माझ्या वेळेत नाही, परंतु त्या वेळेत जेव्हा प्रगट केला जाईल." पाहीले?

*...त्याला प्रभू येशू आपल्या मुखांतील श्वासाने मारुन टाकील...*

89 आपण त्याकडे थोड्या वेळाने जाणार आहोत, "त्याच्या मुखातील श्वासाने." लक्ष द्या ते काय आहे.

*...आणि तो येताच आपल्या दर्शनाने त्याला नष्ट करील:*

*त्याच्यासाठी सैतानाच्या कृतीप्रमाणे...*

90 त्याची, "त्याची," तो मनुष्य ज्याची कृती सैतानाच्या कृतीप्रमाणे आहे.

*...सर्व प्रकारची खोटी महत्कृत्ये, चिन्हे आणि अद्भूते,*

*आणि सर्व प्रकारची फसवणूक करणारी अनीती लोकांना अनीतीने फसवील आणि ज्यांचा नाश होत चालला आहे. (त्याची वधू नाही) त्यांनी आपले तारण साधावे, म्हणून सत्याची आवड धरावयाची ती धरली नाही...*

91 आणि ख्रिस्तच सत्य आहे, आणि ख्रिस्तच वचन आहे; परंतु ते वचनाऐवजी मानवी मते ते स्विकारतात. होय! समजले?

*...ज्यामुळे त्यांचा उद्धार व्हावा.*

*त्यांनी असत्यावर विश्वास ठेवावा. म्हणून देव त्यांच्या ठायी भ्रांतीचे कार्य* चालेल *असे करितो.*

92 येथे भाषांतर असे व्हायला पाहिजे, जसे मी लेक्सीकॉन शब्दकोशात पाहिले आहे. "विशेष खोटे" असे व्हायला पाहिजे. "साधारण खोटे" नाही. "विशेष खोटे," जे त्याने हव्वेला सांगितले होते.

*ज्यांनी...सत्यावर विश्वास ठेवला नाही. तर अनीतीत संतोष मानला, त्या सर्वांस शासन व्हावे म्हणून असे होईल.*

93 काय विधान आहे! माझ्या देवा! वधू वर उचलली गेल्यावर, हा पापी मनुष्य स्वतःस प्रगट करील.

94 ती, ख्रिस्ताची वधू, ही प्रत्येक मंडळीच्या युगातून निवडलेली आहे.

95 आता, त्या दिवशी मी वक्तव्य केले, "वधू तिच्या घरी जाईल आणि तुम्हाला त्याविषयी कदापी कळणार नाही." ते खरे आहे.

96 कोणी म्हणाले, "भाऊ ब्रॅन्हम ठीक आहे, तो एक सामर्थ्यशाली छोटा समुह असेल."

97 येशू म्हणाला, "जसे नोहाच्या दिवसात होते," आता तुम्ही ह्याविषयी त्याच्याशी बोला, पाहा, "जेथे आठ आत्मे जलप्रलयातून वाचले, तसेच मनुष्याच्या पुत्राच्या येण्याच्या वेळी होईल." जर आठशे ह्या रात्री रॅपचरमध्ये गेले. तुम्ही उद्या किंवा नंतरच्या दिवशी किंवा नंतर कुठल्या समयी त्याच्याविषयी एक शब्दही ऐकणार नाही. ते निघून जातील आणि तुम्हाला त्याविषयी काही कळणार नाही. पाहा, ठीक असेच असणार आहे.

98 मी काय सांगण्याचा प्रयत्न करीत आहे? मी तुम्हाला घाबरवण्याचा प्रयत्न करीत नाही, तुम्हाला चिंतेत टाकत नाही. माझी—माझी इच्छा आहे की, तुम्ही आपल्या पायावर उभे राहावे. तयार असावे, प्रत्येक समयी, जागृत असावे. तुमच्या निरर्थक गोष्टी सोडून द्याव्या. परमेश्वराशी आपला संबंध ठीक करा, कारण तुम्ही विचार करण्याआधी हे सर्व घडेल.

आता, तुम्ही खऱ्या वधूकडे, लक्ष द्या!

99 आता, तेथे खोटी वधूही आहे. आपल्याला ह्याविषयी प्रकटीकरण 17व्या अध्यायात कळते. ती म्हणते, “मी विधवा आहे, आणि मला कशाची गरज नाही,” तुम्हाला समजले की, ती किरमीजी रंगाच्या पशूवर बसलेली आहे, आणि पशूवर बसली आहे.

100 आता, परंतु खरी वधू, हजारो, हजारो लोकांमधून बनवलेली असेल, परंतु ती प्रत्येक मंडळीच्या युगामधून निवडलेली असेल. प्रत्येक वेळी एक संदेश येतो, आणि काही लोकं त्यावर विश्वास ठेवतात आणि त्याचा संदेश स्विकारतात, ते त्या प्रकाशात असतात, जेव्हा त्यांच्यावर मुक्तीच्या दिवसापर्यंत शिक्का मारण्यात येतो.

101 येशूने ही गोष्ट शिकवली की नाही, जेव्हा तो म्हणाला, “सातव्या प्रहरी वाणी आली?” शेवटचे मंडळीचे युग आहे. पाहिले? आणि म्हणाला, “वर आला आहे. त्याला सामोऱ्या चला.”

102 आणि तेव्हा मुर्ख कुमारिका आल्या, त्यांनी डोळे चोळले, आणि म्हणाल्या, “तुम्ही आम्हास तुमच्या तेलातून काही द्या. हे योग्य होईल की, तुम्ही आता तेल जमा करा.”

103 आणि वास्तविक, खरी वधू तेथे उभी होती, म्हणाली, आम्हास पुरेल इतके तेल आहे. “आमच्याकडे आम्हास पुरेल इतके तेल आहे. आम्ही तुम्हास काहीच देऊ शकत नाही. जर तुम्हाला पाहिजे असेल, तर तुम्ही जाऊन प्रार्थना करा.”

104 आणि त्या विकत घ्यावयास गेल्या असता, वर आला आणि वधू आत गेली. आणि तेव्हा दुसऱ्या तेथे राहिल्या. त्या ज्या पूर्णपणे नीतीमान होत्या, मंडळी, त्या बाहेर राहील्या. आणि तो म्हणाला, “तेथे रडणे आणि विलाप आणि दात खाणे होईल.”

105 पाहा, आता, ते निवडलेले आहे. आणि जेव्हा वराची हाक येते, “वर येतो,” तेव्हा त्यांच्यातील प्रत्येक जण जे त्या मंडळीच्या युगात झोपी गेले होते, ते प्रत्येक जण, उठविले जातील. पाहा, तो परमेश्वर नाही, जसे आपण विचार करु की, जे काही ह्या युगातले हजारो लोक त्याचा शोध करतील आणि त्यांनाच तो घेऊन जाईल. प्रत्येक युगातील ते खास निवडलेले लोक आहे आणि हेच कारण आहे की, ख्रिस्ताला त्या मध्यस्थीच्या आसनावर एक मध्यस्थ म्हणून राहण्याचे अगत्य आहे, जो पर्यंत ह्या शेवटच्या युगातील शेवटचा मनुष्य आत येत नाही. आणि मग हे प्रकाशन की, ते काय होते, ते लोकांना प्रगट केले जाईल, आणि ते पाहतील की काय घडले होते. समजले? तुम्हाला हे आता समजले का? [मंडळी म्हणते, “आमेन.”—संपा.] ठीक आहे.

106 लक्ष द्या, “बाकीचे मेलेले,” मंडळीचे सदस्य, “ते परत जीवंत होणार नाही, जोपर्यंत एक हजार वर्षाचा काळ समाप्त होत नाही.” मंडळीचे सदस्य, ते ख्रिस्ती, चर्च, पुन्हा जीवंत होणार नाही, जोपर्यंत हजार वर्षाचा काळ समाप्त होत नाही. आणि नंतर ते वधूसमोर, बरोबर आहे, राजा आणि राणी समोर, उभे राहण्यासाठी पुढे येतील. महिमा असो!

काही मंडळया आज स्वतःला, “स्वर्गाची राणी,” म्हणून संबोधतात.

107 स्वर्गाची राणी ही ख्रिस्ताची पसंत केलेली वधू आहे, आणि ती त्याच्याबरोबर येईल. दानीएलाने हे बघितले, आणि म्हणाला “हजारो हजार लोक त्याची सेवा करीत होते.” आता जर तुम्ही तेथे त्या शास्त्रलेखात पाहिले, दानीएलाच्या पुस्तकात “न्यायसभा भरली, आणि पुस्तके उघडली गेली.” आता लक्ष द्या, जेव्हा तो येतो, तो त्याच्या वधूबरोबर येतो. पत्नी तिच्या पतीची सेवा करते. “आणि हजारो लोक त्याची सेवा करीत होते. न्यायसभा भरली होती, आणि वह्या उघडल्या होत्या.” “आणि दुसरे पुस्तक उघडले गेले, जे जीवनाचे पुस्तक आहे,” ही वधू नाही, मूळीच नाही. ती तर वर गेली होती

आणि परत आली, तेथे त्या पिढ्या ज्यांनी सुवार्तेचा संदेश नाकारला होता. त्यांचा न्याय करण्यासाठी उभी आहे.

108 येशूने म्हटले नव्हते काय? "दक्षिणेकडची राणी न्यायकाळी ह्या पिढीबरोबर उठून हिला दोषी ठरवील; कारण ती शलमोनाचे ज्ञान ऐकावयास पृथ्वीच्या सीमेपासून आली, आणि शलमोनापेक्षा थोर असा एक येथे उभा आहे." तेथे न्यायसमयी, शबाची राणी, दक्षिणेची राणी उभी राहील आणि तीची स्वतःची साक्ष देईल.

109 तेव्हा केवळ यहूदी नव्हे जे त्या पीढीच्या लोकांबरोबर जे यहूदी होते, त्यांच्यासह येतील आणि ते आंधळे होते आणि त्यांनी त्याला ओळखले नाही. कारण ते त्याची वाट पाहत होते, परंतु तो इतक्या साधेपणात आला की, त्यांच्या डोक्यावरुन निघून गेला, अशाप्रकारे.

110 आणि, तेथे, त्या महान राणीने स्वतःला नम्र केले, आणि ती आली आणि संदेशाचा स्विकार केला. "आणि ती न्यायसमयी उभी राहील," तो म्हणाला, "आणि ह्या पिढीला दोषी ठरवील."

111 आता तुम्ही नेहमीच तीन प्रकारचे लोक पाहता. एक पुस्तक ज्यात मृतांचा न्याय केला गेला. दुसरे पुस्तक जीवनाचे पुस्तक. हे ते पुस्तक आहे, ज्यात त्यांची नावे जीवनाच्या पुस्तकात लिहीली आहेत.

112 ते म्हणतात, "जर तुमचे नाव जीवनाच्या पुस्तकात आहे, तर ते ठीक आहे. ओह?" नाही महाशय!

113 पाहा, यहुदा इस्कर्योत त्याचे नाव जीवनाच्या पुस्तकात होते. आता तुम्ही म्हणाल, ते चुकीचे आहे? येशूने, मत्तय 10 मध्ये, त्यांना अशुध्द आत्म्यांवर सत्ता देऊन ते काढून टाकण्याचा, व सर्व विकार, व सर्व दुखणी बरी करण्याचा आणि कुष्ठरोग्यांना शुध्द करण्याचा, आणि मृतांना जीवंत करण्याचा अधिकार दिला. आणि ते बाहेर गेले. आणि परत आले, यहुदा त्याच्या समवेत होता. आणि त्यांनी भुते काढली आणि सर्व प्रकारचे चमत्कार केले. आणि परत आले, आणि म्हणाले, "भूतेही आम्हास वश होतात."

114 येशू म्हणाला, "भूते वश होतात, म्हणून आनंद करु नका, परंतु आनंद करा की, तुमची नावे स्वर्गात लिहीली आहेत." आणि यहुदा त्यांच्यासमवेत होता. परंतु काय झाले? जेव्हा तेथे गोष्ट निवडलेल्या समुहाची येते, की पेंटेकॉस्टला वर जावे आणि खरोखरीच पवित्र आत्मा स्विकारावा, यहुदाने त्याचा रंग दाखविला. तो न्यायाच्या वेळी तेथे असेल.

115 म्हणून वह्या उघडल्या गेल्या; आणि एक पुस्तक, जीवनाचे पुस्तक, उघडले गेले; आणि प्रत्येक मनुष्याचा अशाप्रकारे न्याय झाला. आता, वधू तेथे ख्रिस्ताबरोबर जगाचा न्याय करण्यासाठी उभी आहे. करु नका, पौलाने असे म्हटले, "तुमच्यापैकी कोणाएकाचा," दुसऱ्याबरोबर वाद असला, "तर त्याचा निकाल लावून घेण्यासाठी तो आपले प्रकरण पवित्र जणांपुढे न आणता अनीतीमानांपुढे नेण्याचे धाडस करीत आहे काय? पवित्र जन जगाचा न्यायनिवाडा करतील, हे तुम्हास ठाऊक नाही काय?" पाहा? तेथे तुम्ही आहात. पवित्र जन जगाचा न्याय करणार आहेत आणि ते ताब्यात घेतील. ते बरोबर आहे.

116 तुम्ही म्हणता, "ह्या जगात, ह्या लहान समुहाद्वारे हे कसे होणार आहे?" मला माहीत नाही, हे कसे होणार आहे. परंतु तो म्हणाला, हे होणार आहे, जितके मला माहीत आहे. ते असेच आहे.

117 आता पाहा, लक्ष द्या. "उरलेले, मेलेले, राहतील." मंडळीचे सदस्य, मेलेले मंडळीचे सदस्य, "जीवंत होणार नाही, जोपर्यंत हजार वर्षांचा काळ संपत नाही." आणि हजार वर्षानंतर ते एकत्र होतील, दुसरे पुनरुत्थान येईल जे दुसरे पुनरुत्थान आहे आणि ते एकत्र केले गेले. आणि ख्रिस्त आणि मंडळी, वधू, साधारण मंडळी नाही. वधू, ख्रिस्त आणि राणी, साधारण मंडळी नाही...ख्रिस्त आणि वधू तेथे उभे होते.

118 आणि ते वेगळे केले जातील, ज्याप्रकारे मेंढरे शेरड्यापासून वेगळे केले जातात. ते बरोबर आहे. तेव्हा मंडळीचे सदस्य येतात आणि जर त्यांनी सत्य ऐकले होते आणि सत्याला नाकारले होते, तेव्हा तेथे काय सांगितले जाणार, जेव्हा त्या पडद्यावर सर्व गोष्टी दाखविल्या जाणार. जेव्हा तुमचे स्वतःचे विचारही तेथे दाखविले जातील, त्याविषयी तुम्ही काय विचार केला होता? ह्यापासून तुमची कशी सुटका होणार. आणि ते आकाशाच्या पडद्यावर. आणि देवाच्या मोठ्या टेलीव्हीजनवर दाखविले जाईल. ते तुमचे स्वतःचे विचार बंड करणार आहेत. तुमचे स्वतःचे विचार, त्या समयी तुमच्या विरुध्द बोलतील.

119 म्हणून जर तुम्ही एक गोष्ट बोलता, आणि विचार दुसरा करता, तर तुमच्याकरिता हेच उचित होईल की, तुम्ही तसे करणे थांबवा. तुमचे विचार देवावर केंद्रित करा. त्यांना शुध्द ठेवा, आणि तुमच्या विचारांवर बनून रहा, आणि त्याच गोष्टी नेहमी बोला. समजले? असे म्हणू नका, "ठीक मी सांगेन, मी त्यावर विश्वास ठेवीन. परंतु मी जाईन आणि त्याचा शोध करीन." जर तुम्ही त्यावर विश्वास करता! तर आमेन म्हणा.

120 ह्या प्रकारच्या लोकांकडे, लक्ष द्या, ह्याच कारणांमुळे ते मरतात, ते शुध्दीकरणाच्या परिक्षांच्या महासंकटातून जातात, कारण ते वास्तवात ते रक्ताखाली नाहीत. ते त्याचा दावा करतात की, रक्ताखाली आहेत, परंतु ते नाहीत. ते त्यांना शुध्द करण्यासाठी कसे काय परिक्षेतून जाऊ शकतात, जेव्हा तेथे (विरंजक) येशू ख्रिस्ताचे रक्त आहे, जे तुमच्यातून पापाचे प्रत्येक लक्षण आणि दुर्गूण दूर करुन टाकते? "आणि तुम्ही मृत झाला आहा आणि तुमचे जीवन देवाद्वारे ख्रिस्ताबरोबर गुप्त ठेवलेले आहे आणि पवित्र आत्म्याच्या योगे मुद्रीत केले आहे." तुमचा कशासाठी न्याय होणार आहे? तुम्हाला शुध्दीकरण कोठे मिळणार आहे? जेव्हा तुम्ही पूर्णपणे ख्रिस्तामध्ये, पाप विरहीत आहात, तुम्ही कशाने शुध्द केले जाणार? कसा...न्याय कशासाठी होणार आहे? परंतु हा न्याय झोपी गेलेल्या लोकांचा होणार आहे, जे स्वतःला शुध्द करु शकले नाही.

121 आता, ते वर्षानुवर्षे करु शकले नाही. तुम्ही पाहिले, परंतु हा समय प्रकटीकरणाचा आहे, पाहा, पाहा, वधूच्या येण्याच्यावेळी प्रगट झाले आहे; शेवटच्या समयी सर्व गोष्टी गोळा होत आहेत, मला वाटते, मित्रा, हा अंत येत आहे. केव्हा? मला माहीत नाही, मी–मी तुम्हाला सांगू शकत नाही. परंतु काहीही असो, मला असे जगायचे आहे, जसे काही अंत आज रात्री आहे; मला तयार असले पाहीजे. समजले? तो कदाचित आज रात्री येईल, आणि तो कदाचित आणखी वीस वर्षे येणार नाही. मला माहीत नाही तो कधी येईल. परंतु त्याचे येणे केव्हाही असो...आणि कदाचित माझे जीवन आज रात्री समाप्त होईल; आणि, मग, येथे मी जे काही केले आहे, ते त्याचवेळी समाप्त होईल. मला–मला त्याच्याजवळ न्यायासाठी भेटण्यास जावे लागेल, जशा प्रकारे मी येथे चाललो आहे. "ज्या दिशेला झाड वाकते, त्याच दिशेला ते पडते."

122 लक्ष द्या, जेव्हा त्या तेल विकत घेण्यासाठी गेल्या..."ओह," तुम्ही म्हणाल, "आता एक मिनिट थांबा, भाऊ ब्रॅन्हम. मला त्याविषयी माहीत नाही." जेव्हा त्या तेल विकत घेण्यासाठी गेल्या, जेव्हा त्या परत आल्या, वधू निघून गेली होती. आणि दरवाजा बंद झाला होता. आणि त्यांनी दार ठोठाविले, आणि म्हणाल्या, "आम्हाला आत येऊ द्या,

आम्हाला आत येऊ द्या!" [भाऊ ब्रॅन्हम व्यासपीठ मंचावर खुप वेळा ठोठावतात.—संपा.] परंतु त्या बाहेर अंधारात होत्या.

123 आता जर तुम्ही उदाहरणाद्वारे पाहू इच्छिता, आता, पाहा. "नोहाच्या समयात," येशूने म्हटले, त्याचा उल्लेख केला. आता नोहाच्या समयात ते तारुमध्ये गेले. परंतु ते न्यायाच्या समयातून गेले होते, परंतु ते–ते ख्रिस्ताच्या वधूचे दर्शक नाही.

124 हनोख वधूचे दर्शक आहे. हनोख! नोहा महासंकटाच्या काळातून गेला. आणि तो संकटातून गेला, आणि त्यांतून गेलो आणि तो पिणारा झाला आणि मृत्यु पावला. परंतु हनोख देवासमोर पाचशे वर्ष, चालला, आणि त्याच्याविषयी साक्ष देण्यात आली, त्याने रुपांतराच्या विश्वासाद्वारे "देवाला संतुष्ट केले," आणि त्याने चालण्यास आरंभ केला, आणि तो आकाशात वर गेला, आणि मृत्युची चव न चाखता स्वर्गिय घरी गेला; तो कधीच मेला नाही.

125 हे त्याचे दर्शक आहे, "आपण जीवंत असे उरु, ते आपण झोपी गेलेल्यांच्या आघाडीस जाणारच नाही." हे जे झोपी गेले, ते मानवी वयानुसार झोपी गेले; मानवी अवस्थेत झोपी गेले. ते पूर्वी मृत्यु पावले, परंतु ते मृत नाही. ते झोपी गेलेले आहेत. आमेन! ते झोपी गेलेले आहेत, मृत नाही. आणि फक्त एकच गोष्टीची गरज आहे; ती म्हणजे वराची त्यांना उठविण्याकरिता. होय, "आपण जे जीवंत असे उरु ते, आपण झोपी गेलेल्यांच्या आघाडीस जाणार नाही. कारण आज्ञाध्वनी, आद्यदिव्यदूताची वाणी व देवाच्या तुतारीचा नाद होत असता; प्रभू स्वतः स्वर्गातून उतरेल आणि ख्रिस्तामध्ये जे मेलेले आहेत, ते पहिल्याने उठतील; नंतर जीवंत उरलेले आपण त्यांच्या बरोबर प्रभूला सामोरे होण्यासाठी मेघारुढ असे अंतराळात घेतले जाऊ, आणि तसेच सदासर्वकाळ प्रभू जवळ राहू."

126 "आणि मृतांपैकी बाकीचे लोक, ती हजार वर्षे पूर्ण होईपर्यंत जीवंत झाले नाहीत." असेच आहे. ते महासंकटाच्या काळातून गेले.

127 ते काय आहे? हनोखाप्रमाणे. तुम्हाला माहीत आहे, नोहाची दृष्टी हनोखाकडे होती. कारण, जेव्हा नोहाला कळले की, हनोख निघून गेला आहे. त्याला समजले की न्यायसमय जवळ आला आहे. तो तारुच्या आजूबाजूस राहू लागला.

128 परंतु नोहा वर गेला नव्हता. त्याने एक छोटासा भाग उंच केला, आणि महासंकटाच्या काळात तो पार गेला. त्याला महासंकटाच्या काळातून मृत्युला मारण्यासाठी जावे लागले. पाहीले? परंतु नोहा त्यातून पार गेला.

129 हनोख, मृत्युशिवाय लोकांतरी गेला, तो वधूचे दर्शक आहे, जी ख्रिस्तामध्ये जे झोपी गेलेले, त्यांच्याबरोबर प्रभूला सामोरे होण्यासाठी मेघारुढ अशी अंतराळात घेतली जाईल, आणि उरलेली मंडळी महासंकटाच्या काळात जाईल. मी स्वतःहून ह्यातून दुसरे काही करु शकत नाही. हनोखाचा मृत्यु न होता, तो लोकांतरी गेला.

130 आता, आपण हा विषय समजण्यासाठी थोडा अभ्यास करण्यास सुरुवात करुया. जर मी त्यावर बोलत राहीलो, तर आपण ह्या विषयावर म्हणजेच, शिक्क्यांवर येऊ शकणार नाही. आता लक्ष द्या. आपण हे पाहूया, कारण उद्या कदाचित रात्री किंवा त्या पुढील रात्री आपण, तुतारीचा नाद होणे, हा विषय पाहणार आहोत. कारण तुतारीचा नाद होणे व शिक्क्यांचे फुटले जाणे एकाच समयात होते. ती एकच गोष्ट आहे. मंडळीच्या युगाची सुरुवात होते...तीच गोष्ट, समजले?

131 आता तुतारीचा नाद नेहमीच युध्दास दर्शविते किंवा राजकीय गोंधळास दर्शविते. तुतारीचा नाद राजकीय गोंधळ निर्माण करतो, आणि त्यामुळे युध्दस्थिती उद्भवते. जेव्हा तुम्ही राजकारणात गोंधळ पाहता, सर्वच राजकारणात गोंधळ पाहता. जसे आज आपली राजनैतिक स्थिती आहे. तर तुम्ही समजा की युध्द जवळ आहे. परंतु, पाहा, आजही येथे सैतानाचे राज्य आहे. हा भाग अजूनही त्याच्या हातात आहे.

132 हे असे का आहे? कारण ख्रिस्ताद्वारे त्याची मुक्ति करण्यात आली आहे. परंतु तो सोडविणाऱ्या आप्तजनाचे काम करीत आहे, त्याच्या लोकांस सोडवत आहे. जोपर्यंत शेवटचे (नाव) त्या पुस्तकात आहे, तो सोडविला जात नाही. तसे तर ख्रिस्ताद्वारे त्याची सोडवणूक अगोदरच झाली आहे आणि त्यावर शिक्का मारण्यात आला आहे. आता तुम्हाला हे समजले का? [मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.]

133 तेव्हा तो त्याच्या सिंहासनावरुन, पित्याच्या राजासनावरुन, त्याच्या पुढे येतो, देवाच्या हातून जो राजासनावर बसलेला आहे ते पुस्तक घेतो आणि त्याच्या अधिकाराचा दावा करतो. तो पहिली गोष्ट करतो, ती म्हणजे त्याच्या वधूला बोलावतो. आमेन! नंतर तो काय घेतो? तो त्याचा विरोधी सैतान, ह्यास घेतो, आणि त्याला बांधतो आणि त्याला त्याचे अनुकरण करणाऱ्यासह, अग्नीत फेकतो.

134 आता लक्षात घ्या. ख्रिस्तविरोधी रशिया नाही. ख्रिस्तविरोधी हा एक धूर्त व्यक्ति आहे. फक्त पाहा की, तो किती धुर्त आहे. तो चलाख आहे. होय महाशय, तुम्ही फक्त पवित्र आत्मा घ्या. ती गोष्ट फक्त तुम्हाला त्याच्यापासून दूर ठेवील.

135 लक्ष द्या, तुतारीचा नाद म्हणजे राजकीय गोंधळ, युध्दे. मत्तय 24मध्ये येशू त्याविषयी सांगतो. त्याने म्हटले, "तुम्ही लढायाविषयी ऐकाल व लढायाच्या अफवा ऐकाल. पाहा, सर्वत्र हेच ऐकाल." तुम्ही लक्षात घ्या की, येशू हे बोलत आहे की, "लढाया, अफवा आणि लढाया, आणि शेवटपर्यंत होतील." आता, पाहा, हेच तुतारीचा नाद होणे आहे.

136 आता, जेव्हा आपण तुतारीच्या विषयाकडे जाऊ; आपल्याला पुन्हा हे पाहायला मिळेल आणि आपण त्या प्रत्येक लढाया पाहणार आहोत आणि तुम्हाला दाखवणार आहोत की, त्या मंडळीच्या युगाच्यानंतर झाल्या आहेत. ह्या शिक्क्यानंतर झाल्या आहेत. "लढाया आणि लढायांच्या अफवा" परंतु तुतारीचा नाद राजकीय गोंधळास दर्शवितो.

137 तर शिक्क्यांचा संबंध धार्मिक गोंधळाशी आहे. पाहिले? एक शिक्का उघडला जातो, एक संदेश दिला जातो. आणि त्यानंतर एका मंडळीची तिच्या स्वतःच्या राजकीय पद्धतीने रचना होते, आणि अधिक गोष्टी, आणि तीचे सर्व मुख्य लोक. आणि जेव्हा खरा संदेश येतो, ते संदेशवाहक पुढे जातो. आणि तो त्यांचे तुकडे करतो. तो बरोबर आहे. जेव्हा शिक्का उघडला जातो. तेथे धार्मिक गोंधळ माजतो. हेच. शिक्का उघडताना घडले आहे. होय. होय.

138 सियोनेत त्यांना स्वस्थता लाभली. मंडळीला स्थिरता मिळाली, आणि आपल्याला इंग्लंडच्या मंडळीप्रमाणे, "आपल्या सर्वांना स्थिरता मिळाली," त्या सर्वांना स्थैर्य मिळाले. तसेच कॅथोलिक मंडळी, सर्वांना स्थिरता मिळाली, आणि तेव्हा लुथर आला. तेथे धार्मिक गोंधळ आला. होय, महाशय! तेथे निश्चितच असे झाले होते! त्यानंतर ज्विंग्ली बरोबर मंडळी बाहेर आली. आणि ज्विंग्लीपासून कॅल्विन पर्यंत, भिन्न भिन्न मंडळया बाहेर आल्या. आणि काही काळानंतर अँग्लीकन मंडळी स्थापित झाली, आणि तेथे स्वस्थता होती, आणि तेव्हा वेस्ली आला. तेथे एक धार्मिक गोंधळ माजला, हे बरोबर आहे. पाहा, वेगवेगळया मंडळया स्थापित होणे, हे सदैव धार्मिक गोंधळास दर्शविते.

139 आता, शिक्के. आपण आता येथे थोडेसे वाचूया. मला ह्यावर–ह्यावर बोलायचे आहे. आपण ते वाचूया. मी त्यावर बोलणार आहे. मी...

*मग कोकऱ्याने त्या सात शिक्क्यांपैकी एक शिक्का फोडला.* (काय झाले) *ते मी पाहीले, तेव्हा चार प्राण्यांपैकी,* एक *मेघगर्जनेच्या ध्वनीने ये असे म्हणाला, ते मी ऐकले...*

140 ओह, मला किती वाटते की, काही वेळ ह्यावरच थांबून राहावे! आणि मी आशा करतो की, सर्व लोक जे ह्या गोष्टी जाणतात आणि प्रभूच्या सांत्वनाची वाट पाहत आहेत, ते आता लक्षपूर्वक ह्याचा अभ्यास करतील; आणि जे टेप ऐकत आहेत, ते तुम्ही सुध्दा, ह्यावर विचार करतील.

141 जेव्हा कोकऱ्याने पहिला शिक्का फोडला, तेव्हा जी पहिली गोष्ट घडली; ती ही की, मेघगर्जनेसारखा ध्वनी झाला. आता त्याचे काहीतरी महत्त्व आहे. ते महत्त्वाचे आहे. त्याचा काही अर्थ आहे. त्याचा काही अर्थ आहे. अर्थाशिवाय काही घडत नाही. ठीक आहे, एक मेघगर्जना, एक मेघगर्जनेसारखा ध्वनी झाला. आश्चर्य आहे की, ही मेघगर्जना काय आहे?

142 आता आपण थोडे पुढे वाचूया. आपण मत्तय शुभवर्तमानाकडे वळूया...नाही, आपण संत योहानाचे शुभवर्तमान काढूया. संत योहान, 12 वा अध्याय, आणि एक मिनिट थांबूया. संत योहान 12वा अध्याय. आता आपण संत योहान 12वा अध्याय 23 व्या वचनापासून सुरुवात करुया. आता येथे लक्षपूर्वक ऐका, मग तुम्हाला ते काय आहे, हे समजण्यासाठी आश्चर्य करावे लागणार नाही.

येशूने त्यांना म्हटले, *मनुष्याच्या पुत्राचे गौरव होण्याची वेळ आली आहे.*

143 पाहा, तुम्ही युगाच्या अंतिम टप्प्यात आहात. त्याची सेवकाई समाप्त होत आहे. पाहिले? "ती वेळ आली आहे की, मनुष्याच्या पुत्राचे गौरव व्हावे."

144 कशाविषयी "वेळ आली आहे की, जेव्हा त्याची वधू वर उचलली गेली पाहिजे?" काय? वेळ आली आहे, "आणखी वेळ नसणार." तो देवदूत ज्यांच्या डोक्यावर मेघधनुष्य आहे, तो एक पाय भुमीवर, आणि दुसरा पाय समुद्रावर ठेवण्यास तयार आहे, आणि म्हणाला, "समय निघून गेला आहे." आणि त्याखेरीज, त्याने आपले हात स्वर्गाकडे वर केले आणि शपथ वाहिली की, "आणखी अवकाश लागणार नाही," जेव्हा हे घडेल. हे किती–किती परिपूर्ण, एक शपथपूर्वक प्रतिज्ञापत्र जे मंडळीबरोबर केलेले आहे.

*...ती वेळ* आली *आहे की, मनुष्याच्या पुत्राचे गौरव व्हावे.*

*मी तुम्हाला खचित, खचित, सांगतो, गव्हाचा दाणा जमिनीत* पडून मेला *नाही, तर तो एकटाच* राहतो*: आणि मेला तर, पुष्कळ पीक देतो.*

*जो आपल्या जीवावर प्रीती करीतो, तो त्याला मुकेल,...आणि जो ह्या जगात आपल्या जीवाचा द्वेष करितो तो त्याच्या सार्वकालिक जीवनासाठी रक्षण करील.*

*जर कोणी माझी सेवा करतो, तर त्याने मला अनुसरावे; म्हणजे जेथे मी आहे,...तेथे माझा सेवकही असेल: जर कोणी माझी सेवा करतो, तर पिता त्याचा मान करील.*

*आता माझा जीव व्याकूळ झाला आहे...*

145 तुम्ही म्हणता, “अच्छा, जेव्हा तो समयाच्या अंतिम क्षणी आला, आणि तुम्ही व्याकुळ झाला?” हे तुम्हाला काय विचार करायला लावते, जेव्हा काही महान आत्मिक घटना घडते; तर काय ती तुम्हास व्याकुळ करते? ओह माझ्या देवा! हो!

*आता माझा जीव व्याकूळ झाला आहे; मी काय बोलू? हे बापा, ह्या घटकेपासून माझे रक्षण कर: परंतु मी ह्यासाठीच, ह्या घटकेत आलो आहे.*

*हे बापा तू आपल्या नावाचे गौरव कर. तेव्हा अशी आकाशवाणी झाली की, मी ते गौरविले आहे, आणि पुन्हाही गौरवीन.*

*तेव्हा जे लोक, उभे राहून ऐकत होते,* ते म्हणाले, *मेघगर्जना झाली*...

146 मग, जेव्हा कोकऱ्याने पुस्तक घेतले आणि पहिला शिक्का फोडला, तेव्हा परमेश्वर त्याच्या सार्वकालिक राजासनावरुन बोलला; ते प्रगट करण्यासाठी की, तो शिक्का काय होता. परंतु जेव्हा ते योहानापुढे ठेवले गेले, ते चिन्हाच्या रुपात होते. जेव्हा योहानाने ते पाहीले, तेव्हा ते एक रहस्यच होते. का? ते त्यावेळी देखील प्रगट केले गेले नव्हते. ते तोपर्यंत प्रगट होऊ शकत नाही. जोपर्यंत तो येथे म्हणाला, “अंतिम समयी.” परंतु ते चिन्हाच्या स्वरुपात आले.

147 जेव्हा, ती “मेघगर्जना झाली.” लक्षात ठेवा, एक मोठा मेघगर्जनेचा ध्वनी ही परमेश्वराची वाणी आहे. बायबल हेच सांगते, पाहा, “मेघगर्जनेचा ध्वनी,” त्यांना वाटले, ती मेघगर्जना आहे, परंतु तो देव होता. त्याला ते समजले; कारण त्याला ते प्रगट करण्यात आले होते. समजले? ती मेघगर्जना होती.

148 आणि, लक्ष द्या. पहिला शिक्का उघडला. पहिला शिक्का, जेव्हा तो चिन्हाच्या स्वरुपात उघडला होता, तेथे मेघगर्जना झाली. आता त्याविषयी काय जेव्हा शिक्का वास्तव स्वरुपात उघडला जातो? बापरे...जेव्हा कोकऱ्याने शिक्का फोडला, मेघगर्जनेसारखा ध्वनी झाला. आणि त्याने काय प्रगट केले? त्याने स्वतःस पूर्णपणे प्रगट केले नाही. प्रथम, ती देवाकडे होती; मग, ती चिन्हाच्या स्वरुपात होती. मग ती प्रगट झाली. तीन गोष्टी. पाहा? त्या परमेश्वराच्या राजासनाकडून येत आहेत.

149 पहिल्या वेळेस, ते पाहू शकत नाही की, ऐकू शकत नाही, किंवा त्याविषयी काहीच करु शकत नाही. ते सीलबंद होते. कोकऱ्याच्या रक्ताने तिची किंमत चुकवलेली आहे.

150 जेव्हा तो बोलला, तेव्हा मेघगर्जनेसारखा ध्वनी झाला. आणि जेव्हा त्याने असे केले, तेव्हा एक पांढरा घोडेस्वार बाहेर निघाला, आणि तो एक चिन्हाच्या स्वरुपात होता. आता लक्ष द्या, तो म्हणाला हे अंतिम दिवशी प्रगट केले जाईल. परंतु ते मंडळीत एका चिन्हाच्या स्वरुपात येते. मंडळी, हे तुला समजले आहे काय? [मंडळी म्हणते, “आमेन.”—संपा.] ते मंडळीत एका-एका चिन्हाच्या स्वरुपात येते. परंतु त्यांना समजते की, तो एक शिक्का आहे. परंतु ते काय आहे? हे अजूनही त्यांना समजत नाही, कारण तो एक पांढरा घोडेस्वार आहे.

151 आणि जेव्हा हे केवळ अंतिम दिवसातच प्रगट केले जाईल, जेव्हा खरा शिक्का फोडला जाईल. शिक्का कोणासाठी फोडला जाईल? ख्रिस्तासाठी नाही; परंतु मंडळीसाठी फोडला जाईल. आता, लक्ष द्या. ओह, माझ्या प्रभू, ही गोष्ट मला फार आनंदीत करते! मी-मी-मी आशा करतो की, तुम्ही लोक अर्थात खरी मंडळी खऱ्या रितीने हे समजेल की, मला काय सांगायचे आहे. मी तुम्हाला वधू म्हणणार आहे. पाहा, तुम्हाला ते समजेल.

152 तो आवाज एक मेघगर्जना आहे. आवाज कोठून आला? त्या राजासनावरुन, जेथून कोकरा मध्यस्थीचे कार्य सोडून आला होता. आता तो येथे त्याचे स्थान घेण्यासाठी

आणि त्याचा दावा करण्यासाठी उभा आहे. परंतु ती मेघगर्जना, त्या राजासनाच्या आतून आली. आणि कोकरा येथे बाहेर उभा होता. ती मेघगर्जना जेथे कोकरा सोडून आला होता. पित्याचे राजासन सोडले, त्याचे स्वतःचे राजासन घेण्यासाठी आला. महिमा होवो! आता मित्रांनो, हे गमावू नका.

153 ख्रिस्ती ह्या नात्याने, आपणा सर्वांना माहीत आहे की, परमेश्वराने दाविदास शपथ दिली होती की, तो ख्रिस्ताला त्याच्या राजासनावर बसण्यासाठी उठवील आणि त्याला येथे पृथ्वीवर सार्वकालिक राज्य देईल. त्याने ते केले.

154 आणि येशू म्हणाला, “जो ख्रिस्तविरोधकावर विजय मिळवितो आणि जगाच्या सर्व गोष्टीवर विजय मिळवितो. तो माझ्याबरोबर माझ्या राज्यासनावर बसेल, जसा मी विजय मिळवून माझ्या पित्याच्या राजासनावर बसलो आहे.” समजले?

155 आता, एके दिवशी तो पित्याच्या राजासनावरुन उठेल, आणि त्याचे स्वतःचे राजासन घेण्यासाठी जाईल.

156 आता तो त्याच्या लोकांस बोलावण्यासाठी येत आहे. तो त्यांचा दावा कसा करील? त्याच्या हाती पहिल्यापासूनच मुक्तीचे पुस्तक आहे. महिमा होवो! ओह, मला असे वाटते की, एक गीत गाऊ.

लवकरच कोकरा त्याच्या वधूला त्याच्याकडे घेईल,
स्वर्गातील सर्व दूत एकत्र होतील, (ते पाहण्यासाठी);
ओह, ते खूप गौरवी दृश्य असेल, सर्व संत डागविरहीत शुभ्र वस्त्रांमध्ये;
आणि येशूसमवेत आपण आनंद करु सदासर्वदा.

157 ओह, माझ्या प्रभू! “आता आपण स्वर्गीय स्थानात बसलो आहोत”? त्याच्याविषयी बोलूया. ते काय दृश्य असेल! स्वर्गरोहण होण्याआधी जर आपल्याला ह्या प्रकारचा अनुभव जर होत आहे. जेव्हा आपण ह्या स्थितीत खाली पृथ्वीवर बसलेले आहोत; आणि आपण आनंद घेऊ शकतो, आणि भिंतीजवळ उभे राहतो, आणि पावसात उभे राहतो, केवळ हे ऐकण्यासाठी की तेव्हा काय असेल; जेव्हा आपण त्याला तेथे बसलेला पाहू! ओह, माझ्या देवा! ओह, तो फारच गौरवी समय असेल!

158 पित्याचे राजासन सोडून, पुढे येतो...त्याचा पुत्र होण्यासाठी...तो दाविदाचा पुत्र आहे. इस्त्राएलाला हेच वाटले की, तो तेव्हा हे प्रगट करील. सुरफुनीकी स्त्रीची आठवण करा; म्हणाली, “तुम्ही दाविदाच्या पुत्रा!” आंधळया बर्थलमयाची आठवण करा, ज्याने म्हटले, “अहो, दाविदाच्या पुत्रा!” अहा! आणि येशूला सर्व योजना काय आहे ते माहीत होते, तरीही त्यांना ते कळले नाही. त्यांनी त्याच्यावर जबरी करण्याचा प्रयत्न केला आणि त्याला राजासन घेण्यासाठी भाग पाडले आणि पिलातानेही त्याला हेच विचारले होते.

159 परंतु तो म्हणाला, “जर माझे राज्य ह्या जगाचे असते, तर माझ्या सेवकांनी लढाई केली असती. परंतु आता माझे राज्य वर आहे.” परंतु तो म्हणाला, “जेव्हा तुम्ही प्रार्थना करता म्हणा, ‘तुझे राज्य येवो, तुझी इच्छा येथे पृथ्वीवर पुर्ण होवो, जशी ती स्वर्गात आहे.’” आमेन. ओह! ही महान गोष्ट किती गौरवी आहे!

160 तो पित्याचे राजासन सोडून, आपले राजासन घेण्यासाठी आला आहे. आता तो त्याचे मध्यस्थीचे कार्य सोडून त्याचे राजासन, त्याच्या सोडविलेल्या लोकांचा दावा करण्यासाठी तो आला आहे. हेच करण्यासाठी तो राजासनावरुन पुढे येतो. असे तेव्हा

होते जेव्हा सिंहासारखा प्राणी योहानास म्हणतो, “ये बघ!” लक्ष द्या. काय तुम्ही हे वाचत आहात?

> *...एक शिक्का फोडला, आणि...मेघगर्जनेसारख्या ध्वनीने,...* आणि *चार प्राण्यांपैकी एक...*

161 तुम्हाला माहीत आहे की, ते चार प्राणी कोण आहेत? आपण त्यांना अभ्यासात पाहीले आहे. “पहिला प्राणी सिंहासारखा; दुसरा गोर्ह्यासारखा; आणि तिसरा मनुष्यासारखा; आणि चौथा गरुडासारखा.” आता पहिला प्राणी म्हणाला..., लक्ष द्या, प्रत्येक वेळी तेथे वेगळा प्राणी येतो, जोपर्यंत चारही घोडेस्वार बाहेर निघत नाहीत. तेथे चार प्राणी आहेत आणि चार घोडेस्वार आहेत.

162 लक्ष द्या, त्यांच्यातील प्रत्येक प्राणी घोषणा करतो. हे चार प्राणी मत्तय, मार्क, लुक, आणि योहान आहे. आपण हे पुन्हा पाहणार आहोत आणि सिध्द करणार आहोत की, मत्तय कोण आहे, मार्क–मार्क कोण आहे, आणि योहान कोण आहे, प्रत्येक जण जसे ते गेले!...?...

> *...त्या चार प्राण्यांपैकी...एकाने म्हटले, ये...बघ*

163 त्याने मेघगर्जनेसारखा ध्वनी ऐकला. आणि चार प्राण्यांपैकी एक म्हणाला, “आता ये, बघ.”

164 दुसऱ्या शब्दात, आता, *येथे* कोकरा उभा आहे, आणि योहान तेथे उभा राहून हे घडताना पाहत आहे. कोकरा राजासनावरुन येत आहे; जणू काही तो वधला गेला होता, त्याच्या सर्व शरीरावर रक्त होते. तो एकच होता जो योग्य ठरला होता. आणि जेव्हा तो तेथे पोहचला आणि पुस्तक घेतले, तेव्हा सर्व जण उंच शब्दात ओरडू लागले आणि बोलू लागले, आणि बोलत राहीले; कारण त्यांना माहीत होते की, त्यांची सोडवणूक करण्याकरिता किंमत चुकविली गेली आहे.

165 आता तो त्याच्या स्वतःच्या अधिकारांचा दावा करण्यासाठी आला आहे. म्हणून, तो पुस्तक घेतो, तेथे बाहेर योहानासमोर उभा राहतो, आणि तो पुस्तकास मागच्या बाजूस खेचतो आणि शिक्का फोडतो. तो शिक्का फोडतो! आणि जेव्हा तो शिक्का खाली उघडतो, तेव्हा मेघगर्जनेचा आवाज त्या जागी दुमदुमतो. आणि ह्यात काही संशय नाही, जेव्हा मेघगर्जनेचा ध्वनी झाला; योहानाने कदाचित हवेत उडी मारली असेल, जेव्हा एक मेघगर्जना झाली.

166 आणि तेव्हा चार प्राण्यांपैकी एक म्हणाला, “आता ये, हे काय आहे ते बघ. येथे खाली कार्य प्रगट झाले आहे ते बघ.” ओह, माझ्या प्रभू! “योहान, जे तू पाहीले ते लिहून ठेव.” म्हणून योहान ते काय होते हे पाहण्यासाठी जातो. योहान, पाहण्यासाठी जातो की, तो मेघगर्जनेचा ध्वनी काय बोलला. तेव्हा हा प्राणी योहानास म्हणाला, “ये आणि बघ, पहिल्या शिक्क्याखाली काय रहस्य आहे.” [भाऊ ब्रॅन्हम मंचावर सात वेळा ठोठावतात—संपा.] ती मेघगर्जना, निर्माणकर्त्याची वाणी ते बोलली होती. आता योहानाला माहीत असावयास हवे होते की, तेथे काय आहे. समजले? बापरे! परंतु आता विचार करा. त्याने हे लिहिले.

167 परंतु जेव्हा योहानाने त्या सात गर्जनांनी काढलेले शब्द, लिहिण्यास आरंभ केला. तेव्हा त्याने म्हटले, “ते लिहू नको.” त्याला आज्ञा दिली होती की, त्याने जे पाहिले, ते लिहावे. परंतु जेव्हा ह्या सात गर्जनाने शब्द काढले, प्रकटीकरण 10 मध्ये तो म्हणाला, “ते लिहूच नको.” ती रहस्ये आहे. आपल्याला अजूनही माहीत नाही की, ती काय आहेत!

परंतु, माझ्या मतानुसार, ती आताच प्रगट केली जातील. आणि जेव्हा असे होईल, ती स्वर्गरोहण होण्यासाठी लागणाऱ्या कृपेसाठी विश्वास देईल; ह्यासाठी की मंडळी बाहेर येईल. समजले?

168 आपण सर्व गोष्टींचा सर्व कालखंडातून अभ्यास केला आहे, ज्या आपल्याला माहित आहेत. आपण सर्व गोष्टींची पारख केली आहे. आपण देवाची गूजे पाहिली आहेत. आपण अंतिम दिवसात वधूला एकत्रित होताना पाहिले आहे. परंतु अजूनही तेथे अशा काही गोष्टी आहेत, ज्या आपल्याला स्वतःच्या ज्ञानाने कळू शकत नाही. तेथे आणखी काही गोष्टी आहेत.

169 परंतु, मी कल्पना करतो की, जेव्हा ती गूजे प्रगट होण्यास सुरुवात झाली, देव म्हणाला, “आता हे तू आपल्या जवळच ठेव. जरा थांब. मी ते त्या दिवशी प्रगट करीन. योहान ते, बिलकुल, लिहू नको, कारण ते त्यावर अडखळतील. पाहा, ते तू असेच राहू दे. परंतु मी ते त्या दिवशी प्रगट करीन जेव्हा ते प्रगट करण्याची आवश्यकता आहे.”

170 त्यांनी त्याविषयी कधीच काही सांगितले नाही लक्ष द्या, ज्याप्रमाणे शाहीच्या लहानशा थेंबाचा उद्देश असतो; त्याप्रमाणे प्रत्येक गोष्टीचा एक उद्देश आहे. प्रत्येक गोष्ट एका विशिष्ट कारणासाठी आहे. परंतु, लक्ष द्या. निर्माणकर्ता बोलला. आणि त्याने–त्याने ही वाणी ऐकली, आणि तो पाहण्यासाठी गेला.

171 परंतु आता कोकरा योहानाला, चिन्हाच्या रुपात...मंडळीचे वचन दाखवत आहे, ह्यासाठी की मंडळीला ते कळावे. काय लिहायचे, हे त्याने त्याला दाखवले. म्हणाला, “आता तू सांगू नको की, हे काय आहे. योहान, तू खाली जाऊ नको, आणि हे काय आहे, जे ह्या सातव्या शिक्क्याच्याखाली आहे. हे सांगू नको, तू खाली जाऊन हे सांगू नको. कारण, जर मी हे योहानाला सांगितले, तर युगांसाठी केलेली ही पुर्ण योजना तुटून जाईल. हे एक रहस्य आहे.” समजले? त्याला फक्त पाहीजे...त्याचे आगमन! तो म्हणाला, आता, “आणि माझे येणे कधी आहे, हे कोणालाही ठाऊक नाही. मी येत आहे.” पाहीले? समजले? हेच सर्व आहे. हे जाणणे माझे काम नाही की, तो कधी येणार आहे. मी फक्त त्याच्या आगमनासाठी तयार राहीन. तुम्हाला समजले. म्हणून तो म्हणाला...

आता योहान पुढे जातो, तो विचार करतो. “मी आता ते पाहणार आहे.”

172 आणि योहान जेव्हा पुढे गेला, तेव्हा त्याने काय केले? त्याच्याकडे, आता, करण्यासाठी काय होते? आता हे त्याला मंडळीच्या युगास लिहावयाचे होते. हेच त्याचे काम होते की, हे त्याने मंडळीच्या युगास लिहावे. “जे तू आरंभापासून ह्या सात सोन्याच्या दिवटांमध्ये पाहीले ते लिही. ते तू ह्या मंडळीला लिही आणि त्यांना सांग.” ठीक आहे.

173 आणि एक गर्जना झाली. योहानाला माहीत होते की, ती परमेश्वराची वाणी आहे. तेव्हा सिंहासारखा प्राणी त्याला म्हणाला, “ये, हे काय होते ते बघ.” आणि आता योहान पेन घेऊन ते सर्व लिहिण्यासाठी पुढे जातो, जे तो पाहणार होता.

174 आता त्याने ते पूर्णतः कधीच पाहिले नाही की ते काय होते? त्याला ते कधीच समजले नाही. परंतु त्याने केवळ ते पाहिले, जे देवाने मंडळीला “त्या समयी” देण्यासाठी पाठवले होते. आता त्याच्याकडे होते...तो करील; तो सदैव करतो; तो ते स्पष्ट करतो, जेव्हा ते स्पष्ट करण्याचा समय आहे. परंतु तो ते तेव्हा स्पष्ट करीत नाही. का? कारण, त्याला ते शेवटच्या युगापर्यंत गुप्त ठेवायचे होते. आणि शेवटच्या दुताचा संदेश ही रहस्ये एकत्रित करण्यासाठीच आहे. पाहिले?

175 तेव्हा ते स्पष्ट केले गेले नव्हते. परंतु जे योहानाने पाहीले होते, त्याने फक्त पाहिले. "एक पांढरा घोडा आणि त्याच्यावर बसलेला स्वार माझ्या दृष्टीस पडला," म्हणून तेच त्याने लिहीले, जे त्याने पाहीले.

तेच तो म्हणाला, "ये, बघ."

176 म्हणून योहान हे पाहण्याकरिता गेला की, तो मंडळीला लिहीण्यासाठी काय बघू शकतो. आणि तो गेला, त्याने पाहीले, "एक पांढरा घोडा आणि त्याच्यावर बसलेला स्वार त्याच्याजवळ धनुष्य होते; आणि तो विजय मिळवीत, आणखी विजय मिळविण्यास निघून गेला; आणि मग त्याला मुगुट देण्यात आला." आणि, आता, हेच सर्व योहानाने पाहीले, म्हणून त्याने ते सर्व लिहून ठेवले. आता, पाहा, ते चिन्हांच्या रुपात होते. त्याचप्रकारे मंडळीला ते मिळाले आहे.

177 परंतु, आपल्या अभिवचनानुसार, तो अंतिम समयात ते प्रगट करील, तो हे दाखवील की, ते हे काय आहे? परमेश्वरा ते समजण्यासाठी आमचे सहाय्य कर. मंडळीच्या युगांना, ह्या अंतिम मंडळी युगाचा सातवा संदेश येईपर्यंत पूर्णतः प्रगट केले गेले नव्हते. लक्ष द्या, तो आरंभ करतो...

178 जर तुम्ही ह्याकडे लक्ष दिले, तर तुम्हाला कळेल की, सातव्या मंडळी युगाच्या ह्या संदेशवाहकाने कुठल्याही संप्रदायाची सुरुवात केली नाही, जसे त्या बाकीच्या सर्वांनी केली. लक्ष द्या, त्याने सुरुवात केली नाही...नाही. जर तुम्ही पाहीले, तर तुम्हाला कळेल की, तो संप्रदायाच्या विरुध्द आहे. काय एलीया, एलीया त्यांच्या विरुध्द होता काय? निश्चितच, तो होता. योहान जो एलीयाच्या आत्म्याने आला होता, तो संप्रदायाच्या विरुध्द होता का?

179 एलियावर कोणत्या प्रकारचा आत्मा होता? तो होता...त्याच्याविषयी अधिक कोणाला ठाऊक नाही. तो एक साधारण मनुष्य होता, परंतु तो एक संदेष्टा होता. त्याचा द्वेष करण्यात आला. ओह माझ्या प्रभू! आणि कोणत्या समयी तो उदयास आला? तो इस्त्राएलाच्या भरभराटीच्या समयी आला, जेव्हा ते सर्व जगिक झाले होते. आणि तो तेथे बाहेर गेला, आणि तो "स्त्रियांचा द्वेष करणारा होता." आहा. होय, महाशय, निश्चितच असे होते. आणि तो जंगल प्रेमी होता. तो त्याचा स्वभाव होता.

180 तेव्हा त्या लोकांना माहीत असायला हवे होते. जेव्हा तो व्यक्ती अर्थात योहान त्याच आत्म्याने आला. जसे मी काल रात्री म्हटले होते की, तो त्याचा पोषाख ख्यातनाम व्यक्तिसारखा नव्हता. ते लेकरांचे चुंबन घेतात, आणि लग्न करतात, आणि दफन करतात आणि अशाच गोष्टी. परंतु तो मनुष्य जंगली मनुष्यासारखा बाहेर आला. तो कोण होता? तो जंगलप्रेमी होता. दुसरी गोष्ट त्याने केली, त्याने संप्रदायाचा द्वेष केला. तो म्हणाला, "आता असे बोलू नका की, 'आम्ही *ह्याचे* अथवा *त्याचे* आहोत,' कारण मी तुम्हाला सांगतो, ह्या दगडांपासून अब्राहामासाठी मुले निर्माण करावयास देव समर्थ आहे."

181 तो तडजोड करणारा नव्हता. ते बोलू शकले नाही...येशूने त्यांना सांगितले, "तुम्ही वाऱ्याने हलवलेला बोरु पाहण्यास गेला होता काय? योहानास नाही," नाही, महाशय.

182 त्याने काय केले होते? जसे एलीया इजबेलीला म्हणाला, त्यानेही हेरोदियास सांगितले. हेरोदाच्या समोर तो थेट गेला, आणि म्हणाला, "तू तिला ठेवावे हे तुला सशास्त्र नाही." त्याकरिता तिने त्याचा शिरच्छेद केला. पाहिले? तिने अलिशालासुध्दा मारण्याचा प्रयत्न केला. तोच आत्मा हेरोदियात होता, जो ईजबेलमध्ये होता.

183 आणि, तीच गोष्ट, आज, इजबेल म्हटलेल्या मंडळीत आहे. तीच गोष्ट आता ह्या गोष्टीकडे लक्ष द्या. आपल्याला येथे एक मोठा धडा मिळतो!

184 आणि आता असे वाटत होते, जणू काही त्या लोकांनी त्याला ओळखले असते. योहानाने त्या लोकांवर ओरडण्यास सुरुवात केली, आणि योहान तेथे उभा होता, असे वाटत होते, जणू काही त्यांनी ओळखले असते की, अलिशाचा आत्मा त्याच्यात होता. ते त्यांना समजले असते. तो तोच होता.

185 आणि, आता आपल्याला ह्या मंडळी युगांमध्ये, तसेच शास्त्रलेखानुसार, हे आपल्याला आश्वासन मिळाले आहे की हा आत्मा, अंतिम समयात पुन्हा येईल. हे खरे आहे. [मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.]

186 आता, लक्ष द्या, तुम्ही त्याच्या स्वभावाकडे लक्ष द्या. आता, तो दुसरे मंडळीचे युग सुरु करणार नाही, जसे लुथर, आणि वेस्ली, आणि त्यांतील इतर सर्वांनी केले. तो दुसऱ्या मंडळीच्या युगाची सुरुवात करणार नाही, कारण त्यानंतर दुसऱ्या कोणत्या मंडळीच्या युगाची सुरुवात होणार नाही. समजले? तेथे ह्यानंतर कोणतेही मंडळीचे युग नसणार. म्हणूनच तो त्याविरुध्द होता, कारण त्याचा आत्मा अगदी तसाच असणार होता. जसा तो मागील काळात होता, तोच आत्मा.

187 जसे मी मागील रात्री सांगितले, देवाला हे बरे वाटले की, त्याने आत्म्याचा उपयोग तीन वेगळ्या समयासाठी केला. तो त्याचा अंक आहे, तीन, दोन नाही; तीन. देवाने त्याचा दोनदा उपयोग केलेला आहे, आता तो पुन्हा त्याचा उपयोग करणार आहे. तो तसे म्हणाला आहे, त्याने त्याचे अभिवचन दिले आहे. आता लक्ष द्या,...

188 आता लक्ष द्या, त्याने हे कधी केले. तो दुसऱ्या संप्रदायाची सुरुवात करणार नाही, कारण लावदिकीया मंडळीचे युग हे शेवटचे युग आहे. आणि सातवा दूत, जो सातव्या मंडळीच्या युगासाठी, सातवा संदेशवाहक आहे, जो पवित्र आत्म्याद्वारे, ह्या सर्व रहस्यमय गोष्टी प्रगट करणार आहे...मागील रात्री येथे किती जण उपस्थित होते? तुमचे हात मला पाहू द्या. मला वाटते मग मला ते वाचन करावे लागणार नाही. तुम्हाला माहीत आहे ते कुठे आहे, 10वा अध्याय पाहा. ठीक आहे. ठीक आहे ना.

189 सुधारक आपल्या अगोदरच्या मंडळीच्या युगात पडलेली स्थिती सुधारण्याकरिता आले. आणि तेव्हा सुधारक आल्यानंतर आणि मंडळीच्या युगाची सुधारणा केल्यानंतर ज्या स्थितीत ते होते, आणि ते पुन्हा जगात गेले. मग त्यांनी नविन मंडळीच्या युगाची सुरुवात केली. त्यांनी सदैव असेच केले, सदैव. आता, आपण त्याचा अभ्यास केला आहे. पाहिले?

190 दुसऱ्या शब्दात, जेव्हा *येथे* रोमन कॅथलिक मंडळीचे, कॅथलिक मंडळीचे युग होते. तेव्हा लुथर, एक सुधारक आला. त्याला सुधारक म्हटले आहे. आणि तो काय करतो? त्याने तेथे जाहीर निवेदन करण्यास सुरुवात केली. आणि, जेव्हा त्याने हे केले, त्याने मंडळीला विरोध केला. आणि तुम्हाला माहीत आहे, त्याने पहिली गोष्ट काय केली? त्यानेही त्याच गोष्टीची उभारणी केली, ज्या सोडून तो मंडळीतून बाहेर आला होता.

191 तेव्हा त्यांनी दुसऱ्या मंडळी युगाची स्थापना केली, तेव्हा पहिली गोष्ट जी येथे येते तुम्हाला माहीत आहे,...मंडळी युग इतके गोंधळाचे झाले. तेव्हा जॉन वेस्ली आला, दुसरा सुधारक. पाहा, त्याने दुसरे मंडळीचे युग तयार केले. मी काय सांगत आहे, ते लक्षात घ्या? दूसरे मंडळीचे युग तयार झाले. ते सर्व सुधारक आहेत.

192 लक्ष द्या, शेवटच्या मंडळी युगातील, हा शेवटचा संदेशवाहक सुधारक नाही. तो एक संदेष्टा आहे, सुधारक नाही. मला दाखवा की, कधी संदेष्ट्याने मंडळीच्या युगाचा आरंभ केला आहे. तो सुधारक नाही, तो एक संदेष्टा आहे.

193 दुसरे सुधारक होते, परंतु संदेष्टे नव्हते. जर ते संदेष्टे असते, तर परमेश्वराचे वचन संदेष्ट्याकडे येते. हेच कारण आहे त्यांनी बाप्तिस्मा "पिता, पुत्र, पवित्र आत्मा," अशा सर्व इतर गोष्टी चालू ठेवल्या; कारण ते सुधारक होते, आणि संदेष्टे नव्हते. परंतु तरीही ते देवाचे महान लोक होते, आणि त्यांनी त्यांच्या समयातील गरज पाहिली, ज्यांत ते राहत होते, आणि परमेश्वराने त्यांना अभिषेक केला, आणि ते बाहेर निघाले आणि त्या समयातील गोष्टींचा त्यांनी चक्काचूर केला. परंतु परमेश्वराचे पूर्ण वचन त्यांच्याकडे कधीच आले नाही, कारण ते संदेष्टे नव्हते. ते सुधारक होते.

194 परंतु अंतिम दिवसात, तेथे संदेष्टा असणार, देवाची रहस्ये घेण्यासाठी, सर्व गोष्टी मूळ स्थितीत आणण्यासाठी; कारण परमेश्वराची रहस्ये फक्त संदेष्ट्याद्वारेच जाणता येत होती म्हणून, त्या व्यक्तीस येणे गरजेचे होते. पाहा, आता मला काय म्हणायचे आहे? तो सुधारक असू शकत नाही. तो संदेष्टाच असला पाहीजे, कारण तेथे असा कोणी व्यक्ती असला पाहिजे, ज्यास दान आहे आणि जो अशाप्रकारे स्थिर असेल, जो देवाचे वचन पकडू शकेल.

195 आता, सुधारकांना माहित होते की, तेथे काहीतरी चुकीचे आहे. लुथरला माहीत होते की, ती भाकरी ख्रिस्ताचे शरीर नव्हते. आणि म्हणून त्याने प्रचार केला, "नीतिमान विश्वासाने जगेल," आणि तो त्याचा संदेश होता. आणि जेव्हा जॉन वेस्ली आला, त्याने पाहीले पवित्रीकरणाची आवश्यकता आहे, म्हणून त्याने पवित्रीकरणाचा प्रचार केला. तो त्याचा संदेश होता. पाहीले? पेंटेकॉस्टल लोकांनी पवित्र आत्म्याचा संदेश दिला, आणि असेच पुढे.

196 परंतु अंतिम दिवसात, ह्या शेवटच्या युगात, तो संदेशवाहक सुधारणूकीच्या कार्याची सुरुवात करणार नाही, परंतु त्याला ती सर्व रहस्ये घ्यायची आहे, जी त्या सुधारकांनी सोडली होती, आणि त्यांना एकत्र करायची आहेत आणि लोकांना त्याविषयी खुलासा द्यायचा आहे. मला—मला ते पुन्हा वाचू द्या. ते मला फार चांगले वाटते! मला ते वाचायला आवडते.

> *...मी आणखी एक बलवान देवदूत स्वर्गातून उतरताना पाहिला; तो मेघवेष्टित असून...त्याच्या डोक्यावर मेघधनुष्य होते:...त्याचे तोंड सूर्यासारखे व त्याचे पाय अग्निस्तंभासारखे होते:*

197 आता, आपण ह्या गोष्टी पाहिल्या आहेत, जो ख्रिस्त होता. आणि आपल्याला माहीत आहे की, ख्रिस्त नेहमीच मंडळीसाठी संदेशवाहक आहे. ठीक आहे. त्याला अग्नीस्तंभ, कराराचा दूत म्हटले आहे, आणि इत्यादी.

> *आणि त्याच्या हाती एक उघडलेले लहानसे पुस्तक होते...*

198 आता, येथेच, शिक्के फोडले गेलेत. आपण त्यांना आता फोडत आहोत. परंतु येथे ही गोष्ट उघडली आहे

> *...आणि त्याने आपला उजवा पाय समुद्रावर, व डावा पाय...भूमीवर ठेवला,*
>
> *आणि सिंहगर्जनेप्रमाणे तो मोठ्याने ओरडला; आणि तो ओरडला, तेव्हा सात मेघगर्जनांनी आपआपले शब्द काढले.* (ओह! हे पूर्ण आहे.)

*आणि त्या सात मेघगर्जनांनी शब्द काढले, तेव्हा मी लिहीणार होतो* (काय लिहिणार होतो?) ते काय बोलले; *आणि इतक्यात स्वर्गातून झालेली वाणी* (परमेश्वर) *मी ऐकली; ती म्हणाली, सात मेघगर्जनांनी काढलेले शब्द गुप्त ठेव, ते लिहू नको.* ते लिहू नको. (पाहा?)

*आणि ज्या देवदूताला समुद्रावर व भूमीवर उभे राहिलेले मी पाहिले, ... त्याने आपला उजवा* हात *स्वर्गाकडे वर केला,*

*आणि जो युगानुयुग* जीवंत *आहे, ज्याने* आकाश *व* त्यांत जे *आहे, ते पृथ्वी व* तिच्यावर जे आहे *ते, आणि समुद्र, व त्यात जे आहे ते निर्माण केले, त्याची शपथ वाहून म्हटले: आणखी अवकाश लागणार नाही.*

199 लक्ष द्या! आता आपण त्याकडे जात असता, हे विसरु नका,

*परंतु सातव्या देवदूताची वाणी होऊन त्या दिवसांत*...(दिवसांत)

200 तो शेवटचा दूत, पृथ्वीवरील दूत. *हा* देवदूत स्वर्गातून खाली आलेला आहे. हा तो नाही; तो स्वर्गातून आला आहे. परंतु तो येथे सातव्या देवदूताची वाणी बोलतो, ...*दूत* म्हणजे "संदेशवाहक," कोणालाही ते माहीत आहे, आणि मंडळीच्या युगाचा संदेशवाहक.

*...तर सातव्या देवदूताची वाणी होईल, त्या दिवसात म्हणजे तो देवदूत कर्णा वाजविण्याच्या बेतात असेल, तेव्हा देवाने आपले दास संदेष्टे ह्यांस सुवार्ता सांगितली. तद्नुसार त्याचे गूज* (सात शिक्के, सर्व गूजे) *पुर्ण होईल.*

201 सर्व रहस्ये उघडली आहेत. हीच त्या दूताची सेवकाई आहे. समजले? ते इतके साधारण असेल, की लोक ते समजू शकणार नाहीत. परंतु तरीही पर्णरीतीने ते प्रगट केले जातील. ते पूर्णपणे समजावले जातील. पाहीले? प्रत्येकजण जो, ते पाहू इच्छितो तो ते पाहू शकेल. समजले? हे खरे आहे? परंतू ते...

202 येशू म्हणाला, जेव्हा तो पृथ्वीवर होता, "यशयाने तुमच्या विषयी सांगितले, तुम्हाकडे डोळे आहेत आणि पाहू शकत नाही. तुम्हाकडे कान आहेत, परंतु तुम्ही ऐकू शकत नाही." आता आम्हाला समजते की...

203 मला भीती वाटली. मी मागे तेथे घड्याळाकडे पाहिले आणि मला वाटते दहा वाजले होते. परंतु पाहा, ...ते अजून, नऊही वाजले नाही. ठीक आहे. बापरे! आता आपण पाहूया. लक्ष द्या. हे मला आवडते.

204 हे दूसरे, सुधारक आहेत, परंतु देवाचे थोर लोक असल्याकरणाने, त्यांनी त्या समयाची आवश्यकता पाहिली, आणि सुधारणा केली.

205 परंतु प्रकटीकरण 10 म्हणते, त्याचा संदेश सुधार करण्यासाठी नाही, रहस्ये प्र*गट* करण्यासाठी आहे: रहस्ये प्र*गट* करील! हे वचन आहे, जे मनुष्यामध्ये आहे. इब्री 4 म्हणते, "कारण देवाचे वचन सजीव, सक्रिय, कोणत्याही दुधारी तरवारीपेक्षा तीक्ष्ण असून जीव व आत्मा, सांधे व मज्जा ह्यांना भेदून आरपार जाणारे आणि मनातील विचार व हेतू ह्यांचे परीक्षक असे आहे." समजले? हा व्यक्ती सुधारक नाही. तो प्र*गट* करणारा आहे. प्र*गट* करणारा (काय?) परमेश्वराची रहस्ये. जेथे मंडळयांकडे ह्या सर्व गोष्टी, जखडल्या होत्या आणि सर्व गोष्टी त्याला परमेश्वराचे वचन घेऊन येणे आहे आणि सर्व गोष्टी प्र*गट* करणे आहे.

206 कारण, तो "पुत्रांचा विश्वास पित्याकडे पुन्हा आणण्यासाठी आला." बायबलचा मूळ विश्वास ह्या सातव्या दूताद्वारे पूर्नस्थापित केला जाणार आहे. आता, ओह, ह्यावर मी किती प्रेम करतो! शिक्क्यांची सर्व रहस्ये, जी सुधारकांना पूर्णपणे कळली नव्हती! समजले?

आपण एक मिनीटासाठी, आता मलाखी 4 पाहूया. तुम्ही ह्यास अधोरेखीत करा. तो एक संदेष्टा आहे, आणि, “वडिलांच्या मूळ विश्वासाकडे पुन्हा आणतो.” आता आपण तो व्यक्ती दृश्यात येण्याची वाट बघतो. तो इतका नम्र असेल की, लाखो लाखो लोक त्याला ओळखू शकणार नाही…तेथे एक छोटासाच समूह असेल जो त्याला ओळखेल.

207 जेव्हा, तुम्ही त्या दिवसाचे स्मरण करता, जेव्हा योहान येणार होता, जेव्हा एक दूत ख्रिस्ताच्या येण्यापूर्वी येणार होता. त्याच्याविषयी भविष्यवाणी करण्यात आली होती की, “अरण्यात घोषणा करणाऱ्याची वाणी होती.” मलाखी ने त्याला पाहिले होते. पाहा, मलाखी 3रा अध्याय एलियाच्या येण्याविषयी सांगतो. आणि ख्रिस्ताच्या आगमना अगोदर मार्ग करण्यास येणार होता.

208 तुम्ही म्हणाल, “ओह, नाही, नाही भाऊ ब्रॅन्हम तसे नाही. तो 4था अध्याय आहे.” मी ह्याविषयी तुमच्याकडे क्षमा मागतो.

209 येशूने म्हटले तो 3रा अध्याय आहे. आता…तुम्ही संत मत्तय काढा, 11वा अध्याय आणि 6वे वचन ते हेच सांगेल. 11वा अध्याय मला वाटते ते 6वे वचन, 4थे, 5वे किंवा 6वे वचन आहे. तो म्हणाला, जेव्हा तो योहानाविषयी बोलत होता, “जर हे पत्करण्याची तुमची इच्छा असेल,” तर ज्याच्याविषयी सांगितले, “तो हाच आहे, मी आपल्या दूताला तुझ्यासमोर पाठवतो.” आता मलाखी 3 वाचा. काही जण येथे मलाखी 4चे वचन येथे लागू करतात. नाही, महाशय, ते नाही.

210 मलाखी 4कडे लक्ष द्या, जेव्हा मलाखी 4चा दूत पुढे जातो, पृथ्वी पूर्णरितीने जळून गेलेली आहे, आणि नीतीमान हजार वर्षाच्या काळात, त्या राखेवरुन चालून जातात. म्हणून, तुम्ही जर ह्याची तुलना अर्थात मलाखी 4ची तुलना मागे योहानाशी करता, तर बायबल तुम्हाला अशा गोष्टी सांगते ज्या तशा नव्हत्या. आता 2000 वर्षे झाली आहेत, आणि अजून पृथ्वी जळली नाही, आणि नीतीमान त्यात राहत आहेत. म्हणून हे निश्चितच भविष्यात होणार आहे. ओह, माझ्या प्रभू! [भाऊ ब्रॅन्हम त्याच्या हातांनी एकदा टाळी वाजवतात.—संपा.]

211 जर तुम्ही येथे प्रकटीकरणात पाहिले आणि पाहिले की हा दूत ह्या युगाच्या शेवटी काय करणार आहे. तर तुम्हाला समजेल की ते काय आहे. तो संदेष्टाच असला पाहिजे. त्याला ह्या गोष्टी पकडायच्या आहेत, ज्या ह्या सुधारकांनी पाहिल्या नाही, आणि त्या योग्य जागी लावायच्या आहेत.

212 मत्तय 28:19 ची तुलना प्रेषित 2:38शी, देवाच्या आत्मिक प्रकटीकरणाशिवाय कशी होऊ शकते? ही लोक असे कसे सांगू शकतात की, चमत्काराचे दिवस होऊन गेले, आणि अशा प्रकारचे काही, आणि तेही देवाच्या प्रकटीकरणाशिवाय? मग त्याचद्वारे त्यांना कळू शकेल की, ते बरोबर आहे किंवा चूकीचे आहे! समजले? परंतु ते हे शिक्षण धार्मिक संस्थेतून घेऊन आले आहेत. माझी आशा आहे की, आपल्याकडे इतका समय आहे की त्यात पाहता येईल.

213 मी घाई करु इच्छितो, कारण मी तुम्हाला ह्या शिक्क्याच्या खुलास्यावर, एक आठवड्यापेक्षा अधिक थांबवू इच्छित नाही, तुम्हाला माहीत आहे की, मला काय म्हणायचे आहे. माझ्याकडे एक दिवस आहे, आणि मला त्यादिवशी शक्य असेल तर, आजाऱ्याकरिता प्रार्थना करायला आवडेल.

214 आता, मलाखी 4 बघा, तो एक संदेष्टा आहे, आणि “वडिलांचा मूळ विश्वास पून्हा स्थापित करतो.”

215 अंतिम समयात, जेव्हा महासंकटाचा समय येतो…आता येथे एक छोटीशी गोष्ट आहे, ज्यास आपण मागील गोष्टींवरुन पाहणार आहोत; जेथे साडे तीन वर्ष…किंवा दानिएलाची सत्तर सप्तके, दानिएलाच्या सत्तर सप्तकातील अर्धसप्तक, जो साडे तीन वर्षांचा काळ आहे. आता मंडळीच्या काळातील, ह्या गोष्टी किती जणांना लक्षात आहेत? [मंडळी म्हणते, “आमेन.”—संपा.] पाहिले? “सत्तर सप्तकाचा काळ ठरविला होता.” पाहा, तो किती परिपूर्ण होता. म्हटले आहे, “मसीहा येईल आणि तो छेदला जाईल, त्याचे अर्पण होईल, हे त्या सप्तकामध्ये होईल, आणि करार तोडण्यात येईल.” त्यानंतर तेथे अजूनही साडेतीन वर्षे आहेत, ज्यामध्ये यहुद्यांना मसीहाचे शिक्षण देण्यात येईल.

216 आणि परमेश्वर यहुदी आणि परराष्ट्रीय ह्या दोघांशी एकाच वेळी व्यवहार करीत नाही. तो इस्त्राएलशी एक राष्ट्र म्हणून व्यवहार करतो, तर परराष्ट्रीयांसाठी व्यक्तिगतरित्या करतो. त्याने परराष्ट्रीयांना आपली वधू म्हणून कधीच निवडले नाही; त्याने परराष्ट्रीयांतून लोकांना आपली वधू म्हणून बाहेर काढले. समजले? आता तो इस्त्राएलाशी एक राष्ट्र म्हणून व्यवहार करतो. आणि आता, ती तेथे, एक राष्ट्र म्हणून बसलेली आहे.

217 मला आज एक पत्र पौल, पौल बॉईड कडून मिळाले. आणि तो मला सांगत होता, “भाऊ ब्रॅन्हम, हे किती सत्य आहे! ह्या यहुद्यांमध्ये आजही परराष्ट्रीयांविषयी विचित्र कल्पना आहेत, त्यांना त्याच्याशी काहीच कर्तव्य नाही की, काय घडले आहे.” निश्चितच, ते तसेच असतील. त्यांना तसेच असले पाहीजे.

218 जेव्हा मार्टीन लूथरने घोषणा केली, की, “सर्व यहूद्यांना हाकलले पाहिजे, आणि त्यांच्या इमारती जाळायला पाहिजे, कारण ते ख्रिस्तविरोधी आहेत.” पाहा? मार्टीन लूथरने असे विधान, स्वतः, त्याच्या लिखाणात केले. आता, हिटलरने ते पूर्ण केले जे मार्टिन लुथर म्हणाला होता. मार्टिन लूथर असे का म्हणाला? कारण तो एक सुधारक होता, संदेष्टा नव्हता.

219 परमेश्वर, म्हणाला, “माझ्या संदेष्ट्याने इस्त्राएलाला आशिर्वादीत केले आहे, तो म्हणाला, जो तुला आशीर्वाद देईल, तो आशिर्वादित होईल, आणि जो तुला शाप देईल तो शापीत होईल.” असे कसे होईल की, एक संदेष्टा उभा राहतो आणि दुसऱ्या संदेष्ट्याने सांगितलेल्या गोष्टींचा नकार करतो? तो असे करु शकत नाही. पाहा, तेथे ऐक्य असले पाहीजे.

220 परंतु हेच कारण आहे की, ते दर्जा ठरवितात…पाहा, जर्मनी हे एक ख्रिस्ती राष्ट्र असायला पाहीजे होते, आणि, ते इस्त्राएलाशी अशाप्रकारे वागले! त्यांच्या खांद्यावर अजूनही छडी आहे, आणि तुम्ही त्यांना दोष देऊ शकत नाही. परंतु हे लक्षात ठेवा. यहूदी येथे बसलेले आहे, तुम्हाला चिंता वाटत नाही काय की, तो दिवस येत आहे! परमेश्वर त्यांना कधीच विसरु शकत नाही. त्यांना आपल्याकरिता आंधळे करण्यात आले.

221 तुम्हाला माहीत आहे, त्याने संदेष्ट्यास सांगितले होते, तो…तो संदेष्टा मोठ्याने ओरडून म्हणाला, “तू इस्त्राएलला विसरशील काय?”

222 तो म्हणाला, “मोजपट्टी घे; आकाश किती उंच आहे? समुद्राची खोली किती आहे?”

तो म्हणाला, “मी ते मोजू शकत नाही.”

223 तो म्हणाला, “मी इस्त्राएलाला विसरु शकत नाही.” ते त्याचे लोक आहेत, त्याचे सेवक आहेत.

224 आणि परराष्ट्रीयांतून, फक्त काहीजण त्याची वधू, म्हणून घेतले जातील. ते अगदी बरोबर आहे. तीच वधू आहे.

225 आता सांगितले, सत्तर सप्तके नियुक्त करण्यात आली होती, आणि ते अगदी बरोबर आहे; तसे दानीएल म्हणाला की, मसीहा येईल आणि सप्तकाच्या मध्यात छेदला जाईल. आणि येशूने साडे तीन वर्षांविषयी भविष्यवाणी केली. आता, ह्या दानीएलाच्या साडे तीन वर्षांच्या, मध्यात, मसीहा छेदला गेला. परंतु आता जो शेवटचा भाग आहे, तो महासंकटाचा काळ आहे, जेथे परराष्ट्रीय मंडळी आहे. ओह, हे महान आहे! आता...वधू वराबरोबर जाते; नंतर हजार वर्षांच्या काळानंतर, दूष्टांच्या राखेवरुन चालून निघून जाते.

226 येथे मी तुम्हाला काही गोष्टी दाखवितो, ज्या आपण येथे असता माझ्या मनात आल्या. मी तुम्हाला दाखवितो की, बायबल ह्याविषयी काय सांगते. आणि आपण हे देवाचे वचन असल्यामळे नाकारु शकत नाही. जर आपण तसे करु, तर आपण नास्तिक आहोत. पाहा, आपल्याला त्यावर विश्वास केला पाहीजे. तुम्ही म्हणता, "मला ते समजत नाही." मलाही समजत नाही. परंतु मी ते प्रगट करण्यासाठी त्याच्याकडे पाहतो. पाहा.

*पाहा, भट्टीसारखा तप्त दिवस येत आहे, सर्व गर्विष्ठ* (अमेरिकातल्या लोकांसारखे आणि वगैरे) *...व सर्व दुराचारी धसकट बनतील.* (ते सर्व जळणार आहेत) *तो येणारा दिवस त्यांस जाळून टाकील, त्यांचे मूळ, फांदी* वगैरे *काहीच राहू देणार नाही.* असे *सेनाधीश परमेश्वर म्हणतो.*

227 तेथे सार्वकालिक नरक आहे, हे तुम्ही कसे म्हणता? पाहा, ते अंतिम दिवसात होणार आहे, जेव्हा ह्या गोष्टी प्रगट केल्या जातील. बायबलमध्ये असे कुठेही लिहीलेले नाही की, नरक सार्वकालिक आहे. म्हणूनच सार्वकालिक नरकात असण्यासाठी तुमच्याकडे सार्वकालिक जीवन असले पाहिजे. सार्वकालिक जीवनाचे एकच रुप आहे, आणि त्याचसाठी आपण संघर्ष करीत आहोत. सर्वगोष्टी, ज्यास सुरुवात आहे, त्याचा अंतही आहे. "नरक सैतान व त्याच्या दूतांसाठी निर्माण केला होता," ते गिळले जाईल आणि नष्ट केले जाईल. बरोबर आहे. समजले? परंतु जेव्हा हे घडले, "त्यांचे मूळ अथवा फांदी शेष राहणार नाही."

*परंतु तुम्ही जे माझ्या नामाचे भय धरणारे, त्या तुम्हावर न्यायत्वाचा सूर्य उदय पावेल. त्याच्या पंखाच्या ठायी आरोग्य असेल...तुम्ही गोठ्यातल्या* वत्सांप्रमाणे *बाहेर पडून बागडाल.*

*तुम्ही दूष्टांस तुडवाल; कारण मी हे करीन, त्या दिवशी ते तुमच्या पायांच्या तळव्यांखाली राखेप्रमाणे* होतील, *असे सेनाधीश परमेश्वर म्हणतो.*

228 महासंकटानंतर दूष्ट कोठे जातील? राखेत.

*माझा सेवक मोशे याला सर्व इस्त्राएलासाठी म्हणून होरेबांत मी* शिक*विलेले* धर्मशास्त्र, *म्हणजे अर्थात नियम व* निर्णय *यांचे स्मरण ठेवा.*

*पाहा, परमेश्वराचा मोठा व भयंकर दिवस* येण्यापूर्वी *मी एलिया संदेष्ट्यास* तुम्हाकडे *पाठवीन:*

229 आमेन! येथे जुन्या कराराची समाप्ती अशीच होते, आणि नविन कराराची समाप्तीपण त्याच प्रकारे होत आहे. तुम्ही ह्यापासून कसे दूर राहणार आहात? तूही असे करु शकत नाही. आता पाहा, "तो दिवस येण्यापूर्वी मी एलिया संदेष्ट्यास तुम्हाकडे पाठवीन."

*आणि तो वडिलांचे* हृदय *त्यांच्या पुत्रांकडे व पुत्रांचे* हृदय *त्यांच्या वडिलांकडे वळवील. मी भूमीला शापाने ताडण करावे असे न होवो.*

230 ते असेच व्हायला पाहीजे. ते परमेश्वराचे वचन आहे. त्याने त्याचे अभिवचन दिले आहे. ते आले पाहीजे. आणि आता जर तुम्ही पाहाल की, हे कसे घडते, ते सुंदर आहे! देव कशाप्रकारे ते करतो. वधू वराबरोबर पुढे जाते आणि—आणि त्यानंतर, दूष्ट न विझणाऱ्या अग्नीत भस्म केला जाईल. आणि पृथ्वी शुध्द झाल्यानंतर पुर्नः उत्पत्ती होईल. सर्वांना हे करावे लागणार आहे, प्रत्येकाला ह्या शुध्दीकरणाच्या अवस्थेतून जावे लागणार आहे.

231 त्या भयंकर अंतिम समयात ज्वालामुखी फुटतील, पृथ्वी फाटेल आणि दुभंगली जाईल, आणि पापाचे सर्व हौद आणि पृथ्वीवरील सर्व अशा गोष्टी जळून नष्ट होतील. ते अशा तप्त अग्नीने जळतील की, ज्याप्रमाणे शाहीचे थेंब ब्लीचमध्ये पडल्यावर पुन्हा आपल्या मुळ अवस्थेत परिवर्तीत होते, त्याचप्रकारे परमेश्वराकडून येणारा अग्नी इतका तप्त असेल की, तो प्रत्येक घाणेरड्या वस्तूला त्याच्या मूळ अवस्थेत परिवर्तीत करील, जेव्हा सैतान व सर्व पाप आणि सर्व गोष्टी जळून नष्ट केले जाईल. आणि त्यानंतर पृथ्वी अशा सुंदररुपात बाहेर येईल, जशी ती एदेन बागेत होती. ते खरे आहे. किती महान समय आपल्या पुढे ठेवला आहे!

232 महासंकटाच्या काळात. येथे हीच लहानशी गोष्ट की, ज्याकडे माझी इच्छा आहे की तुम्ही लक्ष द्यावे. महासंकटाच्या काळात वधूला बाहेर बोलावले गेल्यानंतर, आणि मंडळी महासंकटातून जाते, एक लक्ष चव्वेचाळीस हजार, प्रकटीकरण 11अध्यायातील दोन साक्षीदाराद्वारे बाहेर काढले जातील. आता पाहा, ते तरट पांघरुन एक हजार दोनशे साठ दिवस संदेश सांगतील.

233 आता आपल्याला रोमन कॅलेंडरविषयी माहीत आहे...आपल्याकडे अठ्ठावीस दिवस असतात आणि कधी तीस आणि एकतीस दिवस असतात. परंतु वास्तवात यहुदी कॅलेंडरमध्ये प्रत्येक महिन्याचे तीस दिवस असतात, बरोबर आहे आणि आता एक हजार दोनशे साठ दिवस घ्या आणि तीस दिवसाने भाग द्या आणि पाहा तुम्हाला काय मिळते? बरोबर साडे तीन वर्षे. तेवढा समय इस्त्राएल लोकांना मसीहाचा प्रचार करण्यासाठी देण्यात आला आहे. जसे मागे तेथे झाले होते. जेव्हा तो परत येतो, तो स्वतःला चिन्हाच्या रुपात प्रगट करतो, जेव्हा तो येतो...

234 जेव्हा योसेफाला दुसऱ्या देशात गुलाम म्हणून नेले होते आणि त्याच्या भावांद्वारे तो नाकारला गेला, कारण तो एक आत्मिक व्यक्ती होता. तो दृष्टांत पाहू शकत होता आणि स्वप्नांचा अर्थ सांगू शकत होता. आणि जेव्हा त्याने असे केले, तेव्हा त्याला तीस चांदीच्या शिक्क्यासाठी विकले गेले. तो ख्रिस्ताला दर्शवित आहे, कारण खिस्ताचा आत्मा त्याच्यात होता.

235 नंतर काय घडले, त्याकडे लक्ष द्या. आणि लक्ष द्या, की जेव्हा त्याने हे केले, त्याला कैदेत टाकण्यात आले, आणि एक मनुष्य वाचला होता आणि दुसऱ्याचा नाश झाला. ज्याप्रकारे येशू, जेव्हा तो वधस्तंभावर होता; एक चोर वाचला गेला, आणि दुसऱ्याचा नाश झाला, अगदी तसेच.

236 योसेफ मेला हे समजून, त्याला खड्यात टाकण्यात आले, आणि त्याला बाहेर काढण्यात आले, आणि त्याला फारोच्या उजवीकडे बसविण्यात आले, योसेफाच्या हुकुमाशिवाय फारोकडे कोणी जाऊ शकत नव्हते. येशूही देवाच्या उजवीकडे बसला आहे आणि पुत्राशिवाय पित्याकडे कोणीही मनुष्य जाऊ शकत नाही. बरोबर आहे.

237 आणि लक्ष द्या, जेव्हा योसेफ बाहेर निघत असे; जेव्हा योसेफ राजासनाच्या उजवीकडून बाहेर निघत असे! लक्ष द्या. महिमा! तेथे योसेफ बसत असे, फारोच्या

उजवीकडे. आणि जेव्हा योसेफ राजासन सोडून उठत असे, तुतारी वाजत असे. “सर्वांनी गुडघे टेका! योसेफ येत आहे!”

238 जेव्हा कोकरा त्याचे मध्यस्थीचे दिवस समाप्त झाल्यावर, राजासन सोडतो, जेव्हा तो राजासन सोडतो, आणि ते मुक्तीचे पुस्तक घेतो आणि पुढे चालतो, प्रत्येक गुडघा टेकला जाईल. तो तेथे आहे. लक्ष द्या.

239 आणि जेव्हा योसेफाला, त्याच्या भावांनी नाकारले, त्याला परराष्ट्रीय पत्नी देण्यात आली. पोटीफराने त्याला दिली होती...किंवा फारोने त्याला एक-एक परराष्ट्रीय पत्नी दिली, आणि त्याने परराष्ट्रीय संतानाला जन्म दिला, अर्धे परराष्ट्रीय आणि यहूदी. त्यांनी एक महान चिन्हे दिले. जेव्हा याकोब त्यांना आशीर्वाद देत होता, एक बाजूला एफ्राईम आणि मनश्शे दुसऱ्या बाजूला होता, त्याने त्याचे हात उजवेडावे केले आणि लहान मुलाला आशीर्वाद दिला आणि त्या दोन मुलांना बारा वंशामध्ये जोडले, जे त्यावेळी फक्त दहाच होते, आणि त्याने त्यांना याकोबात म्हणजे स्वतः त्याच्यामध्ये आशीर्वाद दिला. आणि योसेफ, त्याचा भविष्यवक्ता पुत्र, तेथे उभा होता, म्हणाला, “बाबा, तुम्ही हे चुकीचे केले.” म्हणाला, “तू तुझ्या उजव्या हाताने आशीर्वाद धाकट्याला दिला, जेव्हा तो ज्येष्ठवर ठेवायला पाहीजे होते.”

240 आणि तो म्हणाला “मला ठाऊक आहे, माझे हात उजवेडावे केले, परंतु देवानेच त्यांना उजवेडावे केले आहे.” असे का झाले? इस्त्राएल कडे वधू बनण्याचा अधिकार होता, परंतु त्यांनी त्यास नाकारले आणि त्यांचा ज्येष्ठत्वाचा अधिकार विकला, आणि... तो ज्येष्ठ पुत्र इस्त्राएलकडून, नवा पुत्र परराष्ट्रीयांकडे गेला. आणि हा आशीर्वाद वधस्तंभाद्वारे, तेथून, परराष्ट्रीयांकडे गेला.

241 परंतु ह्यानंतर, बघा, त्याद्वारे, जेव्हा सर्व...योसेफाने आपली वधू घेतली. परंतु जेव्हा त्याचे भाऊ तेथे धान्य विकत घेण्यासाठी आले...

242 ओह, हे असे सुंदर चित्र आहे! मी शिक्क्यांपासून विषयांतर केले आहे, परंतु मला ते सांगितलेच पाहीजे, पाहा, कारण ह्याद्वारे तुम्हाला अधिक चांगले समजेल, असा माझा विश्वास आहे. लक्ष द्या.

243 आता, तुम्हाला माहीत आहे की, जेव्हा ते धान्य विकत घेण्यासाठी आले, तेव्हा योसेफाने त्यांना लगेच ओळखले. आणि योसेफ हा संपन्नतेचा पुत्र होता. तो जेथे कोठे गेला, तो सदैव संपन्न झाला.

244 तो पृथ्वीवर पुन्हा येईपर्यंत तुम्ही वाट पाहा; आपला योसेफ येईपर्यंत वाट पाहा! समजले? “वाळवंट गुलाबासारखे बहरेल, आणि नीतीमत्त्वाचा सूर्य उदय पावेल. त्याच्या पंखाच्या ठायी आरोग्य असेल.” ओह, माझ्या प्रभू! ॲरिझोना सभोवतालचे सर्व निवडुंग सुंदर झाडांमध्ये बदलून जातील, आणि ती आणि ती सुंदर होईल.

245 लक्ष द्या, येथे तो पुढे येतो आणि तेथे तो लहान युक्ती खेळतो. आणि तो त्याच्यातील एकास परत पाठवतो, आणि तो विचारतो, “माझा बाप अजून जीवंत आहे काय?” समजले? त्याला जाणायचे होते की, त्या मुलाचा बाप जीवंत आहे काय? तो म्हणाला, “होय.” त्याला माहीत होते की, तो त्याचा भाऊ होता. परंतु तुम्ही हे पाहीले का की तो त्याला त्याच्या भावांस प्रगट करण्यास केव्हा तयार झाला?

246 आणि त्याला लहान बन्यामीन भेटला, ज्याचा जन्म तेव्हा झाला होता, जेव्हा योसेफ निघून गेलेला असतो. आणि तो ह्या यहूद्यांना दर्शवितो, हे एक लक्ष चव्वेचाळीस जे तेथे

एकत्र होत आहेत, जेव्हा तो निघून गेलेला असतो आणि जेव्हा तो परत आला, तो म्हणाला...त्याने बन्यामीनाकडे पाहीले; त्याचे हृदय फुटू लागले.

247 आणि, लक्षात ठेवा, ...त्यांना माहीत नव्हते की, त्याला इब्री भाषा बोलता येते. तो त्यांच्याशी अनुवादकाद्वारे बोलत होता. तो एक मिसरी असल्यासारखा वागत होता. पाहीले? आणि तेव्हा जेव्हा हे सांगण्यात आले, तो त्याची ओळख देऊ इच्छित होता, तो छोट्या बन्यामीनाकडे पाहत राहीला. आणि, लक्षात घ्या की, त्याने त्याच्या पत्नीस वेगळे केले होते. ती महालात होती जेव्हा त्याने त्याच्या भावास त्याची ओळख दिली.

248 आणि त्याची परराष्ट्रीय वधू, त्याची पत्नी येशू त्याच्या स्वतःच्या लोकांद्वारे नाकारल्या गेल्यानंतर, तो परराष्ट्रीय वधूला घेऊन गेला. आणि लग्नाच्या भोजनासाठी येथून महालात, त्याच्या पित्याच्या घरी गौरवात नेणार आहे आणि पुन्हा खाली येईल. त्याच्या लोकांना त्याची ओळख देईल. ते एक लक्ष चव्वेचाळीस हजार आहेत...? ... त्या वेळ ती महालात होती.

249 तेथे तो उभा आहे आणि लक्षात ठेवा, ह्या चिन्हाकडे पूर्णतः लक्ष द्या. जेव्हा तो त्यांच्याकडे आला, जेथे ते होते, त्याने त्यांच्याकडे पाहीले, आणि तो म्हणाला– तो म्हणाला...त्यांच्याकडे पाहू लागला. आणि ते आपसात बोलू लागले. ते म्हणाले, "आता, रुबेन, तुला माहीत आहे की, आपण येथे कशाकरिता आहोत. कारण, तुला माहीत आहे की, आपण काय केले आहे. आपण ह्या मुलाला खड्ड्यात टाकले होते. आता, आपण आपल्या भावाला विकावयास नको होते." त्यांचा भाऊ तेथे उभा होता, तो सामर्थी राजकुमार, आणि त्यांना ते ठाऊक नव्हते.

250 हेच कारण आहे की, इस्त्राएल त्याला आजही ओळखू शकत नाही. त्याला ओळखण्याचा समय अजून आला नाही.

251 आणि तेव्हा, तो, त्यांना वाटले की, तो इब्री भाषा समजू शकत नाही, परंतु तो त्यांच्या गोष्टी ऐकत होता. ते म्हणाले, "आता आपण येथे ह्या कारणामुळे आहोत." आणि योसेफाने, जेव्हा त्यांच्याकडे पाहीले; तो स्वतःला अधिक वेळ थांबवू शकला नाही.

252 आता लक्षात ठेवा की, त्या समयी त्याची पत्नी आणि लेकरे महालात होते. तेव्हा संतजन त्याच्या उपस्थितून बाहेर गेले होते.

253 आणि त्याने म्हटले, "मी तुमचा भाऊ योसेफ आहे." आणि तो धावत गेला आणि त्याने आपला छोटा भाऊ बन्यामीनाला मीठीत घेतले, आणि तो गळयात गळा घालून रडू लागला. पाहीले? आणि त्याने त्यास स्वतःला प्रगट केले.

254 आणि तेव्हा त्यांनी म्हटले, "आता आम्हाला समजले की, येथे आम्हाला यावे लागले; कारण आम्ही त्याला विकले होते. आम्हीच आहोत ज्यांनी त्याला विकले होते. आम्हीच ते आहोत, ज्यांनी त्याला मारण्याचा प्रयत्न केला होता, आणि आता आम्हाला माहीत आहे की तो आम्हाला मारेल."

255 त्याने म्हटले, "तुम्ही संताप करुन घेऊ नका, कारण तुमचे प्राण वाचवावे, म्हणून देवाने मला तुमच्यापुढे पाठविले."

256 जसे आपण त्याचा अभ्यास करीत आलो आहे की, जेव्हा त्याने आपणा स्वतःस प्रगट केले, बायबल म्हणते...जेव्हा तो स्वतःस त्या एक लाख चव्वेचाळीस हजारावर प्रगट करील, आजच्या छोट्या बन्यामीनावर आणि त्या शेष राहिलेल्या यहुद्यांना जेव्हा, तो स्वतःची ओळख देईल, तेव्हा ते म्हणतील, "तुला ह्या जखमा कसल्या? त्यांनी तुझ्या हातांना हे काय केले?"

257 तर तो म्हणेल, “ओह, माझ्या इष्ट मित्रांच्या घरी लागलेल्या घावांचे हे व्रण आहेत.” पाहीले? ओह, तेव्हा त्यांना समजले की, त्यांनी मसीहाचा वध केला. परंतु तो त्यांना काय सांगेल? तेच जे योसेफाने म्हटले. “प्राण वाचवावे म्हणून तुम्ही ते केले. ह्यासाठी तुम्ही जीवंत राहावे. तुम्ही संताप करुन घेऊ नका.” कारण, जर यहूदीयांनी अंधत्वासारख्या गोष्टी केल्या नसत्या, तर परराष्ट्रीय आत आले नसते. म्हणून, त्याने मंडळीचे जीवन वाचवले, त्यांनी केलेल्या गोष्टींद्वारे. हेच कारण आहे की, तुम्ही येथे आहात. आज ते ह्या गोष्टी समजू शकत नाही; हा तो समय नाही.

258 आपणही ह्या गोष्टी समजू शकत नाही जोपर्यंत त्या समजण्याचा समय येत नाही. ओह, माझ्या प्रभू! प्रकटीकरणाच्या, ह्या सात गर्जनांद्वारे, तो त्याच्या वधूला त्या महान रुपांतराच्या विश्वासासाठी कसे तयार व्हावे हे दाखवो!

259 आता, आपण घाई करुया, कारण आपल्याकडे जवळ जवळ पंधरा, वीस मिनीटे ही नाहीत.

260 आता, ह्या पांढऱ्या घोड्याचा अर्थ काय आहे? मला वाचू द्या...मी एवढा वेळ विषयांपासून दूर होतो; विषयापासून दूर गेल्याबद्दल मला क्षमा करा. परंतु, मी ते वचन पुन्हा वाचेन, दोन वचने...

> *आणि कोकऱ्याने त्या सात शिक्क्यांपैकी एक शिक्का* फोडला, *ते मी पाहीले.* तेव्हा *चार प्राण्यांपैकी एक मेघगर्जनेसारख्या ध्वनीने ये असे म्हणाला, ते मी ऐकले.*
>
> *आणि मी पाहीले, एक पांढरा घोडा...*

261 आता आपण 2ऱ्या वचनाकडे जाणार आहोत.

> *...मग मी पाहीले, तो एक पांढरा घोडा आणि त्याच्यावर बसलेला स्वार माझ्या दृष्टीस पडला, त्याच्याजवळ धनुष्य होते, मग त्याला मुगूट देण्यात आला.* (तो मग त्याच्याजवळ नव्हता)...*तो विजय मिळवीत, मिळवीत आणखी विजयावर विजय मिळविण्यास निघून गेला.*

262 हेच सर्व आहे. तोच पब्रॅला शिक्का आहे. आता आपण चिन्हाकडे पाहुया.

263 आपण समजून घेतले आहे की, गर्जनेचा अर्थ काय आहे ते आपल्याला पूर्णरितीने कळले आहे. शिक्का उघडल्यावर मेघगर्जनेचा जो ध्वनी झाला, ती देवाचीच वाणी होती.

264 आता, पांढऱ्या घोड्याचा अर्थ काय आहे? आता, हे तेच आहे, जेथून प्रकटीकरण येते. मी ह्या प्रती इतका निश्चित आहे की, जसे मी येथे उभा आहे, मला माहीत आहे की, हे परमेश्वराचे वचन आहे.

265 मी ह्यावर लिहीलेले प्रत्येक पुस्तक वाचले आहे, जे मला मिळू शकले...मागच्या वेळी अंदाजे तीस वर्षांपूर्वी, मी त्याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला होता. ह्यासाठी मी हे शिकवू शकेन. मी ते पुस्तक घेतले...कोणीतरी मला सांगितले की, ॲडवेनटिस्टना ख्रिस्ताच्या दूसऱ्या येण्याविषयी इतर लोकांपेक्षा अधिक प्रकटीकरण आहे, म्हणून मी वाचण्यासाठी, त्यांची काही चांगली पुस्तके शोधली. मला स्मिथ यांचे दानिएलवर, प्रकटीकरणावरचे पुस्तक मिळाले. आणि त्याने म्हटले हा पांढरा घोडा, जो निघाला होता, तो पांढरा होता आणि ते विजयाचे चिन्ह आहे. आणि ह्या विजयात...तुमच्यातील येथे कित्येक ॲडवनटिस्ट भाऊ ह्या पुस्तकाविषयी जाणतात, आणि इतरांमधील पुष्कळजण, सुध्दा, पुस्तके वाचण्याद्वारे जाणतात. आणि ह्या व्यतिरिक्त मी दोन किंवा तीन पुस्तके आणखी वाचली. मी वाचली होती, आणि मी काही सांगू शकत नाही...आणि मी आणखी

दोन पुस्तके वाचली, आणि ते दोघेही त्यावर सहमत होते की, ते खरे आहे. [भाऊ ब्रॅन्हम पाच वेळा मंचावर खटखट करतात.—संपा.] ते एक चांगले शिक्षक होते आणि काही सर्वोत्कृष्ट शिक्षकांमधील एक होते, ज्यांना ह्याविषयी चांगली समझ होती. म्हणून मी विचार केला, "जर मला हे माहीत नसले, तर मी केवळ ते सांगेन जे त्यांनी सांगितले आणि तशाचप्रकारे शिकवण्याचा प्रयत्न करेन."

266 त्यांनी त्याविषयी फार चांगले उद्गार काढले, त्याचा वास्तविक काय अर्थ आहे. आणि ते म्हणाले, "आता, येथे एक पांढरा घोडा, आहे आणि पांढरा घोडा एक सामर्थ्य आहे, एक सैन्याधिकाऱ्याचा घोडा आहे." आणि म्हणाला, "जो व्यक्ती त्यावर म्हणजे पांढऱ्या घोड्यावर बसलेला होता, तो पवित्र आत्मा होता जो प्राचीन काळात पुढे जातो आणि तो काळ परमेश्वराच्या राज्यासाठी जिंकतो. त्याच्या हातात एक धनुष्य आहे, ज्याचा अर्थ, जसे प्रीतीचा देव, तो लोकांच्या हृदयात प्रेमाचे बाण सोडतो, प्रीतीचा देव, आणि त्याने जय मिळविला आहे."

267 आता, ह्या गोष्टी खूप चांगल्या वाटतात, परंतु ते सत्य नाही, नाही. महाशय. ते सत्य नाही. पांढरा रंग म्हणजे नीतीमत्व. आम्ही—आम्ही ते असेच समझतो. पांढरा रंग म्हणजे नीतीमत्व. शिक्षकांनी शिकविले की, तो पवित्र आत्मा होता, जो पहील्या युगात जय मिळवीत होता; परंतु पवित्र आत्म्याद्वारे माझे प्रकटीकरण तसे नाही.

268 पवित्र आत्म्याद्वारे, माझे प्रकटीकरण हे आहे की, ख्रिस्त आणि पवित्र आत्मा एकच व्यक्ति आहे, फक्त वेगळया स्वरुपात. *म्हणून, येथे* ख्रिस्त, कोकऱ्याच्या रुपात उभा आहे. आपल्याला ठाऊक आहे की, तो कोकरा होता. तो *येथे* त्याच्या हातात पुस्तक घेऊन उभा होता; आणि *तेथून* पांढरा घोडेस्वार निघतो, पाहीले, म्हणून तो पवित्र आत्मा नव्हता.

269 आता, हे अंतिम दिवसांतील रहस्यामधील एक आहे की, ख्रिस्त एकात तीन व्यक्ती कसा असू शकतो. पिता, पुत्र, व पवित्र आत्मा, तीन वेगळया व्यक्ती नाही, तीन परमेश्वर, जसे त्रैक्य मानणारे आपल्याला सांगण्याचा प्रयत्न करतात. ते तीन आहेत, ते एकाच व्यक्तीची तीन रुपे आहेत किंवा, तुम्ही त्याला तीन कार्यालय असे म्हणू शकता. जर तुम्ही सेवक गणाशी बोलत असाल, तर तुम्ही कार्यालय हा शब्द वापरणार नाही, कारण, मी विचार करतो की, मी टेपवर बोलत आहे. म्हणून मी तुम्हाला सांगेन...ख्रिस्ताने असे सांगितले नाही, "मी माझ्या कार्यालयातून प्रार्थना करेन, आणि तो तुमच्यासाठी एक आणखी कार्यालय पाठवील." आपल्याला हे ठाऊक आहे. परंतु जर तुम्ही हे जाणू इच्छिता...ते एकाच परमेश्वराचे तीन गुणधर्म आहे. समजले? ते तीन परमेश्वर नाही. परंतु एकच परमेश्वराचे तीन गुणधर्म आहेत! समजले?

270 आणि म्हणून *तेथे* ख्रिस्त पांढऱ्या घोड्यावर कसा असू शकतो, जय मिळविताना आणि *येथे* हातात पुस्तक घेऊन कसा उभा राहू शकतो? तो–तो नाही. तो ख्रिस्त नाही.

271 आता लक्ष द्या, की (प्रकटीकरणात) पवित्र आत्मा आणि ख्रिस्त एक आहेत, पवित्र आत्मा हे ख्रिस्ताचे दूसरे रुप आहे. बरोबर आहे.

272 लक्ष द्या, तो कोकरा आहे, जो पुस्तक उघडतो, आणि कोकरा ख्रिस्त आहे. आणि त्यानंतर ख्रिस्त पुन्हा कुठेही दिसत नाही; परंतु तो प्रकटीकरणाच्या पुस्तकात, 19व्या अध्यायात, पांढऱ्या घोड्यावरुन येताना दिसतो.

273 जर तुम्हाला ते वाचायला आवडेल, तर आपण प्रकटीकरण 19:11 मध्ये वळूया. सहा...आणि ते जलदरितीने वाचूया. मी आशा करतो की, आपल्याकडे पुरेसा समय आहे, आपल्याला हे समजण्यासाठी चांगले होईल. प्रकटीकरण 19:11. 11व्या वचनापासून सुरुवात करुया आणि 16व्या वचनापर्यंत वाचूया.

*आणि नंतर मी स्वर्ग उघडलेला पाहिला, ...तो पाहा, एक पांढरा घोडा.* (पाहा पृथ्वीवर नाही, परंतु स्वर्गात.) *आणि विश्वसनीय व सत्य असा म्हटलेला एक* स्वार *त्याच्यावर बसलेला मला दिसला...तो* नीतीने न्यायनिवाडा करितो *आणि लढतो.*

*त्याचे डोळे अग्नीच्या* ज्वालेसारखे *आहेत व त्याच्या डोक्यावर पुष्कळ मुगुट आहेत.* (राजमुकूटावर लक्ष द्या!) *त्याच्यावर एक नाव लिहीलेले आहे, ते त्याच्यावाचून* कोणालाही *कळत नाही, परंतु...त्यालाच*

274 मला वाटते, मी येथे थोड्या वेळेसाठी थांबावे. [भाऊ ब्रॅन्हम मंचावर एकदा ठोठावतात, आणि थांबतात—संपा.] ओह, माझ्या प्रभू! मला येथे चांगली कल्पना सुचली आहे. परंतु ...कदाचित मी ह्यावर जर तुम्ही...[मंडळी म्हणते, "पूढे सांगा!"—संपा.]

275 पाहा, ते कोणालाच माहीत नाही. तुम्हाला हे ठाऊक आहे काय की, "यहोवा" चे नाव बरोबर नाही? कोणाला माहीत आहे. डॉ. वायली, तुम्हाला माहीत आहे, हे खर आहे. अनुवादक त्याचा कधीच अनुवाद करु शकले नाही. त्याची अक्षरे अशी आहेत. जे–यू–एच–वी, म्हणजे, ते "यहोवा" नाही. ते त्याला स्पर्श करु शकले नाही, की हे काय आहे? त्यांनी "यहोवा," असे संबोधले; परंतु ते त्याचे नाव नाही.

276 पाहा, प्रत्येक वेळी विजय प्राप्त होतो, किंवा असेच काही होते, नाव बदलले जाते.

277 अब्राहामाच्या समयात पाहा. प्रथम, त्याचे नाव अब्राम होते, आणि त्याला कदापि मूल होऊ शकत नव्हते, जोपर्यंत त्याचे नाव अब्रामचे बदलून अब्राहाम होत नाही. आणि सारायला काही होऊ शकले नाही परंतु मृत कुस होती जोपर्यंत तिचे नाव साराह म्हणून बदलले गेले नाही.

278 *याकोब* म्हणजे, "लबाड, फसव्या," आणि तेच त्याने केले. त्याने करडांची कातडी त्याच्यावर लपेटली, आणि त्याच्या भविष्यवादी पित्याला, ज्येष्ठत्वाचा हक्क मिळवण्यासाठी फसवले. त्याने बदाम ह्या झाडाच्या छड्या सोलून त्याच्या पट्ट्या काढल्या, शेळयामेंढ्यासमोर पाणी पिण्याच्या कुंड्यात ठेवल्या, आणि त्या छड्यांसमोर शेळया मेंढ्या फळत आणि त्यास बांडी, ठिपकेदार व कबरी अशी पोरे होत. तो काही नाही, पण एक फसव्या होता!

279 परंतु एके रात्री त्याचा सामना एक खऱ्या वस्तूशी झाला, आणि त्याला कळले. ते खरे होते. आणि तो त्याबरोबर झगडत राहीला, आणि तो त्याबरोबर तोपर्यंत झगडत राहीला, जोपर्यंत तो विजयी होत नाही. आणि त्याचे नाव बदलण्यात आले, आणि त्याला *इस्त्राएल* म्हणण्यात आले, ज्याचा अर्थ होता की, "राजकुमार जो परमेश्वराशी युध्द करुन प्रबल ठरला."

280 हे बरोबर आहे काय? [मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.] प्रत्येक विजय मिळवणारा!

281 शिमोन हा कोळी होता. परंतु जेव्हा त्याचा विश्वास पक्का झाला आणि त्याने ओळखले की, तो येशू होता, जेव्हा त्याने त्याला म्हटले की, तो मसीहा आहे आणि त्याला त्याने त्याचे नाव काय आणि त्याच्या वडिलांचे नाव काय आहे हे सांगितले? तेव्हा तो विजयी झाला आणि त्याचे नाव शिमोनाचे पेत्र असे बदलले.

282 शौल, एक चांगले नाव आहे. शौल हा एके काळी इस्त्राएलचा एक राजा होता, परंतु, त्या *शौलाचे*, नाव, एका प्रेषिताला योग्य नव्हते. एका राजासाठी ते योग्य असेलही,

परंतु एका प्रेषितासाठी नव्हते. म्हणून येशूने त्याचे नाव बदलले (कशापासून) शौलाचे पौल केले.

तुम्ही "गर्जनांचे पुत्र," आणि दुसऱ्याकडे पाहा.

283 आणि, येशू, त्याचे नाव पृथ्वीवर "उध्दारकर्ता," येशू असे होते. जेव्हा तो पृथ्वीवर होता, तो तारणारा होता, हे बरोबर आहे. परंतु जेव्हा त्याने मृत्यु व नरक जिंकला, आणि त्यांच्यावर विजयी झाला, आणि स्वर्गात आरोहण केले. त्याला नविन नाव प्राप्त झाले. हेच कारण आहे की, ते आरडा–ओरड करतात, आणि त्यांना काहीच प्राप्त होत नाही.

284 ते मेघगर्जनेद्वारे प्रगट केले जाईल. होय. समजले? रहस्यांकडे लक्ष द्या. तो घोड्यावर स्वार होऊन, येत आहे...ही मंडळी बदलण्यासाठी तेथे काहीतरी असले पाहीजे. तुम्हाला ठाऊक आहे तेथे काहीतरी असले पाहीजे. लक्ष द्या, "त्याच्यावाचून कोणालाही कळत नाही." आता, पाहा, "त्याच्यावाचून कोणा मनुष्याला माहीत नाही. परंतु त्यालाच माहीत आहे."

*आणि रक्तात बुचकळलेले वस्त्र त्याने अंगावर घेतले होते आणि देवाचा शब्द हे नाव* त्याला *देण्यात आले होते.*

ओह, माझ्या प्रभू! लक्ष द्या!

*स्वर्गातील सैन्ये पांढऱ्या घोड्यांवर बसून पांढरी व शुध्द अशी तागाची तलम वस्त्रे अंगावर घालून त्याच्यामागे चालत होती.*

*त्याने राष्ट्रांस मारावे, म्हणून त्याच्या तोंडातून तीक्ष्ण धारेची तरवार* निघते. *तो त्यावर लोखंडी दंडाने अधिकार गाजवील, आणि सर्वसमर्थ देव ह्याच्या तीव्र क्रोधरुपी द्राक्षारसाचे कुंड तो तुडवितो.*

*त्याच्या वस्त्रावर व त्याच्या मांडीवर राजांचा राजा आणि प्रभूंचा प्रभू हे नाव लिहीलेले आहे.*

285 तोच मसीहा आहे. *तो* मसीहा आहे. *तेथे* पांढऱ्या घोड्यावर *जो* व्यक्ती येतो तो नाही. त्यातील फरक पाहा. *येथे* तो हातात पुस्तक घेऊन उभा आहे, त्या आणि मुक्तीचे कार्य फक्त...त्याने अजून त्याचे स्थान घेतलेले नाही. म्हणून, जो बाहेर निघाला आहे, तो ख्रिस्त, अथवा पवित्र आत्मा नाही.

286 मी त्या महान व्यक्तींशी असहमत नाही. नाही, महाशय, मी तसे करीत नाही. मला तसे करण्याची इच्छा नाही, परंतु मला त्याविषयी झालेले प्रकटीकरण आहे. समजले? जर तुमच्याकडे काही वेगळे प्रकटीकरण आहे. ते ठीक आहे, परंतु मी त्याच्याशी सहमत नाही. पाहा, मी–मी अशाप्रकारचा विश्वास करतो. आता, तुम्ही बघा, तुम्हाला माहीत आहे की, मी काय बोलतो. समजले?

287 आणि लक्ष द्या, ख्रिस्त त्या समयापासून पुढे दिसत नाही. परंतु तो पांढऱ्या घोड्यावर आहे. म्हणून जर हा व्यक्ती पांढऱ्या घोड्यावर स्वार होऊन येत आहे, तर तो केवळ ख्रिस्ताची नक्कल करीत आहे समजले? तुम्हाला ते समजले काय? [मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.]

288 लक्षात घ्या, पांढऱ्या घोडेस्वाराला काही नाव नाही. तो कदाचित दोन किंवा तीन उपाधिचा उपयोग करील, पाहीले, परंतु त्याचे काहीही नाव नाही.

289 परंतु ख्रिस्ताचे एक नाव आहे! ते काय आहे? देवाचा शब्द. हे तेच आहे. "प्रारंभी शब्द होता, आणि शब्द देवासह होता, आणि शब्दच देव होता. आणि शब्द देही झाला."

पाहीले? त्या स्वाराचे कुठलेही नाव नाही, परंतु ख्रिस्ताला “देवाचे वचन.” संबोधले आहे. तो तोच आहे. त्याला ते म्हटले आहे. आता त्याचे एक नाम आहे. जे कोणाही मनुष्यास ठाऊक नाही; परंतु त्याला, “देवाचे वचन.” म्हटले आहे.

ह्या स्वाराला काही संबोधले नाही, पाहा, परंतु तो पांढऱ्या घोड्यावर आहे.

290 त्या स्वाराकडे त्याच्या धनुष्यासाठी बाण नाहीत. तुम्ही ह्यावर लक्ष दिले काय? त्याच्याकडे धनुष्य आहे. परंतु तेथे त्याच्याकडे बाण असल्याचे काहीच सांगितले नाही. म्हणजेच तो एक फसविणारा असला पाहीजे, बरोबर आहे. कदाचित त्याच्याकडे खूप गर्जनांचे शब्द असतील, आणि प्रकाश नसेल. परंतु तुम्ही पाहता की, ख्रिस्ताकडे प्रकाश आणि गर्जनाचे शब्द दोन्ही आहे; कारण त्याच्या मुखातून दुधारी तरवार निघते, आणि तो त्या तरवारीने राष्ट्रांना प्रहार करतो. परंतु पाहा, हा स्वार कोणाला मारु शकत नाही, परंतु तो ढोंगी असून अभिनय करीत आहे. तो पांढऱ्या घोड्यावर स्वार होऊन पुढे जात आहे, तो बाहेर जय प्राप्त करण्यासाठी जात आहे.

291 ख्रिस्ताकडे धारदार तरवार आहे, आणि, लक्ष द्या, ती त्याच्या मुखातून येते, ते जीवंत वचन आहे, ते परमेश्वराचे वचन आहे, जे तो त्याच्या सेवकांना प्रगट करतो. जसे त्याने मोशेला म्हटले, “जा तेथे उभा राहा, आणि काठी पलिकडे उगारुन, गोमाशांना बोलाव,” आणि तेथे गोमाशा आल्या. निश्चितच. जे काही तो बोलला, त्याने ते केले; आणि तसे घडले, त्याचे जिवंत वचन. परमेश्वर आणि त्याचे वचन स्वयं एकच व्यक्ति आहे. परमेश्वर वचन आहे.

292 मग पहिल्या मंडळीच्या युगाचा हा रहस्यमय घोडेस्वार कोण आहे? तो कोण आहे? आपण त्याचा विचार करुया. हा रहस्यमय स्वार जो पहिल्या मंडळीच्या युगापासून सुरुवात करतो आणि सरळ घोड्यावरुन अनंतकालाकडे जाऊन शेवटाकडे जातो?

293 दूसरा शिक्का उघडतो आणि पुढे जातो आणि शेवट होतो. तिसरा शिक्का उघडतो आणि शेवटापर्यंत जाऊन संपतो. चौथा, पाचवा, सहावा, सातवा, आणि त्यांच्यातील प्रत्येक शिक्का अंतिम समयात उघडतो. आणि अंतिम समयात ही पुस्तके जी ह्या संपूर्ण समयात ह्या रहस्यांसह गुंडाळून ठेवलेली होती, ती फोडली जातात. त्यातून रहस्ये बाहेर प्रगट केली जातात, त्यात काय आहे हे पाहण्यासाठी. परंतु, वास्तवात, त्यांची सुरुवात पहिल्या मंडळीच्या युगात होते, कारण मंडळीला पहिल्या मंडळीच्या युगाला, असा संदेश मिळतो. [भाऊ ब्रॅन्हम मंच तीन वेळा ठोठावतात.—संपा.]

294 “पांढरा घोडेस्वार बाहेर निघून जातो.” समजले? तो कोण आहे? तो आपल्या विजयाच्या सामर्थ्यात शक्तिमान आहे. तो त्याच्या विजयाच्या सामर्थ्यात महान व्यक्ति आहे. तुमची इच्छा आहे की, मी तुम्हाला सांगवे की तो कोण आहे? तो ख्रिस्तविरोधक आहे. वास्तवात तोच तो आहे. आता, तुम्ही पाहा की, तो ख्रिस्तविरोधक आहे; येशूने म्हटले, की, “ते दोघे इतके जवळ असतील की, साधेल तर ते निवडलेल्या नाही. (वधूला) बहकविण्याचा प्रयत्न करतील.” ख्रिस्तविरोधी, हाच ख्रिस्तविरोधकाचा आत्मा आहे.

295 लक्ष द्या, मंडळीच्या युगाचा अभ्यास करते वेळी, जेव्हा आपण पहिल्या मंडळीचे युग उघडले, तेथे आपण पाहतो की, पवित्र आत्मा त्यांनी त्या युगात सुरुवात केलेल्या काही गोष्टींच्या विरुध्द होता, आणि त्यांना “निकलइतांची कृत्ये,” म्हणून म्हटली जातात. तुम्हाला ते लक्षात आहे काय? [मंडळी म्हणते, “आमेन.”—संपा.] *निको* म्हणजे, “विजय प्राप्त करणे,” *लैटी* म्हणजे “मंडळी” लेटी. *निकलाईत*, “मंडळीवर जय प्राप्त करणे.” “मंडळीतून पवित्र आत्मा काढा आणि ते सर्व एकाच पवित्रजनाला द्या. त्या

एकट्यालाच सर्वांवर प्रमुख होऊ द्या.” तुम्ही निकलाईतांच्या शिक्षणाचा अभ्यास केला आहे. लक्ष द्या. निकलाइत हे पहिल्या मंडळी युगात एक “सुवचन” होते. ते दुसऱ्या मंडळीच्या युगात ते “सिध्दांत,” झाले आणि तिसऱ्या मंडळीच्या युगात “बळजबरी,” होती, आणि ती नायसीया सभा झाली. आणि मग ते मंडळीत एक शिक्षण झाले. आणि पहिली कुठली गोष्ट घडली? त्यातून संघटना झाली! आता, हे बरोबर आहे काय? (“आमेन.”)

296 मला सांगा पहिली संघटीत मंडळी कुठून आली. रोमन कॅथलिक मंडळी! मला सांगा की, प्रकटीकरणाच्या पुस्तकातला 17वा अध्याय, हे सांगत नाही का की, “ती वेश्या आहे आणि तिच्या मुली वेश्या आहेत.” ती तीच गोष्ट आहे, जे तिच्याबरोबर संघटीत झाले आहेत. “वेश्या.” “घृणास्पद त्याच्या जारकर्माचा ओंगळपणा असे शिक्षण घेणारी.” “मनुष्याच्या आज्ञांचे शिक्षण देणारे.” लक्ष द्या.

297 पाहा, तो जय प्राप्त करण्यासाठी निघतो. लक्ष द्या, त्याच्याकडे मुकूट नाही. मी त्या पांढऱ्या घोडेस्वाराबद्दल बोलत आहे. समजले? “त्याला नंतर, एक धनुष्य आणि एक मुकूट देण्यात आला.” समजले? अगोदर त्याच्याकडे मुकूट नव्हता, परंतु एक मुकूट त्याला देण्यात आला. लक्ष द्या, नंतर त्याला एक मुकूट देण्यात आला, होय, जे तीन आहेत. तिन्ही मिळून एक. असे तीनशे वर्षानंतर, नायसिया परिषदेत झाले होते. जेव्हा त्याने सुरुवात केली, लोकांमध्ये संघटना बनण्यासाठी निकलाइताचा आत्म्याने आणि मग तो आत्मा पुढे जातो आणि एक “सुवचन,” बनते, नंतर ते “एक शिकवण,” बनते.

298 तुम्हाला लक्षात आहे, ख्रिस्त अगोदरच्या मंडळयांना बोलताना म्हणतो, “तू निकलाइतांच्या कृत्यांचा द्वेष करितोस, मीही त्यांच्या कृत्यांचा द्वेष करतो.” जय मिळवण्याचा प्रयत्न केला, फक्त एकाच पवित्रजनाने पवित्र आत्मा घ्यावा, ह्यासाठी की त्याला सर्व पापांची व सर्वांची क्षमा करता यावी.

299 आणि आपण हे तेथे वाचतो, पौल ह्याविषयी बोलला आहे. अंतिम दिवसात ह्या गोष्टी विराजमान होतील. आणि अंतिम दिवस येईपर्यंत त्याला प्रगट होणार नाहीत. “मग तो आता प्रतिबंध करीत आहे, तेथून परमेश्वराचा आत्मा काढून घेतला जाईल आणि मग तो त्यास प्रगट करील.”

300 आज तो पांढऱ्या घोड्याचा वेष बदलून त्या खाली लपला आहे. लक्ष द्या की, तो कसा पांढऱ्या घोड्यापासून, काही मिनिटातच बदलेल. तो फक्त एक पांढरा घोडाच बनत नाही, तो एक पशू बनतो, ज्याला खूप डोकी व शिंगे आहेत. पाहिले? समजले? आता हा पांढरा घोडा, फसवणारा आहे, आणि म्हणूनच ह्या सर्व समयात लोकांनी त्याला ओळखले नाही. त्यांनी त्याच्या विषयी विचार केला. परंतु आता, तो शास्त्रलेखाद्वारे प्रगट केला जाणार. लक्ष द्या.

301 पाहा, शेवटी जेव्हा निकलाईत, ख्रिस्त विरोधी, त्या मनुष्यात उतरेल, तेव्हा त्याला मुकूट दिला जाईल. जेव्हा त्याने सुरुवात केली, निकलाईतचा आत्मा मंडळीत आला. तो एक आत्मा आहे. तुम्ही आत्म्याला मुकूट घालू शकत नाही. परंतु तीनशे वर्षानंतर तो पोप बनला, आणि नंतर त्यांनी त्याला मुकूट घातला. लक्ष द्या. सुरुवातीला त्याच्याकडे मुकूट नव्हता. परंतु नंतर त्याला मुकूट मिळाला. जेव्हा तो आत्मा त्याच्यात उतरला. समजले? तो देहधारी झाला. निकलाईताचे शिक्षण एक मनुष्य बनला. मगच ते त्याला मुकूट घालू शकले. ते सुरुवातीला करु शकले नाही, कारण, तो केवळ एका शिकवणीच्या रुपात होता.

302 महिमा होवो! लक्ष द्या! आणि जेव्हा तो पवित्र आत्मा आपल्यामध्ये अवतरतो, तो एक जो आपल्यामध्ये पवित्र आत्म्याच्या रुपात आहे. येशू ख्रिस्ताच्या मनुष्यात अवतरित होतो, तेव्हा आपण त्याला राजांचा राजा म्हणून मुकूट घालू. ते बरोबर आहे. पाहा?

303 आता, लक्ष द्या, जेव्हा ख्रिस्त राजासनावर येतो, तेव्हा ख्रिस्तविरोधी, यहुदा ही राजासनावर येतो. ज्या समयी ख्रिस्त पृथ्वीवरुन निघून जातो, त्या समयी यहूदाही पृथ्वीवरुन निघून गेला. तसेच ज्या समयी पवित्र आत्मा परत येतो, त्याच समयी ख्रिस्त विरोधी आत्माही परत येतो.

304 तुम्हाला माहीत आहे, योहान येथे म्हणतो, “हे लहान मुलांनो, मी तुम्हाला ख्रिस्तविरोधकाविषयी, अनभिज्ञ ठेवणार नाही, जो आला आहे आणि आज्ञा मोडणाऱ्या लोकांत कार्य करीत आहे.” त्यानंतर ख्रिस्तविरोधी तेथे निकलाईताच्या आत्म्याच्या रुपात संघटना निर्माण करण्यासाठी होता.

305 ह्यात आश्चर्य नाही की, मी त्या गोष्टींचा द्वेष करतो! पाहीले? समजले? होय, असेच आहे. तो मी नव्हतो, येथे काहीतरी होते. तेथे ती गोष्ट आहे. ती बाहेर आली आहे. तुम्ही ती बघत आहात? [मंडळी म्हणते—“आमेन.”—संपा.] मी त्याच्या आजूबाजूस होतो. मी आतापर्यंत ते पाहू शकलो नाही. आणि आता ते मला माहीत आहे. ते तेथे आहे. त्या निकलाइताच्या आत्म्याचा, देव द्वेष करत आहे.

306 आणि आता तो आत्मा देहधारी झाला आहे, आणि त्यांनी त्याला मुकूट घातला आणि हे सत्य आहे, ज्याविषयी बायबल सांगते की, ते त्याबरोबर असेच करतील. ते परिपूर्ण आहे. बापरे! देहधारी होईल! तो मनुष्य बनला, आणि मग त्यांनी त्याला मुकूट घातला.

307 लक्षपुर्वक वाचा! किंवा, वाचा, जसे दानीएल म्हणतो की, तो मंडळीच्या राज्याला आपल्या हाती घेतो. तुम्हाला ते वाचायला आवडेल का? [मंडळी म्हणते—“आमेन.”—संपा.] आपल्याकडे वाचण्यासाठी वेळ आहे, आहे की नाही? (“आमेन.”) ठीक आहे. लक्षपूर्वक ऐका. थोड्या वेळासाठी दानिएलाच्या पुस्तकात पुन्हा पाहूया. दानीएलाचे पुस्तक काढूया, आणि आपण ते थोड्याच क्षणात वाचूया. आणि आपण कदाचित आणखी पंधरा, वीस मिनिटे किंवा तीस किंवा असेच काही ह्यापेक्षा अधिक वेळ घेणार नाही. ठीक आहे? (“आमेन.”)

308 आपण दानिएलचा 11वा अध्याय काढूया, आणि 21वे वचन घेऊया. येथे दानीएल आहे, येथे दानीएल सांगत आहे हा व्यक्ती कशाप्रकारे हे राज्य प्राप्त करील.

> *आणि मग त्याच्या जागी, त्यांनी राजपदाचा मान दिलेला असा एक हलका मनुष्य* (दानिएल, रोमविषयी बोलत आहे) *उदयास येईल, पण तो लोक निर्धास्त असता येईल व आर्जवी भाषणे करुन राज्य मिळवील.*

309 अगदी असेच त्याने केले आहे! हेच दानीएलाने सांगितले होते की, ख्रिस्तविरोधी करेल. तो लोकांच्या जागा नियुक्त करील. होय तो मंडळयासाठी त्या दिवसाच्या भोजनाची पुर्तता करील. कारण, ह्या मंडळीच्या युगात त्यांना वचन, ख्रिस्त नकोय. परंतु त्यांना मंडळी हवी आहे. पहिली गोष्ट, ते तुम्हाला असे विचारित नाही की, तुम्ही ख्रिस्ती आहात का? “तुम्ही कोणत्या मंडळीचे सदस्य आहात? कुठले चर्चचे?” त्यांना ख्रिस्त म्हणजे वचन नको आहे. तुम्ही जा, त्यांना वचनाविषयी आणि ख्रिस्तामध्ये कसे सरळ मार्गाने चालले पाहीजे ते सांगा, त्यांना ते नको. त्यांना असे काहीतरी पाहीजे, त्यांना जसे पाहीजे तसे ते जगतात, आणि मंडळीचे सदस्य बनू इच्छितात आणि साक्ष देऊ इच्छितात. पाहीले? समजले? म्हणून तो आवश्यकतेनुसार पूर्ती करतो. आणि, लक्षात

घ्या, बायबलमध्ये शेवटी त्याला, "स्त्री," म्हणण्यात आले, आणि ती वेश्या होती आणि तिला मूली होत्या. तो लोकांच्या रोजच्या गरजा त्यांच्या इच्छेप्रमाणे पूर्ण करतो. असेच ते आहे.

310 देवाने हे अभिवचन दिले आहे. जेव्हा वचन नाकारले जाते, तेव्हा त्यांना तो त्यांच्या इच्छेच्या स्वाधीन करतो. आपण थेस्सलनीकाकरांस पत्र पुन्हा वाचूया. माझी इच्छा आहे की, येथे तुम्ही लक्षपुर्वक पाहावे. ठीक आहे, आपण ते वाचूया. 2 थेस्सलनीकरांस पत्र 2:9−11. ते म्हणते की, "त्यांनी सत्याची आवड धरली नाही, त्यांना भ्रांतीच्या स्वाधीन केले जाईल, आणि त्यांनी असत्यावर विश्वास ठेवावा आणि त्याद्वारे न्याय व्हावा." आता तेच—तेच पवित्र आत्मा सांगत आहे.

311 आता, हीच आजच्या मंडळीची इच्छा नाही काय? [मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.] जेव्हा तुम्ही लोकांना सांगण्याचा प्रयत्न करतात की, त्यांनी *हे* करावे, *ते* किंवा आणखी *काही* करावे आणि ते−ते लगेच तुम्हाला सांगतील की, ते मेथडिस्ट प्रेसबेरेटियन, किंवा आणि कोणी आहेत, आणि "त्यांना तुमच्या नावेत फिरविण्याची काही गरज नाही." पाहीले? निश्चितच त्यांना हेच पाहिजे.

312 आणि परमेश्वर म्हणाला, "जर त्यांना ते पाहीजे, मी त्यांना ते घेऊ देईन आणि मी वास्तवात त्यांना विश्वास करण्यास भाग पाडीन की तेच सत्य आहे. कारण सत्यासंबंधी त्यांना भ्रांतीचा आत्मा देईन." आता पाहा येथे बायबल काय सांगते, "यान्नेस व यांब्रेस ह्यांनी जसे मोशेला अडविले, तसे हेही सत्याला अडवितात. हे लोक भ्रष्टबुद्धी बनलेले व विश्वासासंबंधाने पसंतीस न उतरलेले असे आहेत."

313 आता तुम्ही पाहा की हे, केवळ कॅथलिक नाही. पण प्रोटेस्टंट आहेत. ही पूर्ण गोष्ट आहे. हे सर्व संपूर्ण संघटीत जग आहे. तो पांढरा घोडेस्वार जो स्वतःला धार्मिक मंडळी म्हणून प्रदर्शित करतो, परंतु तो ख्रिस्तविरोधी आहे. त्याला सारखेच दिसणे आहे. जसा ख्रिस्त घोड्यावर येतो, तसेच तो ही घोड्यावर येतो. पाहीले? ओह, तो विरोधी आहे, ते इतके सारखे आहे की, निवडलेल्यांना पण फसविण्याचा प्रयत्न करेल! आणि येथे तो आहे. तो ख्रिस्तविरोधक आहे.

314 त्याने धावण्यास सुरुवात पहिल्या मंडळीच्या युगात केली. आता तो प्रत्येक मंडळी युगात धावत आला आहे. आता त्याचे निरिक्षण करा. तुम्ही म्हणाल, "तो पूर्वकाळात प्रेषितांच्या समयात होता?" तेव्हा त्याला, "निकलाइत" म्हणण्यात आले. नंतर, पुढच्या मंडळीच्या युगात तो एक "सिध्तान्त" झाला. अगोदर तो फक्त एक "सुवचन" होता, नंतर तो एक "सिध्दांत" झाला.

315 गर्विष्ठ, सुप्रसिध्द लोक, चांगला पोषाख केलेले, उच्च शिक्षीत, सभ्य ह्यांना मंडळीत ह्या सर्व गोष्टी नको. नाही, "त्यांना पवित्र आत्म्याची सर्व कार्य नको. त्यांना फक्त मंडळी पाहीजे! आणि आम्ही रोम येथे नायसिया परिषदेत आणि दुसऱ्या जागी जाऊ." जेव्हा ते तेथे आले, तेव्हा त्यांनी मंडळीला आपल्या ताब्यात घेतले, आणि मूर्तिपुजा आणली. रोमन कॅथलिक प्रणाली...किंवा मुर्तिपूजा, मूर्तिपूजक रोम, आणि काही अंधश्रद्धा आणल्या. आणि त्यांनी अष्टोरेत, जिला "स्वर्गाची राणी," म्हणतात आणि तिला मरीया अर्थात मातेच्या रुपात बदलले. मृत लोकांना तसेच दुसऱ्या लोकांना मध्यस्थ केले. आणि त्यांनी गोलाकार सफेद वेफर घेण्यास सुरुवात केली, आणि त्यास ख्रिस्ताचे शरीर म्हटले; "कारण ती स्वर्गाच्या आईला दर्शवते." आणि कॅथलिक धर्म पुढे गेला, आणि तो स्वतःलाच पार करीत गेला. कारण, तेथे जी ज्योती जळते, ती हे दर्शविते की, ते सफेद

गोलाकार, वेफर धर्मगुरुच्या सामर्थ्याने, परमेश्वरात बदलले जाते. जगात हे काहीच नाही, पण एक प्रकारची मूर्तीपुजा आहे. पाहीले? हे बरोबर आहे.

316 मला हे कळत नाही. ठीक आहे, होय, मला समजते, होय महाशय! मला ते देवाच्या अनुग्रहामुळे कळते. निश्चित्तच.

317 आता लक्ष द्या. ओह, माझ्या प्रभू. ते असे कसे करु शकतात! समजले? आणि त्यांना त्याच्या इच्छा दिलेल्या आहेत. नाही, हे सत्य आहे, तुम्हाला तसे करण्याची आवश्यकता नाही. नाही, महाशय. जर तुम्हाला ते करण्याची इच्छा नसेल, तर तुम्हावर कुठलीही ते करण्यासाठी जबरदस्ती नाही. जर तुम्ही देवाच्या मार्गाने जीवन जगू शकत नाही, अथवा गोष्टी आणि उपासना करु इच्छीत नाही, तर तुम्हाला तसे करण्याची आवश्यकता नाही. देव कोणालाही तसे करण्यास भाग पाडत नाही.

318 परंतु मला तुम्हाला काही सांगू द्या. जर तुमचे नाव त्या कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात जगाच्या स्थापनेअगोदर लिहीलेले आहे, तर तुम्हाला हे करण्यात खूप आनंद होईल, ते करण्यासाठी तुम्ही एक मिनिटही थांबू शकत नाही.

319 येथे पाहा. तुम्ही म्हणाल, "मी तुला समजावून सांगेन, मी अगदी धार्मिक आहे!" कदाचित, ते खरेही असेल.

320 पाहा, येशूच्या दिवसात, कोण सांगू शकतो की, याजक धार्मिक नव्हते? रानात, इस्त्राएल लोक धार्मिक नव्हते, असे कोण सांगू शकते? जेव्हा ते...

"बरे, देवाने मला कित्येक वेळा आशीर्वादित केले!"

321 होय, त्यानाही त्यांना आशीर्वादीत केले. त्यांना जगण्यासाठी काही काम करावे लागले नाही. त्याने त्यांना स्वर्गातून अन्न दिले. आणि येशू म्हणाला, "त्यांच्यातील, प्रत्येक जण नष्ट झाला आणि नाश पावला."

322 "आपल्या पूर्वजांनी," ते म्हणाले, "रानात चाळीस वर्षे मान्ना खाल्ला."

323 येशू म्हणाला, "आणि ते, प्रत्येक जण, मेले. सार्वकालिकतेतून वेगळे झाले." पाहीले? तो म्हणाला, "परंतु मी स्वर्गातून उतरलेली जीवनाची भाकर आहे. जो मनुष्य ही भाकर खातो, तो कधीच मरणार नाही." समजले? तो जीवनाचे झाड आहे.

324 आता लक्ष द्या येशू कसा आणि केव्हा आला. ते याजक, ते तेथे आले, खूप धार्मिक होते. मुला, कोणीही म्हणू शकत नव्हते की, ते चांगले मनुष्य नव्हते. माझ्या प्रभू! ते नियमाने चालणारे होते. सर्व गोष्टी जे मंडळी सांगते, त्यांनी त्या केल्या. जर त्यांनी केल्या नाही, तर त्यांना धोंडमार करण्यात येई आणि म्हणून तो चालत होता...तुम्हाला माहीत आहे, येशू त्यांना काय म्हणाला? योहान त्यांना काय म्हणाला, "तुम्ही सापाच्या पिल्लांनो! तुम्ही असा विचार करु नका, कारण तुम्ही संघटनेतील आहात, तुम्हाला देवाशी काही सख्य आहे." आणि येशू म्हणाला, "तुम्ही तुमचा बाप सैतान त्याचे आहात." म्हणाला, "प्रत्येक वेळी देवाने एक संदेष्टा पाठवला, त्याचे त्यांनी काय केले? तुम्ही त्याला दगडमार केला आणि कबरेत फेकले. आणि आता तुम्ही तेथे जाता आणि त्याची कबर सजवता."

325 ह्याच गोष्टी कॅथलिक मंडळीने केल्या की नाही? आर्क येथील जॉन, आणि संत पॅट्रीक, आणि त्यांच्यातील सर्वांकडे पाहा. ते तेच आहे–ज्यांनी त्यांना आत टाकले. आणि त्यांनी आर्क येथील जॉनचे शरीर उकरुन वर काढले, आणि कित्येक शेकडो वर्षानंतर नदीत टाकले. आणि जिला चेटकीणीसाठी जाळण्यात आले.

326 "तुम्ही आपला बाप सैतान यापासून झाला आहा, आणि त्याचे कार्य तुम्ही करता." हे सर्व जगभर जाईल. समजले? ते अगदी बरोबर आहे! हेच येशूने सांगितले.

327 आणि तुम्हाला वाटते, ते सर्व बरोबर आहे, दिसण्यात पांढरा घोडा, खूप चांगला आहे. परंतु तुम्ही त्याकडे पाहा, जे तुमच्याकडे आहे. बिलकुल तेच आहे– जो ह्यास चालवत आहे. आता, परंतु त्याने सांगितले की, त्यांना तेच पाहीजे, म्हणून तो त्यांना भ्रांतीचा आत्मा देईल.

328 लक्ष द्या, प्रकटीकरण 17 मधील ही वेश्या, ती एक रहस्य होती. “रहस्यमय, बाबेल, कलावंतीणीची आई.” आणि योहानाने तिची प्रशंसा केली. अगदी ह्या मनुष्यासारखा... पाहा, थांबा, आपण येथे पाहतो आणि येथे त्याचे, ह्या घोड्याचे निरिक्षण करतो. पाहीले? परंतु तुम्ही ते पाहता...जे घडले ते हे होते की, “त्याने फार आदराने तीची प्रशंसा केली.” परंतु रहस्य हे होते की, “तीने ख्रिस्तासाठी वध पावलेल्यांचे रक्त प्राशन केले.” एक सुंदर मंडळी, जांभळी आणि सोनेरी वस्त्रांनी शृंगारलेली तेथे बसली होती, “आणि तिच्या हातात तिच्या जारकर्माच्या मळाने भरलेला प्याला होता.”

329 जारकर्म काय आहे? अनीतीचे जगणे आहे. ही तिची शिकवण, जी ती देत होती. देवाचे वचन घेते आणि त्याचा परिणाम नष्ट करते, काही, “नमो कृपापूर्ण मरिये,” आणि अशा इतर सर्व प्रकारच्या गोष्टीमुळे नष्ट करणे, आणि बाहेर काढणे. “पृथ्वीवरील राजांनी तिच्याशी जारकर्म केले.”

“आता,” तुम्ही म्हणाल, “ती कॅथलिक मंडळी आहे.”

330 परंतु ती “कलावंतीणीची आई,” होती, पाहा, ठीक तीच ती होती. असेच आहे.

331 काय घडले? जेव्हा सुधारक मेला आणि त्याचा संदेश पण मृत झाला. तुम्ही...तुम्ही तो संघटीत केला, आणि त्या संस्थेत, “मनमानी लोकांचा” समुह तेथे ठेवला, आणि तुम्हाला आवडते, त्या मार्गाने राहण्यास सुरुवात केली. तुम्हाला वचनाबरोबर राहायची इच्छा नाही. त्यांनी वचनाबरोबर राहण्याऐवजी, तेथेच थांबले आणि त्यांनी सांगितले, “*हेच* ते आहे.” ओह! तुम्ही तसे करु नका.

तो तोच आहे, त्याला वर तेथे पाहा.

332 लक्ष द्या, ती एक गोष्ट आहे. आपण संपवायच्या आधी आणखी काही गोष्टींना पाहू इच्छीतो.

333 हा तो अधिपती आहे, ज्याने दानीएलाच्या लोकांचा नाश केला. तुम्ही ह्यावर विश्वास ठेवता का? आता मी त्याचा खुलासा करीत आहे. जर तुम्ही माझे सहाय्य केले आणि काही वेळासाठी नम्र बनुन राहाल, तर मी–मी ते जितके होईल तितक्या लवकर करेन. परंतु मी हे निश्चित करु इच्छितो की, मला ते पवित्र आत्म्याने दिले आहे, इतके निश्चिंत आहे, जितका मी येथे उभा आहे, पाहीले? समजले?

334 आता पाहा, आपण पुन्हा काही वेळासाठी, दानीएलाच्या पुस्तकात जाऊया. मी तुमच्यासाठी काही वाचू इच्छितो, काय...जर तुम्ही ते पुन्हा काढू इच्छित नाही, तर ठीक आहे. मी दानीएलाचे पुस्तक 9वा अध्याय वाचू इच्छितो, दानीएल 9 आणि मी दानीएलाचे पुस्तक 9वा अध्याय 26 आणि 27 वचन वाचू इच्छितो. आणि, लक्ष द्या, काय तोच दानीएलाच्या लोकांचा नाश करणारा आहे,

> *आणि आता तो काय करणार आहे. आणि बासष्ट सप्तके संपल्यावर अभिषिक्ताचा वध होईल...*

335 पाहा, ती बासष्ट सप्तके आहेत, ज्यात तो वधला जाईल, सत्तर सप्तकांपैकी.

> ...त्याला काही उरणार नाही आणि जो अधिपती (तो एक दर्जा आहे.) येईल (तो येईल) त्याचे लोक नगर व ...पवित्रस्थान उध्वस्त करितील,

त्याचा अंत पुराने होईल, युध्द अंतापर्यत चालेल सर्वकाही उजाड होण्याचे ठरले आहे.

336 मी तुम्हा लोकांना काहीतरी विचारु इच्छितो. जेव्हा येशूला त्याच्या साडेतीन वर्षाच्या सेवकाईनंतर वधले गेले, आणि मंदिराचा कोणी नाश केला? कोणी ते उध्वस्थ केले? रोम! नक्की. कॉन्स्टंटाईन किंवा...नाही, मी तुमची क्षमा मागतो. टायटस, रोमन अधिकारी, त्याने अधिपतीला उध्वस्थ केले. आता लक्ष द्या.

लक्ष द्या, ते लोक त्या भिंतीकडे येतात.

337 जेव्हा येशू जन्माला आला, तेव्हा एक लाल अजगर स्वर्गात, त्या स्त्रीला समोर तिच्या मुलाला जन्मतःच गिळण्यासाठी उभा राहीला. ते बरोबर आहे का? [मंडळी म्हणते, "आमेन."—संपा.] ते कोण होते, जे त्या मुलाला गिळण्याचा प्रयत्न करीत होते; जेव्हा ते मुल जन्माला आले? ("रोम.") रोम. पाहिले? तेथे एक लाल अजगर आहे. येथे तो अधिपती आहे. येथे तो पशू आहे. समजले? तेथे ते आहेत. त्यांच्यातले प्रत्येक जण सारखे आहेत. ते, "मूल गिळणारे आहेत." पाहिले? परमेश्वराने त्या मुलाला स्वर्गात नेले आणि त्याच्या राजासनावर बसला. तेथेच ख्रिस्त नियुक्त समयापर्यंत बसलेला आहे. पाहा? आता लक्ष द्या. तो काय करील.

338 ओह, आता मला वाटते की मी येथे कोणाशी बोलत होतो. ते कदाचित भाऊ रॉबर्सन होते, अथवा कोणी दुसरे ज्याच्याशी आज मी ह्या विषयावर, बोलत होतो. मी येथे ह्या विषयावर, नाही; परंतु ह्या ठीक ह्याच गोष्टी बोलत होतो. मला वाटते, जास्त काळ गेला नाही. मी येथे प्रचार करीत होतो की, आर्थिक बाबतीत संयुक्त राष्ट्रात काय घडले. पाहीले? ठीक आहे. आता आपण आपले ऋण कर देऊन भरत आहोत, ज्यांना आपल्याला आजपासून चाळीस वर्षापर्यंत फेडायचे आहे. आपण इतके मागे आहोत. काय तुम्ही कधी के-ए-आय-आर, किंवा लाईफलाईन वर वॉशिंग्टनहून होणारे प्रसारण ऐकले आहे? का, आपण पूर्णतः कोलमोडलो आहोत. ह्या विषयात हेच सर्व आहे.

339 काय प्रकरण आहे? सगळे सोने जमा केले आहे, आणि यहुद्यांकडे त्याचे दस्ताऐवज आहे. हे सर्व रोमला जाणार आहे. आता लक्ष द्या. आपल्याला माहीत आहे की, मोठ्या अपार्टमेंट स्टोअर्सचे मालक कोण आहे, परंतु रोमकडे जगातील संपत्तीचा सर्वाधिक भाग आहे. बाकीचा यहुद्यांकडे आहे. आता ह्याकडे लक्ष द्या. आता हे लक्षपूर्वक ऐका, पवित्र आत्म्याने हे मला कसे प्रगट केले आहे.

आणि तो पुष्कळ लोकांबरोबर एक सप्तकाचा पक्का करार करील (*आता पाहा*) अर्ध सप्तकापर्यंत तो यज्ञ व *अन्नबलि* बंद करील...उध्वस्त करणारा अमंगलाच्या पंखावर आरुढ होऊन येईल व ठरलेल्या समाप्तिपर्यंत उध्वस्त करणाऱ्यावर कोपाचा वर्षाव होईल.

340 लक्ष द्या! ओह, किती धुर्त मनुष्य हा आहे! येथे तो आहे. आता आपल्याला आपले चित्र मिळाले आहे आणि कळले आहे की, तो पांढरा घोडेस्वार आहे. आपल्याला माहीत आहे की, तो शिकवणीच्या रुपात पुढे जातो. आणि मग ते मूर्तिपूजक रोम काय आहे? पोपच्या रोममध्ये बदलले गेले आणि त्यास मुकूट घालण्यात आला.

341 आता लक्ष द्या. "अंतिम समयात." सुरुवातीचे दिवस नाही-जेव्हा येशू प्रचार करीत होता, परंतु, "अंतिम समयात," आठवड्याच्या शेवटच्या भागात, जेथे आपण आताच दानीएलाची सत्तर सप्तके घेतली होती. आणि ख्रिस्ताने साडेतीन वर्षांसाठी भविष्यवाणी केली आहे आणि ती साडेतीन वर्षे अजून बाकी आहेत. हे बरोबर आहे? [मंडळी म्हणते,

"आमेन."—संपा.] आणि हा अधिपती त्या समयी दानीएलाच्या लोकांसमवेत करार करील, जे यहूदी आहेत.

हे तेव्हा घडेल, जेव्हा वधू बाहेर निघून गेलेली असेल. ती ते पाहणार नाही.

342 लक्ष द्या, दानीएलाच्या शेवटच्या अर्धसप्तकात, लोक एक करार करतील. हा अधिपती एक करार रोमसमवेत करील, त्यांच्याबरोबर एक करार करील, ह्यात संशय नाही की, तो संपत्तीसाठी करील, कारण जगातील संपत्ती कॅथलिक व यहुद्याकडे असेल.

343 मी वॅटीकनमध्ये होतो. मी तिहेरी मुकूट पाहीला. माझी पोप बरोबर मुलाखत होणार होती; बेरॉन वॉन ब्लोमबर्ग ह्यांनी ती मला मिळवून दिली होती...ती बुधवारी दुपारी तीन वाजता ठेवली होती.

344 आणि ते मला त्याच्या महालात घेऊन गेले, त्यांनी माझ्या विजारीतून मनगटपट्टी बाहेर काढली, ते ठीक आहे. त्यांनी मला सांगितले, मी जेव्हा त्याच्यापासून दूर जात असता, मी माझी पाठ त्याच्याकडे न करावी. ते ही बरोबर आहे.

परंतु मी म्हणालो, "मला ह्या मनुष्यापुढे काय करावे लागेल?"

345 तो म्हणाला, "अच्छा, तू आत जा आणि एक गुडघा टेक आणि त्याच्या बोटाचे चुंबन घे."

346 मी म्हणालो, "नाही महाशय, मी तसे करु शकत नाही." मी म्हणालो, "मी–मी एखाद्या व्यक्तीला भाऊ म्हणेन जर तो भाऊ होऊ इच्छितो. मी त्याला आदरणीय म्हणेन, जर त्याची ती उपाधी लावावी अशी इच्छा असेल तर. परंतु, मनुष्याची भक्ति; ती सर्व येशू ख्रिस्ताचीच आहे." समजले? नाही–नाही, महाशय कुठल्याही मनुष्याच्या हाताला ह्याप्रकारे चुंबन घेऊ शकत नाही. कदापि, नाही. म्हणून, मी ते केले नाही.

347 परंतु मला वॅटीकन येथे फिरण्यास मिळाले. का तुम्ही तिला लाखो–करोडो डॉलरमध्ये विकत घेऊ शकत नाही आणि तुम्ही केवळ विचार करा. बायबल सांगते, "जगाचे सर्व धन तिच्याकडे आहे." ओह, तुम्ही जरा त्या भव्य स्थानांचा विचार करा, जी कित्येक लाखोपटीची आहेत...

348 रशियामध्ये साम्यवाद का उदयास आला? अनेक प्रचारकांचा साम्यवादावरील हा हल्ला ऐकून, माझ्या पोटात गडबड होते, आणि त्यांना ठाऊकही नाही की, ते कशाविषयी आरडाओरडा करीत आहे. हे बरोबर आहे. साम्यवाद हे काहीच नाही; परंतु परमेश्वराच्या हातातील एक हत्यार आहे, ह्यासाठी की पृथ्वीवर पवित्र जनांच्या रक्ताचा सूड घ्यावा. ते बरोबर आहे.

349 आणि वधू वर घेतल्यानंतर, रोम आणि यहुदी एक दुसऱ्याबरोबर एक करार करतील. बायबल म्हणते की, पवित्र जनांबरोबर ते करार करतील. आणि आता लक्ष द्या, ते असे करतील (का?) कारण हे राष्ट्र आर्थिकरित्या कोलमडणार आहे, तुम्हाला हे माहीत आहे. जर आपण चाळीस वर्षापर्यंत कर, देयके देत आहोत, तर आपण आता कोठे आहोत?

350 तेथे एकच गोष्ट होऊ शकते, ती म्हणजे आपली चलने घेऊन कर्जाची फेड करावी. आणि आपण असे करु शकत नाही. वॉल स्ट्रीट त्यांच्या मालकीचा आहे, आणि वॉल स्ट्रीट यहुद्यांच्या नियंत्रणाखाली आहे. ह्याचा उरलेला भाग वॅटीकनमध्ये आहे. आणि उरलेला भाग यहूद्याकडे वॉल स्ट्रीट येथे आहे, जेथून जगातील व्यापार केला जातो. आपण त्याला आपले म्हणू शकत नाही.

351 आणि तुम्ही असा विचार करता की, ते हे करु शकतात का...हे पिणारे आणि तंबाखू खाणारे सर्व लोक, जे, लाखो–लाखो डॉलर्स प्रत्येक वर्षी कराच्या रुपात भरत आहेत,

आणि आपला सगळा आयकर जुन्या अश्लील चित्रे आणि अशासारख्या गोष्टींवर खर्च करतात. आणि तेथे ॲरिझोनात जातात, आणि लाखो एकर जमिनी विकत घेतात, आणि तेथे पन्नास हजार डॉलर्सनी कित्येक मोठमोठ्या विहीरी, खोदतात आणि हे पैसे त्यांनी आयकराच्याद्वारे दिले आहे. आणि जर तुम्ही आयकर भरत नाही, तर ते तुम्हाला कैदेत टाकतील. परंतु त्यांनी त्याची लिखापढी केली आहे, आणि त्यांनी तेथे बुलडोजर पाठवले. आणि त्या विहीरी भरल्या, आणि ते काय करणार? त्यांनी पुढच्या सत्रामध्ये, मिळवलेल्या पैशातून गृहनिर्माण प्रकल्प सुरु केला. त्यांना गुंतवणूक करायची आहे. आणि त्याच उद्देशाने ते घर प्रकल्प बनवतात, आणि त्यांना लाखो डॉलर्सने विकतात. काय तुम्हाला वाटते, हे लोक चलन परिवर्तन करण्यासाठी तडजोड करतील?

352 जसे त्या व्यक्तिने येथे केले होते...त्याचे काय नाव आहे? कॅस्ट्रोने हे केले. त्याने आज पर्यंत काही हुशारीचे काम केले, ते म्हणजे त्याने त्या सर्व बॉन्ड नष्ट केले, त्याची भरपाई केली आणि ते नष्ट केले.

353 लक्ष द्या, परंतु आपण तसे करु शकत नाही. हे लोक तसे करु देणार नाही. पृथ्वीच्या धनवानांनी ते आपल्या अधिन ठेवले आहे.

354 आणि तेव्हा करण्यासाठी एकच गोष्ट आहे. कॅथलिक मंडळी त्याची भरपाई करु शकते. तीच केवळ अशी आहे, जिच्याकडे धन आहे. आणि ती ते करु शकते आणि ती ते करील. आणि हे करताना ती यहुदी लोकांबरोबर तडजोड करील. ह्यासाठी की त्यांच्याशी करार करावा. आणि जेव्हा ती यहुदी लोकांबरोबर करार करील...आता लक्ष द्या, हे मी ह्या शास्त्रलेखातून घेत आहे. आणि आता, जेव्हा ती हे करते, आणि हा करार करते, आपण दानिएल 8:23 व 25 पाहतो. “त्याच्या चतुराईने त्याचा धंदा सफल होईल,” आणि धंदा म्हणजे *निर्माण करणे*, “त्याच्या हातात असेल.” आणि तो हा करार यहुद्यांबरोबर करील.

355 आणि साडेतीन वर्षाच्या मध्यात तो हा करार तोडेल, जसे सर्व वस्तु त्याच्या अधिकारात येतील, आणि यहुद्यांनी एकत्र केलेले धन त्याला मिळेल. आणि जेव्हा तो हे करील...ओह, माझ्या प्रभू! ओह, माझ्या प्रभू!

356 ह्या मंडळीच्या युगाच्या शेवटपर्यंत त्याला ख्रिस्तविरोधी म्हणण्यात येते, कारण तो आणि त्याचे संतान ख्रिस्त आणि त्याच्या वचनविरुध्द आहेत. ह्या मनुष्याला ख्रिस्तविरोधक म्हणतात.

357 आता, तो धनावर आपला अधिकार करण्यासाठी जात आहे. आणि मला वाटते, तेव्हा तो असे करील. एक मिनिटासाठी थांबा, जेव्हा मी हे सांगत आहे. तेव्हा मी ह्यावर थोड्या वेळासाठी पुन्हा मागे जाऊ इच्छितो.

358 त्याला ख्रिस्तविरोधक म्हटले आणि अंतिम समयापर्यंत देवाच्या दृष्टीने त्याला ख्रिस्तविरोधक म्हटले जाईल. आता परंतु नंतर त्याला काहीतरी दुसरे म्हटले जाईल.

359 आणि जेव्हा सर्व पैसा त्याच्या अधिकाराखाली येईल, “तेव्हा तो यहुद्यांबरोबर झालेला करार तोडेल.” जसे दानिएल येथे सांगतो की तो हे करील, “सत्तर सप्तकांतल्या, शेवटच्या अर्धसप्तकाच्या मध्यात.” आणि मग, भाऊ, तो काय करील? त्याच्याकडे जगातील व्यापार आणि वाणिज्य असेल, तो जगाबरोबर एक समजोता करील, कारण तो जगातील सर्व संपत्ती आपल्या पूर्णपणे कब्जात घेईल. आणि त्या समयात, दोन संदेष्टे उभे राहतील आणि एक लक्ष चव्वेचाळीस हजारांना बोलावतील. तेव्हा काय होईल? तेव्हा प्रकटीकरण 13 प्रमाणे, पशूची छाप लोकांवर लावली जाईल, कारण जगातील सर्व व्यापार, उद्योग, आणि सर्व गोष्टीवर त्याचा अधिकार असेल. आणि मग काय

घडेल? तेव्हा, लोकांवर पशूची छाप लावली जाईल, तेव्हा, “पशूची छाप असल्याशिवाय कोणीही मनुष्य खरेदी किंवा विक्री, करु शकणार नाही.” [भाऊ ब्रॅन्हम मंच तीन वेळा ठोठावतात—संपा.]

360 परमेश्वराचा धन्यवाद होवो, तेव्हा परमेश्वराची मंडळी साडेतीन वर्षाच्या काळात महिमेमध्ये आनंद करीत असेल, तिला त्यातून जावे लागणार नाही.

361 आता लक्ष द्या, ह्या अंतिम समयात, मंडळी युगाच्या अंतिम समयात त्याला म्हटले आहे...त्याला आणि त्याच्या संतानांना ख्रिस्तविरोधक म्हटले आहे, कारण जे काही ख्रिस्ताच्या विरुध्द आहे, ते ख्रिस्तविरुध्द आहे. आणि जे काही वचनाविरुध्द आहे, ते ख्रिस्ताविरुध्द आहे, कारण ख्रिस्तच वचन आहे. आता तो ख्रिस्तविरोधक आहे.

362 मग, प्रकटीकरण 12:7−9 मध्ये, जेव्हा सैतानाला, दोषारोप करणारा, काढून टाकण्यात आले. तुम्हाला त्याची टिप्पणी करायची आहे काय, कारण मी तुम्हाला वाचून दाखवू इच्छितो. आपल्याकडे आता इतका वेळ नाही, वीस किंवा पंधरा किंवा दहा पर्यंत. परंतु प्रकटीकरण 12:7−9 मध्ये “सैतान,” “दियाबल”, जुनाट साप जो आता तेथे वर आहे. “आपल्या बंधूंना दोष देणारा.” ठीक आहे.

363 मंडळीला वर घेतले गेले आहे, आणि सैतानाला खाली टाकण्यात आले. जेव्हा वधू वर जाते, सैतान खाली टाकण्यात येतो, तेव्हा सैतान स्वतः ख्रिस्तविरोधकामध्ये देहधारी झाला आणि त्याला “पशू” म्हटले आहे. नंतर, प्रकटीकरण 13, तो त्याची खूण करतो, समजले?

364 “जेव्हा तो प्रतिबंध करीत आहे,” आता, पृथ्वीवर फक्त ख्रिस्तीच आपल्या शुध्दरुपात आहेत, कारण, “प्रतिबंध करणारा आहे.”

365 येथे थेस्सलनीकरांस पत्राचे स्मरण करा, “मी देव आहे, असे स्वतःचे प्रदर्शन करीत देवाच्या मंदिरात बसला आहे, पृथ्वीवर पापांची क्षमा करीत आहे.” आणि तो तसे करीत राहील, “आणि अन्याय विपुल होईल,” आणि चालू राहील. कारण तो पर्यंत प्रगट होणार नाही, जोपर्यंत त्याचा प्रगट होण्याचा समय येत नाही.

366 आणि तेव्हा मंडळी वर घेतली जाईल. आणि जेव्हा ती वर घेतली जाईल, तेव्हा तो स्वतःस ख्रिस्तविरोधीहून “मंडळीत, मोठ्या मंडळीत परिवर्तीत करील आणि आता,” तो “पशू” बनेल. ओह! माझी इच्छा आहे की, मी लोकांना ते दाखवावे.

367 आता लक्षात ठेवा, ख्रिस्तविरोधी आणि पशू एकच स्वतःचा आत्मा आहे. तेथे त्रैक्य आहे. होय, महाशय, ह्या एकाच सैतानी शक्तिच्या तीन अवस्था आहेत. लक्ष द्या, पाहा, निकलाइताला मुकूट घालण्याआधी तो देहधारी झाला पाहीजे. समजले? आता ह्या तीन अवस्थेकडे, लक्ष द्या. पहिल्या अवस्थेत, त्याला ख्रिस्तविरोधक म्हटले आहे; दुसऱ्या अवस्थेत, त्याला खोटा संदेष्टा म्हटले आहे; तिसऱ्या अवस्थेत, त्याला पशू म्हटले आहे.

368 लक्ष द्या, निकलाईत, ख्रिस्तविरोधी शिक्षणाची सुरुवात पौलाच्या दिवसात, देवाच्या वचनाविरुध्द झाली होती, ती ख्रिस्तविरोधी होती.

369 तेव्हा त्याला, पुन्हा खोटा संदेष्टा असे म्हणण्यात आले. जेव्हा त्या शिकवणीनी मनुष्यरुप धारण केले, तेव्हा तो धर्माधिकाऱ्याच्या श्रेणीत कॅथलिक मंडळीच्या धर्माधिकाऱ्याच्या श्रेणीत एक संदेष्टा होता. पोप हा खोट्या वचनाचा संदेष्टा आहे, आणि त्यामुळेच तो एक खोटा संदेष्टा बनला.

370 तिसरी अवस्था एका पशूची आहे, एक मनुष्य ज्याला अंतिम दिवसात सर्व अधिकाराचा मुकूट घालण्यात आला, जे मुर्तिपूजक रोमकडे होते. कारण, सात डोकी

असलेला पशू, लाल अजगर, स्वर्गातून खाली टाकण्यात आला, आणि तो खोट्या संदेष्ट्यामध्ये देहधारी झाला. हाच तो आहे, ज्याच्याकडे सात मुकूट होते, आणि ज्यास खाली पृथ्वी आणि समुद्रात फेकून दिले होते. ठीक आहे.

371 आपण काय सांगत आहोत? हा स्वार, हा घोडेस्वार कोण आहे? तुम्हाला माहीत आहे, हा कोण आहे? तो सैतानाचा सामर्थी पुरुष आहे.

372 मी त्या दुसऱ्या रात्री, मी दोन भावांबरोबर गेलो होतो, जे आता मंडळीत बसलेले आहेत, मला वाटते ते भाऊ नॉरमन आणि भाऊ फ्रेड, जे तेथे मागे आहेत. आम्ही तेथे एका व्यक्तिचे ख्रिस्तविरोधी ह्या विषयावरील शिक्षण ऐकण्यास गेलो होतो. एक सुप्रसिध्द व्यक्ति, तो असेंबली ऑफ गॉड चा सर्वश्रेष्ठ लोकांतील एक आहे, आणि त्याचे ख्रिस्तविरोधीचे भाषांतर हे होते, की, “ते मनुष्यामधुन एक प्रकारचे जीवनसत्त्व काढणार, मनुष्यामधून आणि मनुष्यामधून काढलेल्या जीवनास एका मोठ्या मूर्तीत स्थानांतरीत करणार. जी तेथे स्थापित करणार आहे...त्याचे एक पाऊल एका शहराच्या ठोकळया इतके आहे. आणि ते...” काय तुम्ही कल्पना करु शकता पवित्र आत्म्याने भरलेला कोणी व्यक्ति अशा प्रकारचा भ्रांतीखाली, किंवा असा दावा करील का?

373 जेव्हा, येथे बायबल सांगते, की ख्रिस्तविरोधक कोण आहे. तो नाही...तो मनुष्य आहे. लक्ष द्या, तो घोडेस्वार आणखी कोणी नाही परंतु सैतानाचा शक्तिमान व्यक्ति आहे, एक देहधारी शैतान. तो एक शिक्षित विद्वान आहे. आता, मी आशा करतो की, तुम्ही तुमचे कान उघडले आहेत. खुप काळ झाला नाही, जेव्हा ते त्यांच्या मुलांतील एकाला टेलिव्हीजनवर दाखवण्याचा प्रयत्न करीत होते की, तो राष्ट्रपती पदासाठी, त्या पुढच्या व्यक्तिपेक्षा अधिक हुशार आहे. समजले? परंतु, त्याच्याकडे खूप ज्ञान आहे; जसे सैतानाकडे आहे. तो ते विकण्याचा प्रयत्न करतो. त्याने ते हव्वेला विकले. त्याने ते आपल्याला विकले. आपण शक्तिमान मनुष्याची इच्छा करीत होतो. आपल्याला तो मिळाला. ठीक आहे. संपूर्ण जग एका शक्तिमान मनुष्याची इच्छा धरीत आहे. त्यांना ते मिळणार आहे. बस तुम्ही परमेश्वराची मंडळी वर जाईपर्यंत आणि सैतान खाली टाकला जाईपर्यंत वाट बघा. तेव्हा तो देहधारी होईल, ते बरोबर आहे. त्यांना असा व्यक्ती पाहीजे, जे हे कार्य वास्तवात करु शकेल. तो हे करील.

374 शिक्षित! तो...सैतानाचा शक्तिमान मनुष्य आहे, जो शिक्षित, ज्ञानी, आपल्या शब्दाने चर्च देव विषयक ज्ञान, त्याने स्वतः बनवले आहे. आणि तो त्याच्या पांढऱ्या संप्रदायाच्या घोड्यावर स्वार होऊन, लोकांना फसवण्यासाठी धावत आहे आणि तो जगातील धर्मावर विजय मिळवील; कारण ते सर्व मंडळांचे संघराज्य तसेच, मंडळाच्या संघराज्याशी सम्मेलित होणार आहेत. आणि त्यांनी अगोदरच त्यांच्या इमारती बांधल्या आहेत, आणि सर्व गोष्टी क्रमवार व्यवस्थित लावलेल्या आहेत. तेथे एकही गोष्ट नाही, जी वगळली गेली आहे. प्रत्येक संप्रदाय ह्या मंडळीच्या संघराज्याशी जोडलेला आहे. आणि त्यांना कोणाचा पाठींबा आहे? रोम. आणि पोप आता ओरडत आहे, “आपण सगळे एक आहोत. आपण एकत्र येऊया आणि एकत्र चालूया.”

375 आणि हे लोक, काही फूल गॉस्पल लोकं, त्याच्या सुवार्तिक शिकवणीचा नकार करतात किंवा त्यांना नकार करावा लागतो, अशा प्रकारे पाऊल उचलण्यासाठी. तुम्ही काय केले आहे? तुम्ही संप्रदायातल्या गोष्टींसाठी, इतके आंधळे झालात की, तुम्ही सत्य नाकारले आहे आणि त्यांच्यापुढे सत्य ठेवले आहे, आणि ते–ते त्यापासून दूर गेले, आणि ते सोडले. आणि आता त्यांना “मोठ्या भ्रांतीत आणले आहे, ह्यासाठी त्यांनी असत्यावर विश्वास ठेवावा आणि त्यांना शासन व्हावे.” हे ते बिलकुल असेच आहे.

376 आणि ख्रिस्तविरोधक हे सर्व करतो. बायबल सांगते की, "तो त्या सर्वांना फसवील," तो दिआबल, "पृथ्वीवर राहणाऱ्या ज्या कोणाची नावे, जगाच्या स्थापनेपसून त्या शिक्क्याखाली लिहीलेली नाहीत." [भाऊ ब्रॅन्हम एकदा टाळी वाजवतात.—संपा.] आता जर बायबल म्हणते, त्याने तसे केले, तर त्याने ते केले आहे.

377 ते म्हणतात, "ठीक आहे. मी तिथला आहे..." तुम्ही तसेच आहात. होय, ते अगदी तसेच आहे...ती तीच वेश्यांची संस्था आहे. ती तीच प्रणाली आहे जीची सुरुवात उत्पत्तीत झाली, जी सुरुवातीपासून, शेवटपर्यंत ख्रिस्तविरोधी आहे.

378 मी ह्यांतूनच ऐकेन, परंतु हेच...सत्य आहे. माझी आशा त्यावरच आहे. आमेन.

379 आता, लक्ष द्या, तो विजय प्राप्त करील. आणि आता जवळ जवळ त्याच्या हातात आहे. तो पशू बनण्याआधी, आता ख्रिस्तविरोधक आहे. तुम्ही क्रुर शिक्षेविषयी बोलता? तुम्ही जरा थांबा. [भाऊ ब्रॅन्हम मंचावर चार वेळा वाजवतात—संपा.] बघा की जे पृथ्वीवर राहतील. त्यांना कशातून जावे लागेल. ओह, "तेथे रडणे आणि दात खाणे होईल. मोठ्या अग्नीवर्ण अजगराने, रोम त्याच्या तोंडातून नदीसारखा पाण्याचा प्रवाह सोडला. स्त्रीच्या संतानापैकी बाकीचे जे लोक होते, त्यांच्याबरोबर लढाई करण्यास तो गेला. जे वधूच्या निवडीनंतर व घेतल्यानंतर पृथ्वीवर राहीले होते. आणि त्या अजगराने त्या बाकीच्या लोकांशी युध्द केले, ज्यांना आत जाण्याची इच्छा नव्हती आणि ते मारले गेले."

380 आणि जर शक्य असते तर, खऱ्या मंडळीलाही ह्यातून जावे लागेल, परंतु तुम्ही पाहता, ख्रिस्ताच्या अनुग्रहाद्वारे ते त्याच्या रक्ताखाली आहेत, आणि ते कुठल्याही महासंकटातून जाणार नाही. त्यांच्यासाठी महासंकटाचा काळ नाही. मंडळीसाठी पुढची गोष्ट म्हणजे, स्वर्गरोहण आहे. आमेन आणि आमेन! परमेश्वराची स्तुती असो. ओह, मला हे किती आवडते!

381 मला तुम्हाला सांगू द्या. आम्ही सांगत आहोत की, तो विजेता काय करणार आहे आणि तो नक्कीच विजय मिळवणार आहे. त्याने तो अगोदरच मिळवला आहे. तो ते पैशाच्या घाणेरड्या धनलोभाद्वारे असे करुन चुकला आहे, आणि तो पुन्हा असे करणार आहे. ते अगदी बरोबर आहे. ते परमेश्वरापेक्षा पैशावर अधिक प्रेम करतात. ते आता ज्या सर्वांविषयी विचार करतात, तो म्हणजे "त्याच्याकडे किती पैसा आहे?" तो काय आहे?

382 तुम्हाला माहीत आहे. ते खूप वेळा सांगण्यात आले आहे. "मंडळीला पैसे द्या, आणि ती जगामध्ये क्रांती आणील. मंडळीला पैसे द्या, आणि ती संपूर्ण जगभर सुवार्तिक पाठवील. आणि ती काय करील? ती ख्रिस्तासाठी जगाला जिंकेल."

383 मला तुम्हाला काही सांगू द्या. दीन, आंधळ्या मित्रा. हे जग पैशाद्वारे जिंकले जात नाही, परंतु येशूख्रिस्ताच्या रक्ताद्वारे जिंकले जाते. देवाला असे व्यक्ति द्या, जे साहसी व्यक्ती आहेत. जगो किंवा मरो, ते तेथे त्याच्या वचनावर उभे राहतील. तेच जगावर विजय मिळवतील. ओह, केवळ तेच जगावर जग मिळवीत, ज्यांची नावे जगाच्या स्थापनेआधी कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात लिहीलेली आहेत. केवळ तेच वचन ऐकतील. पैशाशी त्याचा काही संबंध नाही, तो तर त्यांना अधिक त्यांच्या संप्रदायाच्या रितीरीवाजात नेतो.

384 आपण पाहूया. होय, तो शिक्षण प्राप्त केलेला विद्वान असेल, तो हुशार असेल, आणि त्याच्या सभोवतालची सर्व त्याची मुले हुशार, पी. एच. डी., एल. एल. डी., डबल एल. एल. डी., क्यू. एस. डी.; ए. बी. सी. डी. ई. एफ. झेड पर्यंत असतील. ते सर्व बुध्दीमान असतील का? ते सैतानाच्या रुपरेषेप्रमाणे चालतात. कुठलीही चतुर धुर्त योजना जी बायबलच्या विरुध्द आहे, ती सैतानाची आहे.

385 ते हेच आहे, ज्याद्वारे त्याने हव्वेला बहकविले. हव्वा म्हणाली, “ओह, असे लिहीलेले आहे, परमेश्वराने आम्हाला सांगितले आहे की, ते करु नका.”

386 तो म्हणाला, “परंतु, थांब. खात्रीने परमेश्वर तसे करणार नाही. परंतु मी तुझे डोळे उघडीन आणि तुला काही ज्ञान देईन.” हव्वेला ते मिळाले.

387 आम्ही पण त्याची अपेक्षा करीत होतो, आम्हाला ते मिळालेही. लक्ष द्या. तो ह्या पूर्ण धार्मिक जगावर विजय मिळवील. तो विजय मिळवील, दानिलाच्या लोकांबरोबर करार करील. हा करार दोघांशी परराष्ट्रीय आणि दानीएलाचे लोक, यहुद्यांसाठी ठरविलेल्या शेवटच्या सप्तकांत करील आणि आपण हे पाहीले आहे आणि फळयावर त्याचे चित्रही काढले आहे. आणि तूही, हे पूर्णतः पाहीले आहे की, ते कुठे आहे. देवाचा धन्यवाद असो. तेथे तो आहे. ही संघटनेची प्रणाली सैतानाची आहे. आणि तो त्याच्यावर कुठलाही प्रहार करीत नाही. पाहीले? बरोबर आहे. ते सैतानाचे मूळ आहे…

388 आता, ते लोक नाहीत, तेथील लोकं तसे नाहीत. त्यांच्यातले अनेक, देवाचे लोक आहे. परंतु, तुम्हाला माहीत आहे, आपण जेव्हा येथे पुन्हा येऊ, आपण तुतारीच्या फुंकण्यावर पाहूया, मी पुढच्या वेळी येईन, त्या तुतारीचे फूंकणे ह्या विषयावर पाहूया. लक्षात ठेवा, जेव्हा अंतिम दूत आला…जेव्हा तिसरा दूत आला, “माझ्या लोकांनो तिच्यामधून निघा!” जेव्हा तो दूत उडेल, त्याच वेळी येथे संदेश येतो. तो शेवटच्या तुतारीसाठी, अंतिम दूताचा संदेश, शेवटचा शिक्का उघडला जातो. हे सर्व त्याचवेळी घडते. होय, महाशय. सर्व बाजूला न झुकता आणि अनंतकालात जातील.

389 आता काय होते? त्याचवेळी तो व्यक्ती जय प्राप्त करीत आहे…आता मी समाप्त करीन. परमेश्वरही तेव्हा काही करणार आहे. आपण सर्व महीमा सैतानाला देऊ नये, समजले, आपण सर्व मिळून त्याच्याविषयी बोलू नये, समजले? जेव्हा ही महान गोष्ट तेथे घडत आहे, ही महान प्रणाली ह्या संघटनांना ऐक्यात बांधत आहे, ह्यासाठी की ते सर्वांना एकत्र करु शकतील आणि साम्यवादाविरुध्द उभे राहू शकतील, आणि परंतु त्यांना माहीत नाही की, देवाने साम्यवादाला त्यांच्यावर विजय मिळविण्यासाठी उभे केले आहे. निश्चितच हे असे आहे.

390 काय–काय–काय कारण आहे ज्यामुळे रशियात साम्यवाद उदयास आला? कारण रोमी मंडळीची अशुध्दता आणि इतर गोष्टींमुळे. त्यांनी तेथे रशियातील सर्व पैसा घेतला, आणि लोकांना भूकेने मारले, आणि त्यांना काहीच दिले नाही, आणि त्याऐवजी, आणि इतर जगासारखे जगण्यास सोडले.

391 फार काळ गेला नाही, मी मेक्सिकोत गेलो होतो, आणि त्या गरीब लहान लेकरांना पाहीले. कुठलाही कॅथलिक देश आत्म निर्भर नाही. तेथे एकही देश आत्म निर्भर नाही. मला विचारा कोठे आहे. मला दाखवा ते कुठे आहेत. कुठलाही देश जो कॅथलिक मंडळीच्या नियंत्रणाखाली आहे, तो स्वतःलाही मदत करु शकत नाही. फ्रान्स, इटली आणि ते सर्व, मेक्सिको, कुठेही तुम्ही जा, ते स्वतःला आधार देणारे नाहीत का? मंडळीने त्यांच्याकडे जे काही होते. ते सर्व घेतले. हेच कारण आहे की, रशियाने तिला बाहेर काढले, लक्ष द्या. मग काय घडले.

392 हे मला स्वतःला, माहीत आहे. मी तेथे उभा होतो. आणि तुम्हाला वाटले होते की, सुवर्ण जयंती चालली होती, तुम्ही घंटा वाजताना ऐकली. आणि येथे एक लहानशी, गरीब महिला रस्त्यावरुन तिचे पाय खेचत आली. आणि वडिलांनी एका बालकाला वेंगेत घेतले होते; आणि त्यांच्यातील दोन किंवा तीन जण, रडत होती. ती महिला कोणी दुसरी स्त्री,

जी वर मेली होती, तिच्यासाठी विलाप करीत होती. आणि ती स्त्री...विचार करीत होती की, असे करण्याद्वारे, ती स्वर्गात जाईल. ओह! किती दयनीय गोष्ट आहे!

393 तेव्हा जेव्हा मी खाली तेथे उभा होतो, मी एकाला येताना पाहीले...त्यांची आर्थिक अवस्था इतकी असमाधानकारकरित्या संतुलित आहे! चर्चने त्यांच्याकडे जे काही होते, ते घेतले. येथे एक बिचारा पॅनको आहे, कदाचित–कदाचित पॅनकोचा अर्थ प्रामाणिक असू शकतो. तो खाली येतो, आणि तो वीटा बनविणारा गवंडी आहे, आणि एका आठवड्यात तो वीस पेसोस कमावतो. परंतु त्याला एका बूटांची जोडी विकत घेण्यासाठी, पूर्ण वीस पेसोस लागतात. ही त्यांची अर्थव्यवस्था आहे. परंतु आता, येथे पाहा, तेव्हा काय होईल जर–जर तो एक वीटकाम करणारा गवंडी आणि एका आठवड्याला वीस पेसोस कमावतो. मला माहीत नाही, तो काय बनवतो परंतु अशाच प्रकारची त्यांची अर्थव्यवस्था संतुलित होते. आता, तुम्ही लक्ष द्या, जर तो एका आठवड्यात वीस पेसोस कमावतो.

394 आता येथे एक चिको येतो. ज्याचा अर्थ आहे, “लहानसा,” आणि तो तेथे आठवड्यात जवळजवळ पाच पैसोसचे काम करतो. आणि त्याला दहा मुले आहेत. ज्यांचे त्याला पोषण करावे लागते, परंतु तेथे कोणीतरी त्याच्या दरवाजावर ठोठावत असेल. [भाऊ ब्रॅन्हम मंचावर खूप वेळा ठोठावतात.—संपा.] त्याने कशाहीप्रकारे, ते पाच पेसोस किंवा त्यातील चार पेसोस घ्यावे, ह्यासाठी की तो व्यक्ति आपल्या पापांसाठी लाखो डॉलरच्या सोन्याच्या वेदीवर ग्रीसच्या काही मेणबत्या जाळण्यासाठी जमवित आहे. तुम्हाला समजले काय. ते त्यांचे अर्थव्यवस्थेचे संतुलन आहे. ठीक अशाचप्रकारे हे देश आहेत.

395 ते त्यांच्या सर्व गोष्टी लुबाडतात. ती मंडळी ते सर्व घेते. ते सर्व पूर्णतः तिच्या हातात आहे. हेच सर्व आहे. ज्याप्रमाणे पवित्रशास्त्र सांगते की, ती यहुद्यांबरोबर त्यांच्या धनाकरिता एक करार करील, आणि ते त्यांचे सर्वकाही लुबाडून घेतील.

396 आणि तेव्हाच तो पशू बनतो, तो त्याचा करार मोडतो, आणि तो जबरी करुन आनंद मिळवितो. तो अशाप्रकारे त्या स्त्रीच्या बाकीच्या संतानास सतावतो. आणि त्याच्या तोंडातून पाण्याचा प्रवाह सोडतो; लढाई करतो. आणि ते रडणे, आणि विलाप, आणि दातखाणे होईल.

397 आणि त्याचवेळी, गौरवात वधूचा विवाह होत असेल. मित्रा, ते गमावू नका. परमेश्वर माझे सहाय्य कर! तेथे मी–मी असावे अशी माझी इच्छा आहे. मी त्याची पर्वा करीत नाही की, त्यासाठी मला काय किंमत मोजावी लागेल. मी–मी बस तेथे जाऊ इच्छितो.

398 आता, लक्ष द्या, जेव्हा हे पृथ्वीवर होत असेल किंवा हे पृथ्वीवर होण्याअगोदर परमेश्वराने अभिवचन दिले आहे की, जेव्हा संप्रदायाचे विकल्प, आपआपल्या पंथाविषयी मतभेदावर वादविवाद करीत असतील, तेव्हा परमेश्वर आपल्यासाठी सत्य वचन असलेला एक खरा संदेष्टा, एक संदेश घेऊन पाठवील. ह्यासाठी की, परमेश्वराचे मूळ वचन पूर्नस्थापित करावे आणि “वडिलांचा विश्वास,” आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्यास लोकांमध्ये आणील. त्या सामर्थ्याने तो मंडळीला त्याच समयी ह्या गोष्टींच्यावर उचलेल आणि तिला वर नेईल. होय. येशू ख्रिस्ताचे तेच वचन प्रगट होत आहे की, तो काल, आज आणि युगानुयुग सारखा आहे! “मी सदैव तुमच्याबरोबर आहे, जगाच्या अंतापर्यंत आहे. आणि जी कामे मी करतो, ती तुम्हीही कराल. मी तुम्हाबरोबर असेन. आता थोडाच वेळ आहे, आणि मग जग मला पाहणार नाही,” कारण ते सर्व संघटीत होतील आणि विखरतील. “परंतु तुम्ही मला पाहाल, कारण मी तुम्हाबरोबर असेन. मी तुम्हामध्ये

जगाच्या अंतापर्यंत असेन.” जेव्हा, तो म्हणाला, सर्व समाप्त झाल्यावर त्याचा क्रोध सर्वांवर ओतला जाईल. हे असेच आहे. ओह देवा!

399 हा पांढरा घोडेस्वार कोण आहे? तुम्ही आंधळे नाहीत. तुम्ही पाहा की, तो कोण आहे. हा तो ख्रिस्तविरोधी आहे, आणि तो फसविणारा आत्मा जो आता गेलेला आहे आणि आत घुसला आहे...आणि, तेव्हा, पाहा, परमेश्वर त्याची केवळ पुनरावृत्ती करीत आहे. तो त्यास अशा मनुष्यासारखा दाखवतो जो एका पांढऱ्या घोड्यावर जात आहे, आणि त्याच्याकडे धनुष्य आहे आणि बाण नाही. तो फसवणारा आहे. त्याच्याकडे सामर्थ्य नाही. ते म्हणतात, “मंडळीचे सामर्थ्य!” आता ते कुठे आहे? ते काय करीत आहेत? ते म्हणतात, “आम्हीच मूळ मंडळी आहोत.” मूळ मंडळीने भूतांना काढले, आजाऱ्यांना बरे केले, आणि मृतांना जीवंत केले, दृष्टांत बघितले, आणि इतर सर्वगोष्टी. परंतु आता हे कुठे आहे? समजले? तो एक फसविणारा आहे, ज्याच्याकडे धनुष्य आहे, बाण नाही. होय! ते बरोबर आहे.

400 परंतु, तुम्ही पाहा, जेव्हा येशू येतो, त्याच्या मुखातून तीक्ष्ण धारेची तरवार निघते. ती पुढे जाते आणि त्याच्या शत्रूंचा नाश करते, आणि सैतानाला बाहेर टाकते. ती सर्वांना मारुन टाकते. आणि जेव्हा तो येतो, रक्तात बुचकळलेले वस्त्र त्याने अंगावर घेतले होते, आणि त्याच्या मांडीवर लिहीलेले होते “देवाचा शब्द.” आमेन. येथे तो, त्याच्या सैन्यासह, स्वर्गातून येतो.

401 हा पांढरा घोडेस्वार सर्व समयी भूमीवरच असतो. तो ख्रिस्तविरोध्यापासून बदलेल. त्याने हे केले, आणि तो एक खोटा संदेष्टा बनतो. पाहा, त्याने प्रथम सुरुवात कली, एक ख्रिस्तविरोधी एक आत्मा; नंतर तो खोटा संदेष्टा बनतो, जेव्हा, सैतानाला फेकले जाते, तेव्हा तो सैतानात देहधारी होतो. तीन अवस्था! प्रथम तो सैतान आहे, सुरुवातीला तो सैतानाचा आत्मा आहे; नंतर तो एक खोटा संदेष्टा, खोट्या शिकवणीचा शिक्षक बनतो; नंतर तो स्वतः सैतानात, देहधारी होतो. समजले? तेथे तो आहे.

402 आणि त्याचवेळी हा सैतान स्वर्गातून खाली पडतो आणि ह्या मनुष्यात देहधारी होतो, पवित्र आत्मा वर जातो आणि खाली येऊन मनुष्याच्या रुपात येतो. आमेन. ओह, माझ्या प्रभू! तो काय समय आहे!

जर परमेश्वराची इच्छा असेल, तर उद्या रात्री आपण दुसरा शिक्का पाहूया.

403 तुम्ही त्याच्यावर प्रेम करता? [मंडळी म्हणते–“आमेन.” भाऊ ब्रॅन्हम थांबतात—संपा.] आता काय तुम्ही ह्याचा विश्वास करता? [“आमेन.”]

404 मी आता टेप बंद केली आहे. आता मी त्यातून ऐकणार आहे. तुम्हाला ते माहीत आहे, समजले. परंतु मी अपेक्षा करतो.

405 भाऊ, मला तुम्हाला काही सांगू द्या. मला आताच माझ्या जीवनात पहिल्यांदाच कळले आहे की, का पवित्र आत्म्याने सदैव मला ह्या संस्थेच्या विरुध्द सावध केले आहे. मी परमेश्वराच्या ह्या गोष्टी मला दाखविल्याबद्दल आभारी आहे. मला माहीत आहे की हे सत्य आहे. येथेच ते प्रगट झाले आहे. येथे तो घोडेस्वार ह्या काळांतून येत आहे. आणि येथे तो येऊन तो स्वतःस जितके होईल तितके परिपूर्ण असे प्रगट करतो. पाहीले, तो तोच आहे. आता आपली त्याविषयी फसवणूक होणार नाही. आता तुमचे डोळे उघडले आहे. अशा प्रकारच्या मुर्खतेपासून दूर राहा. आणि परमेश्वरावर तुमच्या पूर्ण हृदयाने प्रेम करा आणि त्याच्याबरोबर राहा. होय, महाशय त्या बाबेलातून बाहेर या!

406 [टेपवर रिकामी जागा—संपा.] तीन गोष्टी; वचनाद्वारे सिध्द झाल्या आहेत, चित्राद्वारे दाखवल्या आहेत, आत्म्याच्या कार्याद्वारे प्रगट झाल्या आहेत, प्रमाणित करत आहे की हे वचन आहे.

407 प्रभू, तुझे वचन ह्या रुमालांवर येवो. आजाऱ्यांना बरे कर. प्रभू, येथे उपस्थित असलेल्या प्रत्येक आजारी व्यक्तिला आणि जे तेथे बाहेर असून लिहीत आहे आणि बोलावीत आहेत. त्यांना बरे कर.

408 पित्या, ह्या समयी, येथे दुसरी चंगाई सभा आहे, जी आता झाली पाहीजे, आणि आम्ही त्या चंगाई सभेत जात आहोत. परंतु, प्रभू, हा तो आत्मा आहे, प्रभू, आम्हाला तो त्या शिस्तीतच पाहीजे. आणि ह्या गोष्टी झाल्या पाहीजे.

409 परमेश्वरा, आम्ही प्रार्थना करतो की, आता सांगितलेले हे शब्द तू घे आणि लोकांसाठी खरे कर. प्रभू, त्यांना ते बघू दे. समय निघून जात आहे, आणि, तुला माहीत आहे, पित्या, म्हणून मी प्रार्थना करतो की, पुरेश्या गोष्टी सांगण्यात आल्या आहे की पवित्र आत्मा ते घेईल आणि ते प्रत्येकाच्या अंतःकरणात प्रगट करील. जे हे शास्त्रलेख लिहून घेत आहेत, त्यांनी त्यांचा अभ्यास करावा. जे हे टेप करीत आहेत किंवा टेप ऐकत आहेत, त्यांनी त्याचा अभ्यास करावा; आता त्यास स्वतःचा अर्थ लावू नये, परंतु वचनाचा अभ्यास करावा. पित्या, हे प्रदान कर. येशूच्या नावात, मी ह्या सर्वांना तुला आणि तुझ्या गौरवाकरिता समर्पित करतो. आमेन.

410 [एक भाऊ भविष्यवाणी करतो. मंडळी आनंदीत होते—संपा.] आमेन. ओह, तुमचा आभारी आहे. [मंडळी आनंदीत होत आहे.] ओह!

411 जर येथे कोणी आहे, जे त्याला ओळखीत नाही. तर क्षमेसाठी आता ते करा. ते सरळ ऐका, खंबीरपणे निषेध करा, जर तुम्ही जवळ जाण्याची इच्छा करता, तर ते आता करा, कारण ह्या नंतरचे दिवस.

412 जर हे त्या शिक्क्याचे फुटणे असेल तर काय? जर तोच तो दूत असेल, जो तेथे पुढे पाठवला होता, ज्याने मला त्या दिवशी तेथे उभे असताना भूमीवरुन वर नेले, मी मागे उभे असताना, जेव्हा तीन साक्षीदार जवळ उभे होते. ते मी जाण्याअगोदर तुम्हाला बोललो, “तेथे एक स्फोट होईल, जो मला बहुतकरुन वर पाठवील.” आणि मी सात देवदूतांद्वारे वर घेतलो गेलो आणि पूर्वेकडे आलो. त्या गोष्टीने मला भूमीवरुन हादरवले.

413 हे बरोबर आहे का, भाऊ नॉरमन, भाऊ फ्रेड सॉथमन, जे माझ्याबरोबर उभे होते. जेव्हा हे वर ट्युसान येथे घडले? अगदी ज्याप्रमाणे मला दृष्टांतात सांगितले आणि ते ट्युसान दिशेने दक्षिणेस होते. जर हे बरोबर आहे, तर भाऊ फ्रेड, भाऊ नॉरमन तुम्ही आपले हात वर करा. तेथे ते आहेत. तुम्ही उभे राहा, ह्यासाठी तुम्ही साक्षी म्हणून तेथे होता हे लोक पाहू शकतील. मी अशा गोष्टी कधीही माझ्या आयुष्यात, ऐकल्या नाही.

414 आणि, लगेचच, त्यांनी त्या दिवशी शिकार केली नाही. मी फ्रेडकडे दुसऱ्या सकाळी, विनंती केली. त्याला हे माहीत नाही. मी त्याला बाहेर शिकारीला जाण्यासाठी विनंती केली. सांगत राहीलो, “ते कर. ते कर.”

415 परंतु तो म्हणाला, त्याने मला तेथे मागे सांगितले आहे. “तो ते करणार नाही. तू आताच, पूर्वेला जात आहेस.”

416 आणि ते सात देवदूत! पहिला स्फोट, तिने उघडला. होय. जर ते असेल तर काय? आपण ह्या शेवटच्या समयात आहोत. समजले?

मी प्रेम करतो…

आपण त्याची आराधना करु.

मी त्याच्यावर प्रेम करतो,
कारण त्याने माझ्यावर प्रथम प्रेम केले.

आपण उभे राहूया.

आणि माझे तारण विकत घेतले आहे,
त्या कलवरीच्या झाडावर.

417 आता भावांनो आपले मस्तक झुकविले असता, आपल्या अंतःकरणांना शुध्द करुया. माझ्या बहिणींनो, मी तुमच्याशी फार कटुपणाने बोललो आहे, परंतु मी ते परमेश्वराच्या प्रेमाने केले आहे. मी ते केले आहे कारण मी तुमच्यावर प्रेम करतो. लांब केस ठेवण्याविषयी, आणि योग्य पेहराव आणि वागणूक ठेवावी म्हणून मी ते केले. परमेश्वराच्या प्रेमास्तव केले आहे. आपण आपला विवेक आता शुध्द करुया. जेव्हा–जेव्हा देवाचे विरंजक आहे.

418 ह्या सकाळी, कदाचित खुप उशिरा. त्याने पुढे यावे. ह्या गोष्टी अशाप्रकारे पुढे येत आहेत, भावांनो, कदाचित हा मध्यस्थिच्या कार्याचा अंत असेल. तुम्ही ह्यावर कधी विचार केला आहे काय? ठीक, मला हे माहीत नाही, मी म्हणत नाही. परंतु काय जर तो असेल? काय जर तो असेल? त्या विषयी काय? तेथे आणखी पापमुक्ती नाही. ती, त्यावेळीच झाली आहे. माझी आशा आहे, तो अंत नाही, परंतु तो असण्याची शक्यता आहे.

मी त्याच्यावर प्रेम करतो...

प्रभू, आम्हाला शुध्द कर. [टेपवर रिकामी जागा—संपा.]

...त्याच्यावर प्रेम करतो.
कारण त्याने प्रथम माझ्यावर प्रेम केले
आणि माझे तारण विकत घेतले.
त्या कलवरी झाडावर.

419 प्रभूचे नाव धन्यवादीत असो! परमेश्वराला गौरव असो! मला त्या मधुर भावना आवडतात. तुम्हालाही तसे वाटत नाही का? पवित्र आत्मा तुम्हाला न्हाऊ घालतो. तुमच्या सभोवती चालत आहे. ओह, किती अद्भूत आहे! ओह, त्याच्या दयेचा विचार करा!

मी त्याच्यावर प्रेम करतो, मी त्यांच्यावर प्रेम करतो.
कारण त्याने माझ्यावर प्रथम प्रेम केले
आणि माझे तारण विकत घेतले.
त्या कालवरी झाडावर.

420 मित्रांनो, हे विसरु नका. तुमच्याबरोबर घरी घेऊन जा. त्याबरोबर राहा. तुमच्या उशीवर ते पकडून राहा. ते विसरु नका. त्या बरोबर राहा. आता परमेश्वर तुम्हाला अशीर्वाद देवो.

भाऊ नेव्हील, तुमचे पाळक.

***पहिला शिक्का*** MAR63-0318

(The First Seal)

***सात शिक्क्यांचे प्रगटीकरण सत्र***

हा संदेश, भाऊ विल्यम मिरीयन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे, मूळ स्वरूपात इंग्रजीमध्ये, सोमवारी, 18 मार्च, 1963 साली, ब्रॅन्हम टॅबरनॅकल, जेफरसनविल येथे, इंडियाना, संयुक्त राज्य, अमेरिकेत प्रचार केला गेला, जो चुंबकीय टेप रेकोर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे. हे मराठी भाषांतर, व्हॉइस ऑफ गॉड रेकॉर्डिंग्स ह्यांनी छापले आहे आणि त्याचा वाटप करण्यात आला आहे.

MARATHI

©2020 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## <u>छपाईच्या हक्काची सूचना</u>

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice Of God Recordings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org